यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगा घरोघरी

भारतीय संविधानाची ओळख

COURSE CODE : VECD101
BOOK CODE : VECD1011



पुस्तक १

भारतीय संविधानाची निर्मिती



यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

VECD101
भारतीय संविधानाची ओळख
Book Code VECD1011

पुस्तक १

भारतीय संविधानाची निर्मिती

लेखक : डॉ. श्रीरंजन आवटे

घटक १	:	संविधानाची निर्मिती	०१
घटक २	:	भारतीय संविधानाचे स्त्रोत	१२
घटक ३	:	भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान (उद्देशपत्रिका)	२३
घटक ४	:	भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये	३७

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे

संचालक : नागार्जुन वाडेकर, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

विद्याशाखा परिषद

प्रा. नागार्जुन वाडेकर (अध्यक्ष)
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. जयदीप निकम
संचालक व वरिष्ठ प्राध्यापक
निरंतर शिक्षण विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. शिवाजी सरगर
संचालक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षणकेंद्र
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रा. प्रकाश पवार
प्रमुख, राज्यशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ
विद्यानगर, कोल्हापूर

प्रा. राजेंद्र कुंभार
(सेवा निवृत्त) ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड रोड, पुणे

प्रा. संजय तांबट
प्रमुख, संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे

प्रा. चेतना कामळस्कर
संचालक
विज्ञान विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. संदिप चौधरी
प्रमुख, समाजशास्त्र विभाग
सरस्वती भुवन महाविद्यालय, सरस्वती कॉलनी
औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर

प्रा. देवेंद्र इंगळे
इतिहास विभाग प्रमुख
मूळजी जेठा महाविद्यालय (स्वायत्त)
जळगाव

डॉ. लतिका गायकवाड
सहयोगी प्राध्यापक,
वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
य. च. मुक्तविद्यापीठ, नाशिक

डॉ. सुभाष सोनुने
सहायक प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य. च. मुक्तविद्यापीठ, नाशिक

राज्यस्तरीय शिक्षणक्रम सल्लागार समिती (लोकप्रशासन)

प्रा. नागार्जुन वाडेकर (अध्यक्ष)
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. डॉ. श्याम शिरसाठ
प्रमुख, लोकप्रशासन विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

प्रा. डॉ. जितेंद्र वासनिक
प्रमुख, लोकप्रशासन विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर
विद्यापीठ, नागपूर

प्रा. डॉ. बालाजी कत्तुरवार
लोकप्रशासन विभाग,
देगलूर महाविद्यालय, देगलूर

प्रा. डॉ. मृदुल निळे
नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रा. डॉ. शामसुंदर वाघमारे
लोकप्रशासन विभाग,
शारदा महाविद्यालय, परभणी

प्रा. डॉ. संजय भालेराव
लोकप्रशासन विभाग,
शिवाजी महाविद्यालय, कन्नड

प्रा. डॉ. प्रकाश पवार
प्रमुख, राज्यशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. डॉ. विजय तूंटे
राज्यशास्त्र विभाग
प्रताप महाविद्यालय, अमळनेर

प्रा.डॉ. पांडुरंग भोये
राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग,
सा. फु. पु. विद्यापीठ, पुणे

प्रा. डॉ. जयश्री बिरदवडे
लोकप्रशासन विभाग,
ए. बी. भांडवलदार महाविद्यालय,
देवगाव (रं) छत्रपती संभाजीनगर

प्रा. डॉ. मीरा फड
लोकप्रशासन विभाग
यशवंत महाविद्यालय, नांदेड

प्रा. डॉ. अमोल काळे
लोकप्रशासन विभाग,
पीपल्स महाविद्यालय, नांदेड

डॉ. योगेश भादे
लोकप्रशासन विभाग
विवेकानंद महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे

संचालक : प्रा. नागार्जुन वाडेकर, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

लेखक

डॉ. श्रीरंजन आवटे
सहायक प्राध्यापक राज्यशास्त्र
सुआन सुनंधा राजभाट विद्यापीठ
बँकॉक, थायलंड

संपादक

सुभाष वारे
प्लॉट नं. ७२ मुळे कॉलनी
लंडन किड्स शाळेच्या मागे
शाहुनगर, केडगाव, जि.अहिल्यानगर

शिक्षणक्रम संयोजक

डॉ. सुनील गावंडे
शैक्षणिक संयोजक (सहायक प्राध्यापक स्तर)
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

निर्मिती

श्री. विलास बधान
व्यवस्थापक (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

© 2025 **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

● **प्रथम प्रकाशन :** ऑगस्ट २०२५ ● **प्रकाशन क्रमांक :** ३०९६
● **मुखपृष्ठ रेखाटन :** श्री. कांचन शिंदे, ग्रंथनिर्मिती केंद्र
● **अक्षरजुळणी :** गुलाब घाटाळ, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
● **प्रकाशक :** श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ISBN : 978-81-991885-8-7 *AB-25-18 (Sarita)*

कुलगुरूंचे मनोगत

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार पदवी शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतल्याबद्दल मी आपले हार्दिक अभिनंदन करतो. या शिक्षणक्रमातील भारतीय संविधानाची ओळख या मूल्यशिक्षणावर आधारित अभ्यासक्रमाची पुस्तके आपल्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार विद्यापीठाने समाजाच्या गरजेनुरूप कौशल्याधिष्ठित शिक्षणक्रम विकसनास प्राधान्य देऊन शैक्षणिक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. केवळ पारंपरिक शिक्षणावर आणि पुस्तकी ज्ञानावर भर न देता, दैनंदिन जीवनात स्वत:च्या व समाजाच्या हितासाठी ज्ञानाचे उपयोजन कसे करावे, याचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा विद्यापीठाने सतत प्रयत्न केलेला आहे. विद्यापीठाने शिक्षणाच्या संधीचे लोकशाहीकरण करताना केवळ आर्थिक कुवत नाही म्हणून शिक्षण घेता आले नाही अशी स्थिती असणाऱ्या अनेक विद्यार्थी/विद्यार्थिनींना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणत ज्ञानगंगा घरोघरी पोहोचवणारी शिक्षण प्रणाली निर्माण करून देत राज्याच्या विकासात आपले योगदान दिले आहे. कोणत्याही कारणाने शिक्षणात खंड पडलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. काम करता करता शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी वाढीव कालावधी, अत्यल्प शिक्षणक्रम शुल्क, लवचीक आणि विद्यार्थिकेंद्री प्रशासन, इत्यादी मुक्त शिक्षणप्रणालीची वैशिष्ट्ये आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोग आणि शासनाकडून वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विविध संस्था-संघटनांकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार तसेच बदलत्या काळाची आणि परिस्थितीची गरज लक्षात घेऊन विद्यापीठाकडून नवनवीन अभ्यासक्रम तयार केले जातात. मुक्त विद्यापीठातील शिक्षणक्रमाची त्या त्या विषयातील तज्ज्ञांद्वारे विकसित दर्जेदार पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करून दिली जातात. विद्यापीठ गुणवत्तापूर्ण, लवचिक व सर्वसमावेशक शिक्षण देण्याच्या ध्येयाने कार्यरत आहे. शिक्षण हे केवळ ज्ञानार्जनाचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विश्वासातून विद्यापीठ सतत शिक्षणक्रमांची उन्नती करत आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार, विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमार्फत विविध पदवी शिक्षणक्रम नव्याने विकसित करण्यात आले आहेत. या धोरणाचा मूळ गाभा म्हणजे शिक्षण हे कौशल्यविकास, मूल्यशिक्षण आणि समाजाभिमुखता यांचा संगम असावा. या उद्दिष्टपूर्तीसाठी 'भारतीय संविधानाची ओळख' हा मूल्यशिक्षणावर आधारित अनिवार्य अभ्यासक्रम समाविष्ट केला आहे.

भारताचे संविधान आपल्या लोकशाही व्यवस्थेचे मूलस्तंभ आहे. हा केवळ कायद्यांचा संग्रह नसून समता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता यांसारख्या मूलभूत मूल्यांचे जतन करणारा सामाजिक करार आहे. या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना संविधानातील तत्त्वज्ञान, रचना, संस्थात्मक कार्यपद्धती आणि नागरिक म्हणून आपली जबाबदारी यांची सखोल जाणीव निर्माण होईल. प्रत्येक विद्यार्थी जेव्हा आपल्या संविधानाची नीट ओळख करून घेईल, तेव्हा तो केवळ सुशिक्षितच नव्हे तर जागरूक, जबाबदार आणि सक्रिय नागरिक म्हणून घडेल. हाच बदल आपल्या लोकशाहीला बळकट करेल आणि आपल्या राष्ट्राच्या प्रगतीस गती देईल. विद्यापीठाच्या या प्रयत्नांतून प्रत्येक विद्यार्थ्याला संविधानिक मूल्यांची प्रेरणा मिळावी आणि त्यांनी ज्ञानासोबतच चारित्र्य व कर्तव्यभावनेतही प्रगती करावी, हीच अपेक्षा.

पारंपरिक शिक्षणप्रणालीत विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांमध्ये दररोज अभ्यासवर्ग असतात, तर दूरशिक्षण प्रणालीमध्ये सुट्टीच्या दिवशी संपर्कसत्र आयोजित केली जातात. स्वत:च्या व्यावसायिक तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून शिक्षण पूर्ण करणे असे या संकल्पनेमध्ये अपेक्षित असल्याने संपर्कसत्राला जाताना त्या विषयाची, विषयातील घटकांची पूर्वतयारी, अभ्यास करून उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यामुळे तुमच्या शंका-अडचणी, संबंधित अध्यापकांना विचारून त्याचे निरसन करून घेता येईल. आदर्श संपर्कसत्राचे स्वरूप एकसुरी व्याख्यानाऐवजी चर्चात्मक व्हावे अशी विद्यापीठाची भूमिका आहे.

आजच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगामध्ये प्रशासनात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून कागदरहित प्रशासनावर भर दिला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांची पुस्तके डिजिटल स्वरूपात www.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहेत, ती विद्यार्थी, शिक्षक तसेच जिज्ञासूंना उपयुक्त ठरतील अशी खात्री आहे.

आपल्या भविष्यातील वाटचालीसाठी पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा!

- कुलगुरू

अभ्यासक्रम

भारतीय संविधानाची ओळख (VECD101)

पुस्तक १ : भारतीय संविधानाची निर्मिती

- घटक १ : भारतीय संविधानाची निर्मिती
- घटक २ : भारतीय संविधानाचे स्त्रोत
- घटक ३ : भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान (उद्देशपत्रिका)
- घटक ४ : भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये

पुस्तक २ : भारतीय संविधान : आपले हक्क आणि कर्तव्य

- घटक १ : मूलभूत हक्क (पार्श्वभूमी व न्यायालयीन संरक्षण)
- घटक २ : राज्याची नीती निर्देशक तत्वे
- घटक ३ : नागरिकांची मूलभूत कर्तव्ये
- घटक ४ : भारतीय शासन व्यवस्था

भारतीय संविधानाची ओळख (VECD101)

अभ्यासक्रमाची उद्दिष्टे

१. भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान, रचना आणि मूल्ये स्पष्ट करणे.

२. मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि राज्याच्या नीती निर्देशक तत्त्वांविषयी जाणीव करून देणे.

३. संसद, कार्यपालिका आणि न्यायपालिका या घटनात्मक संस्थांची भूमिका व कार्यपद्धती समजावणे.

४. नागरिकत्व, लोकशाही व कायद्याचे राज्य याविषयी जागरूकता निर्माण करणे.

५. घटनात्मक तरतुदी आणि समकालीन राजकीय चर्चांवर विचार करण्याची क्षमता विकसित करणे.

अभ्यासक्रमाची निष्पती

१. भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान, रचना आणि मूल्ये स्पष्ट होतात.

२. मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि राज्याच्या नीती निर्देशक तत्त्वांविषयी जाणीव निर्माण होते.

३. संसद, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांसारख्या घटनात्मक संस्थांची भूमिका व कार्यपद्धती समजतात.

४. नागरिकत्व, लोकशाही व कायद्याचे राज्य याविषयी जागरूकता निर्माण होते.

५. घटनात्मक तरतुदी आणि समकालीन राजकीय चर्चांवर विचार करण्याची क्षमता विकसित होते.

पुस्तक पहिले : भारतीय संविधानाची निर्मिती

प्रास्ताविक

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार 'भारतीय संविधानाची ओळख' या अभ्यासक्रमात एकूण दोन पुस्तकांचा समावेश आहे. यातील पहिले पुस्तक 'भारतीय संविधानाची निर्मिती' हे असून याममध्ये पुढील घटकांचा समावेश आहे.

घटक १ : भारतीय संविधानाची निर्मिती : या घटकामध्ये ब्रिटिश वसाहतवाद, संविधान निर्मितीची पार्श्वभूमी, नव्या संविधानाची चौकट, संविधान सभेची निर्मिती, संविधान सभेचे सर्वसमावेशक नेतृत्व, संविधानसभेचे वैचारिक रिंगण, संविधानसभेचे कामकाज, संविधान निर्मितीच्या अवस्था या उप-घटकाचा समावेश केला आहे.

घटक २ : भारतीय संविधानाचे स्त्रोत : या घटकामध्ये भारतीय संविधानावरील प्रभावाविषयी स्पष्टीकरण दिले आहे. तसेच संविधानाच्या विविध स्त्रोतांचा आढावा या घटकामध्ये घेतला गेला आहे.

घटक ३ : भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान (उद्देशपत्रिका) : या घटकामध्ये भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान संविधानाच्या उद्देशिकेमध्ये मांडले आहे. त्याचा अन्वयार्थ आणि विश्लेषण या घटकामध्ये केले गेले आहे.

घटक ४ : भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये : या घटकामध्ये भारतीय संविधान हे जगभरातील संविधानांहून वेगळे आहे. त्याच्या व्यवच्छेदक वैशिष्ट्यांबाबतची मांडणी येथे केली आहे.

उपरोक्त घटकांचा सविस्तर अभ्यास केल्यानंतर आपणास आपल्या भारतीय संविधानाची निर्मिती व जडणघडण कशी झाली या विषयी माहिती मिळेल.

घटक १ : संविधानाची निर्मिती

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय-विवेचन

- १.२.१ ब्रिटिश वसाहतवाद
- १.२.२ संविधान निर्मितीची पार्श्वभूमी
- १.२.३ नव्या संविधानाची चौकट
- १.२.४ संविधान सभेची निर्मिती
- १.२.५ संविधान सभेचे सर्वसमावेशक नेतृत्व
- १.२.६ संविधानसभेचे वैचारिक रिंगण
- १.२.७ संविधानसभेचे कामकाज
- १.२.८ संविधान निर्मितीच्या अवस्था

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठीचे संदर्भ

१.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- संविधान निर्मितीचे महत्व समजेल.
- संविधान निर्मितीच्या राजकीय इतिहासातून तत्त्वांचा अन्वयार्थ लावता येईल.
- संविधान निर्मितीतील विविध सदस्यांचे योगदान लक्षात येईल.

१.१ प्रास्ताविक

भारताच्या संविधान सभेची निर्मिती झाली डिसेंबर १९४६ मध्ये आणि संविधान सभेने नोव्हेंबर १९४९ मध्ये संविधानाचे कामकाज पूर्ण केले; मात्र संविधान सभा अस्तित्वात येण्यासाठी अनेक वर्षे मोठा संघर्ष करावा लागला. ही ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे.

ब्रिटिशांच्या साम्राज्यवादाला आव्हान निर्माण करण्याच्या प्रक्रियेमधून भारत एक देश म्हणून आकाराला आला. या नव्या देशाचे संविधान कसे असेल, हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातून आणि सामाजिक समतेच्या आंदोलनातून निर्धारित झाले. भारतीय लोक स्वतःसाठीचे संविधान तयार करतील, हे ब्रिटिशांनी मान्य करणे आणि संविधान सभेची निर्मिती होणे ही भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या विजयाची खूण होती. या विजयापर्यंत पोहोचण्याचा प्रवास काही सोपा नव्हता. हा प्रवास समजावून घेण्यासाठी ब्रिटिश वसाहतवादाच्या संदर्भाचे आकलन आवश्यक आहे.

१.२ विषय-विवेचन

१.२.१ ब्रिटिश वसाहतवाद

ब्रिटिश इ.स. १६०० मध्ये भारतात आले. तेव्हापासून साधारण साडेतीनशे वर्षे भारत ब्रिटिश साम्राज्यवादाच्या पकडीत होता. हा काळ भांडवलवादाच्या तीन टप्प्यांमध्ये समजावून घेता येऊ शकेलः

१. व्यापारी भांडवलवाद (Mercantile Capitalism)

२. औद्योगिक भांडवलवाद (Industrial Capitalism)

३. वित्तीय भांडवलवाद (Finance Capitalism)

भांडवलवादाच्या पहिल्या टप्प्यात ब्रिटिशांनी व्यापारी संबंध प्रस्थापित करत भारतात पाय रोवले. दुस-या टप्प्यात भारतीय वसाहतीमधील कच्चा माल वापरुन पक्का माल इथे विकला आणि भारताच्या अर्थव्यवस्थेची क्षमता शोषून घेतली. तिस-या टप्प्यात ब्रिटिशांनी रेल्वेपासून ते टपाल, दूरसंचार यंत्रणा प्रस्थापित करत पूर्ण बस्तान बसवले. या तीनही टप्प्यांमध्ये भारतीय वसाहतीने ब्रिटिशांच्या या भांडवलवादी कृतींना वेगवेगळा प्रतिसाद दिला.

पहिल्या टप्प्यात भारतीय वसाहतींमधल्या लोकांना ब्रिटिशांच्या कृतींचा अन्वयार्थच लागला नाही कारण भारतीय लोक वेगवेगळ्या संस्थानांमध्ये, साम्राज्यांमध्ये विभागले गेले होते. दुस-या टप्प्यात भारतीय वसाहतीला थेट आर्थिक फटका बसू लागला. याच काळात दादाभाई नौरोजींसारख्या मंडळींनी आर्थिक निःस्सारणाचा सिद्धांत (इकॉनॉमिक ड्रेन थिअरी) मांडत राजकीय भान जागृत करण्याचा प्रयत्न केला. भारतीय वसाहतींचा कच्चा माल वापरुन पक्का माल विकून वसाहतींचे शोषण सुरु होते. साधारण एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात औद्योगिक भांडवलवादाच्या टप्प्यात ब्रिटिशप्रणीत संस्कृतीशी संपर्क झाल्याने भारतीय कर्मठ परंपरेसोबतचा टकराव सुरु झाला. लॉर्ड मेकॉलेने सुरु केलेल्या पाश्चात्त्य शिक्षणाच्या प्रसाराने हा संघर्ष अधिक प्रमाणात पृष्ठभागावर आला. त्याच्या परिणामी त्या काळात आपल्याकडे राजा राममोहन रॉय ते लोकहितवादी ते बेहरामजी मलबारी अशी सामाजिक सुधारकांची मोठी मांदियाळी दिसते. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक अभिसरणासह राजकीय अभिसरणही मोठ्या प्रमाणावर झाले. त्या सगळ्याचे पर्यवसान १८८५ साली स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेमध्ये (काँग्रेस) दिसते. एकोणीसाव्या शतकातल्या मंथनाने समता आणि स्वातंत्र्याबाबतचा विमर्श निर्माण झाला. त्याला बंधुतेची जोड मिळू नये म्हणून ब्रिटिशांनी हर प्रकारे प्रयत्न केले मात्र तिस-या टप्प्यात सुरु झालेला वित्तीय भांडवलवादातील टपाल ते ट्रेन या सगळ्याचा लाभ घेत देशभर एक व्यापक राजकीय भान निर्माण होऊ शकले. त्यातून हळूहळू एकता निर्माण होण्यास मदत झाली.

या तीनही टप्प्यांमध्ये ब्रिटिशांनी केलेल्या कायद्यांची भूमिका निर्णायक आहे. ब्रिटिशांचे शासन साम्राज्यवादी होते; मात्र 'कायद्याचे राज्य' (रुल ऑफ लॉ) या कल्पनेवर त्यांचा मुळापासून विश्वास होता. त्यामुळेच वेळोवेळी ब्रिटिशांनी केलेल्या कायद्यांमधून भारतीय संविधानापर्यंतचा प्रवास लक्षात येऊ शकतो.

१.२.२ संविधान निर्मितीची पार्श्वभूमी

भारताच्या संविधान सभेने १९४६ ते १९४९ या काळात संविधान निर्मिती केली. तीन वर्षांचा हा कालावधी खूप जास्त होता, अशा प्रकारची टीकाही केली जाते; मात्र ही टीका करण्यापूर्वी मुळात संविधान सभेच्या काळाची पार्श्वभूमी नीट लक्षात घेतली पाहिजे.

विसाव्या शतकात जगभरात लोकशाही प्रस्थापित होण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्याचप्रमाणे मानवी इतिहासातील सर्वाधिक हिंसा जगाने त्याच काळात अनुभवली. विशेषतः १९३० आणि १९४० चे दशक हे कायापालट घडवणारे होते. जपानच्या लष्करशाहीने हाहाकार निर्माण केला होता. मुसोलिनीच्या नेतृत्वातील इटलीने आक्रमक हिंसक पवित्रा घेतला होता. जर्मनीमध्ये हिटलरने ज्यूंचा संहार केला होता. नाझी जर्मनीने १९४१ ते १९४५ या काळात सुमारे साठ लाख ज्यूंची हत्या करत वंशविच्छेद करण्याचा भयंकर प्रयत्न केला होता. या सूत्रबद्ध हिंसेला 'होलोकॉस्ट' असे संबोधले जाते. दुसरीकडे स्टॅलिनच्या नेतृत्वातील रशियामध्येही मोठ्या प्रमाणात हिंसा घडत होती. अमेरिकेने जपानमधील हिरोशिमा नागासकी येथे १९४५ मध्ये बॉम्बहल्ले केले तेव्हा या हल्ल्यातही प्रचंड प्रमाणावर जीवित हानी झाली होती. त्यातून दुसरे महायुद्ध थांबले खरे; पण जग अजून हा धक्का पचवत होते.

ब्रिटिशही या धक्क्यातून सावरले नव्हते. त्यामुळे १९४६ ला संविधान सभेची स्थापना झाली तेव्हा संपूर्ण जग हिंसेच्या सावटाखाली होते. महायुद्धातल्या गुन्ह्यांबाबतची 'न्युरेनबर्ग ट्रायल' सुरु होती. ब्रिटिशांच्या महायुद्धातल्या सहभागामुळे महायुद्धाची झळ भारतीयांपर्यंत पोहोचली होती. हजारो भारतीय सैनिकांना लढावे लागले होते आणि मरण पत्करावे लागले होते. या सा-या पटलावर संविधान सभेच्या कामकाजाला सुरुवात झाली तेव्हाच देशाच्या फाळणीची चिन्हे दिसू लागली होती.

देशाची फाळणी झाली तेव्हा लाखो लोक मारले गेले. दंगली उसळल्या. जगाच्या इतिहासातील रक्तरंजित आणि शोकात्म असा हा काळ होता. भारतासाठी 'होलोकॉस्ट'च्या तीव्रतेची ही घटना होती. ऑगस्ट १९४७ मध्ये फाळणी झाली तर जानेवारी १९४८ मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधींची हत्या झाली. त्यानंतर पुन्हा दंगली झाल्या आणि सामाजिक सौहार्द बिघडले. हे सारं सुरु असताना संविधान सभेचे कामकाज सुरु होते !

दुसरीकडे स्वातंत्र्य मिळत असताना देशातले केवळ १५ टक्के लोक साक्षर होते आणि बेरोजगारी मोठ्या प्रमाणात होती. रोजगार तर मोठी गोष्ट, सर्वांना खायला मिळू शकेल एवढे अन्नधान्य पिकवण्याचे आव्हान देशासमोर होते. देशाचे उत्पन्न अत्यल्प होते. या सा-या पार्श्वभूमीवर देशाला स्वयंपूर्ण करण्याचे आव्हान होते.

तिसरीकडे संस्थानांना भारतात सामिल करुन घ्यायचा मोठा प्रश्न होता. काही संस्थानांनी भारतात सामिल व्हायला नकार दिला. त्यामुळे त्यांच्याशी संवादी रहात, प्रसंगी बळाचा वापर करत त्यांना जोडून घेणे भाग होते. प्रादेशिक अस्मितांना सांभाळून घेत आणि त्याच वेळी देशाची एकात्मता टिकवत हे कठीण काम करायचे होते.

थोडक्यात, संविधानसभेच्या सभागृहाच्या बाहेर हिंसक वातावरण होते. सामाजिक ऐक्य, आर्थिक स्वावलंबित्व आणि राजकीय स्थैर्य अशा तीनही प्रतलांवर भीषण अवस्था असताना संविधान सभा एकत्र येऊन भारतासाठी भविष्याचे आरेखन करत होती. त्यात भारतासारख्या प्रचंड विविधता असलेल्या देशासाठी संविधान निर्मिती करणे हे प्रचंड अवघड होते. त्यामुळे अशा उलथापालथीच्या काळात संविधान सभेने संविधानाची निर्मिती केली हे केवळ आश्चर्य आहे !

१.२.३ नव्या संविधानाची चौकट

कॅबिनेट मिशन योजनेने संविधान सभेच्या निर्मितीला मान्यता दिली. संविधान सभेकरता निवडणुका घ्याव्या लागणार होत्या. या निवडणुकांमध्ये मुख्य लढत ही 'काँग्रेस विरुद्ध मुस्लिम लीग' अशी असणार होती. 'चले जाव' चळवळीचा जयघोष करत काँग्रेसप्रचार करत होती तर 'पाकिस्तान' निर्मितीचे उद्देश सांगत मुस्लिम लीग प्रचार करत

होती. जमातवादामुळे वातावरण अधिक कलुषित झालेले. अशा सा-या पार्श्वभूमीवर ब्रिटिश सरकारने गव्हर्नर सचिवालयात बी. एन. राव यांच्यावर विशेष जबाबदारी सोपवली होती. काँग्रेस आणि मुस्लिम लीगला स्वीकारार्ह असा मसुदा तयार करण्याचे काम त्यांच्यावर सोपवले होते.

भारताची एकता टिकवून ठेवत नव्या संविधानाची चौकट तयार करण्याचे काम अतिशय खडतर होते. सनदी सेवेचा आणि कायद्याच्या ज्ञानाचा मोठा अनुभव असलेल्या बी. एन. राव यांनी १९ पानांचा मसुदा लिहित जानेवारी १९४६ मध्ये एक संवैधानिक चौकट मांडली. यानुसार नवा भारत कॉमनवेल्थचा भाग असेल, असे ठरवण्यात आले. यामध्ये **तीन प्रमुख घटक असतील**

१. हिंदुस्थान संघराज्य
२. पाकिस्तान संघराज्य
३. भारतीय संस्थाने आणि आदिवासी प्रदेश.

या तीनही घटकांना सार्वभौमत्व असेल, स्वातंत्र्य असेल; मात्र त्यांचे संरक्षण, परराष्ट्र संबंध आणि संवाद, दळणवळण याबाबत समान धोरण असेल. राव यांनी पाकिस्तानच्या निर्मितीला टाळत एक स्वतंत्र प्रांतिक संघटन म्हणून रचना करण्याचा प्रयत्न केला होता. धर्मांचा उल्लेख न करता प्रांतिक रचनेची भाषा वापरली. राव यांनी त्यांच्या परीने कायदेशीर समन्वयाची एक वाट चोखाळली होती.

याशिवाय या आराखड्यात कार्यकारी मंडळ आणि कायदे मंडळ यांचे काम काय असेल, याविषयी मूलभूत तरतुदी राव यांनी केल्या होत्या. हा मसुदा प्रामुख्याने संघराज्याच्या रचनेवर भाष्य करणारा होता. एका समूहाचे दुस-या समूहावर वर्चस्व असता कामा नये आणि भारताची एकात्मता अबाधित रहावी, या उद्देशाने आपण हा आराखडा तयार केला आहे, असे राव सांगतात.

संघराज्यवाद आणि कायदेमंडळ-कार्यकारी मंडळ या संदर्भातल्या तरतुदींची मांडणी केल्यानंतर राव यांनी म्हटले होते की, भारताने मूलभूत मुद्द्यांकडे युद्धपातळीवर लक्ष देत जबाबदारी स्वीकारण्याची आवश्यकता आहेः

१. भारतात आणि भारताबाहेर शांतता प्रस्थापित करणे.
२. पोषणमूल्याची पातळी वाढवणे आणि एकूणात भारतीयांचे जीवनमान उंचावणे.
३. सर्वांना समान शैक्षणिक संधीची भूमी तयार करणे.
४. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारणे.

या चारही मुद्द्यांचे संदर्भमूल्य सहज लक्षात येईल.

सुमन शर्मा यांनी 'स्टेट बाउंड्री चेंजेस इन इंडिया' या पुस्तकात म्हटले आहे की राव यांनी मांडलेल्या या आराखड्याचा परिणाम कॅबिनेट मिशन योजनेवर पडला. या योजनेने भारताचे संवैधानिक भवितव्य ठरणार होते. त्यामुळेच राव यांचे हे योगदान मौलिक ठरते. अर्थात त्यानंतरही प्रांतिक रचनेबाबत वाद उद्दभवलेच. पुढे बी.एन.राव यांची संवैधानिक सभेचे सल्लागार म्हणून नेमणूक झाली आणि स्वतंत्र संविधान सभेच्या मसुदा समितीसोबतच्या चर्चेतही त्यांनी मोलाची भूमिका बजावली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की, संविधान निर्मितीचे संपूर्ण श्रेय मला दिले जाते मात्र त्यातला मोलाचा वाटा बी. एन. राव यांचाही आहे. राव यांनी स्वतंत्र संविधान सभा निर्माण होण्यापूर्वीच असा आराखडा मांडल्याने वैचारिक मंथनास मदत झाली.

१.२.४ संविधान सभेची निर्मिती

भारताच्या स्वतंत्र संविधानासाठी संविधानसभा असली पाहिजे, असा प्रस्ताव १९३४ ला मांडला मानवेंद्रनाथ रॉय यांनी. काँग्रेसने १९३५ च्या अधिवेशनात या अनुषंगाने ठराव मांडला. त्यानंतर १९३८ साली जवाहरलाल नेहरु

यांनी भारताचे संविधान भारतीय लोक निर्माण करतील, त्यामध्ये इतर कुणाचा हस्तक्षेप असणार नाही, अशी घोषणा केली. हे भारतीय लोक सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या आधारे निवडले जातील, असेही ते म्हणाले. अखेरीस १९४० च्या ऑगस्ट योजनेने तत्वतः संविधानसभेची मागणी मान्य केली. त्याचाच पुढचा टप्पा म्हणजे सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्यासोबतच्या वाटाघाटीचा. भारताच्या संविधानसभेसाठीचा मसुदा त्यांनी समोर ठेवला खरा; पण मुस्लीम लीगने त्याला नकार दिला.

अखेरीस कॅबिनेट मिशन योजना १९४६ साली अस्तित्वात आली. या स्वतंत्र कॅबिनेट मिशन योजनेनुसार नव्या संविधान सभेच्या निर्मितीसाठीचा आराखडा मांडला. ब्रिटिशांकडून भारताकडे होणारे सत्तांतर आणि त्यानंतर भारतातील शासन व्यवस्था या दोन्ही दृष्टीने हा कळीचा मुद्दा होता. कोणत्या भारतीय लोकांकडे सत्ता सोपवायची आणि संविधानसभेत कोण सदस्य असणार, हे ठरवणे कठीण होते. त्याचे नेमके स्वरूप सांगणारी सारी योजना आखण्यात आली.

त्यानुसार नव्या भारताची संविधान सभा ही निवडून आलेले सदस्य आणि नामनिर्देशित (नॉमिनेटेड) सदस्य यांची असेल, असे ठरवले गेले. त्यानुसार ब्रिटिश भारतातून सदस्य निवडले जातील तर संस्थानांचे राजे सदस्यांचे नामनिर्देशन करतील, अशी तरतूद केली गेली. ब्रिटिश भारतातील सदस्यांची निवडणूक ही थेट जनतेतून करणे शक्य नव्हते. त्यामुळे प्रांतिक विधीमंडळाच्या निवडणुकांमधील निर्वाचित सदस्यांकडून ही निवड केली जाणार होती. गव्हर्नरच्या अखत्यारीतील ११ प्रांतिक विधीमंडळे आणि ४ मुख्य आयुक्तांच्या प्रांतातील प्रत्येकी एक सदस्य असे ब्रिटिश भारतातील प्रतिनिधी असणार होते. त्यानुसार २९६ सदस्य ब्रिटिश भारतातील निवडणुकांच्या आधारे तर ९३ सदस्य संस्थानांमधून नामनिर्देशित करण्याचे ठरले. अशा प्रकारे एकूण ३८९ सदस्यांच्या संविधानसभेचे नियोजन झाले.

संविधान सभेतील ३८९ जागांपैकी काँग्रेसचे सदस्य २०८ जागांवर निवडून आले तर मुस्लिम लीगचे ७३ जागांवर. पुढे फाळणीमुळे लीगचे सदस्य कमी झाले आणि एकूण संविधानसभाच २९९ सदस्यांची झाली. ही सदस्य संख्या ठरवताना लोकसंख्येचा निकष महत्वाचा मानला गेला होता. तसेच शीख, मुस्लिम यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याची तरतूद करण्यात आलेली होतीच.

मुळात हे नियोजन आधारले होते प्रांतिक विधीमंडळांच्या निवडणुकांवर. संविधान सभेच्या रचनेचा पाया १९४६ च्या प्रांतिक विधीमंडळाच्या निवडणुकांनी घातला. या निवडणुकीत एकूण १५८५ जागांपैकी काँग्रेसने ९०० हून अधिक जागा मिळवल्या तर मुस्लिम लीगने ४२५हून अधिक जागा प्राप्त केल्या. काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळालेल्या असल्या तरी मुस्लिम लीगची कामगिरी लक्षवेधक होती कारण मुस्लिमांसाठी राखीव ठेवलेल्या एकूण जागांपैकी सुमारे ९० टक्के जागा लीगला मिळाल्या होत्या. बिगर मुस्लिम मतदारसंघात मुस्लिम लीगला यश मिळालेले नव्हते. त्यामुळे या निवडणुकीने मुस्लिम लीगला 'मुस्लिमांचे प्रतिनिधी' म्हणून अधिमान्यता मिळाली. त्यामुळे पाकिस्तानच्या मागणीचा जोर वाढला आणि अखेरीस फाळणी झाली. याउलट या निवडणुकांमध्ये हिंदू महासभेला मुंबई आणि मध्य प्रांतात प्रत्येकी केवळ १ जागा मिळाली होती. त्यामुळे हिंदूंमध्ये जमातवादाचे विष पेरले गेले असले तरी काँग्रेसच्या नेतृत्वामुळे त्याचे प्रतिबिंब संविधानसभेत पडले नाही. एकात्म भारत या मुद्द्यावर आधारित काँग्रेसचा प्रचार होता. त्या प्रचाराला सर्व धर्मीयांनी पाठिंबा दिला. अर्थात या निवडणुकांकरता तेव्हाच्या प्रौढ लोकसंख्येच्या २८.५ टक्के लोकांना मतदानाचा अधिकार होता, ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

पुढे फाळणीनंतर संस्थानांमधील प्रतिनिधींची संख्याही ९९ हून ७० इतकी कमी करण्यात आली; मात्र शक्यतो वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून सदस्य असतील, अशी रचना व्हावी असा प्रयत्न होता. त्यामुळेच स्वतंत्र भारताच्या संविधान सभेतले सदस्य वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आले होते. डिसेंबर १९४६ मध्येच संविधान सभेत समित्या आणि

उपसमित्या गठित करण्यात आल्या. संविधान सभेच्या कामकाजाला सुरुवात झाली. संविधानाच्या मसुद्याचे काम दोन पातळीवर चालू राहिलेः एक समितीच्या पातळीवर आणि दुसरे संपूर्ण संविधान सभा उपस्थित असताना.

संविधान सभेची ही रचना त्यावेळच्या भारतातील बहुसंख्य लोकांचे प्रतिनिधीत्व करणारी असावी, असा प्रयत्न होता. मूल्यांइतकीच अशी संस्थात्मक रचना आणि विहित प्रक्रिया महत्वाची असते. याचे भान असलेल्या संविधान सभेतल्या सदस्यांना देशाचे भवितव्य रेखाटण्याची अमूल्य संधी मिळाली होती.

१.२.५ संविधान सभेचे सर्वसमावेशक नेतृत्व

संविधान सभेतील सदस्य ब्रिटिश भारतातील आणि भारतीय संस्थानांमधील होते. ब्रिटिश भारतातील सदस्य निवडणुकीच्या आधारे तर संस्थानातील नामनिर्देशित (नॉमिनेटेड) केलेले. हे सर्व सदस्य सर्वांचे प्रतिनिधीत्व करत होते अथवा नाही, याबाबत सतत चिकित्सा होत असते. संविधान सभेमधील नेतृत्वाचे पक्ष, विचारधारा, सामाजिक स्थान असे विविध मुद्द्यांवरुन विश्लेषण होते आणि असे विश्लेषण सर्वांगीण आकलनासाठी जरुरीचे आहे.
सुरुवातीला संविधान सभेमध्ये निवडून आलेले २९६ सदस्य होते. फाळणीनंतर त्यांची संख्या झाली २२९. या सर्व सदस्यांना चार गटांमध्ये विभागता येतेः

१. काँग्रेसचे प्रतिनिधी
२. काँग्रेसच्या तिकिटावर विजय प्राप्त केलेले स्वतंत्र उमेदवार
३. बिगर-कॉन्ग्रेसी प्रांतिक विधीमंडळाचे प्रतिनिधी
४. फाळणीनंतर पाकिस्तानात जायचे नाकारलेले मुस्लिम लीगचे प्रतिनिधी

अर्थातच यामध्ये काँग्रेसचे वर्चस्व होते. काँग्रेसचे १९२ सदस्य संविधान सभेमध्ये महत्वाची भूमिका बजावत होते. जॉन मथाई, डॉ बाबासाहेब आंबेडकर, एम आर जयकर यांसारखे स्वतंत्र उमेदवार काँग्रेस पक्षात नव्हते मात्र काँग्रेसच्या तिकिटावर ते निवडून आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुरुवातीला पश्चिम बंगाल मधून बरीशाल मदतदारसंघातून संविधान सभेवर निवडून आले होते पुढे भारताची फाळणी झाल्यावर हा मतदार संघ तत्कालीन पूर्व पाकिस्तानात समाविष्ट झाल्यामुळे बाबासाहेबांचे संविधान सभेचे सभासदत्व संपुष्टात आले होते दरम्यानच्या काळात काँग्रेसच्या नेतृत्वाला आणि संविधान सभेलाही बाबासाहेबांचे या कामातील महत्त्व पुरेपूर समजले असल्यामुळे मुंबईमधील एका मतदारसंघामधून बॅरिस्टर जयकर या काँग्रेसच्या सभासदाने राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर बाबासाहेब आंबेडकरांना बिनविरोध पुन्हा संविधान सभेमध्ये निर्वाचित करण्यात आले. स्त्रियांकरता राखीव जागा नव्हत्या मात्र १५ स्त्रियांचा संविधान सभेत प्रवेश होऊ शकला. हंसा मेहता, सरोजिनी नायडू, अम्मू स्वामीनाथन यांसारख्या स्त्रिया संविधानसभेत होत्या. फाळणीनंतर मुस्लिम लीगचे २९ सदस्य भारतात राहिले. त्यापैकी एक सय्यद मोहम्मद सादुल्ला हे सदस्य तर पुढे मसुदा समितीचे सदस्यही होते. अकाली दलाचे उज्जल सिंग हे सदस्य पूर्व पंजाबमधून होते. काँग्रेस इतर सदस्य कमी होते मात्र त्यांची भूमिका महत्वाची मानली गेली.

ग्रॅनवील ऑस्टिन यांनी 'द इंडियन कॉन्स्टीट्यूशनः कॉर्नरस्टोन ऑफ अ नेशन' या त्यांच्या पुस्तकात संविधानाच्या निर्मितीमध्ये २० सदस्यांची भूमिका प्रमुख होती, असे मांडले आहे. त्यापैकी १५ सदस्य काँग्रेसचे, तीन स्वतंत्र प्रतिनिधी, एक संस्थानातील प्रतिनिधी तर एक मुस्लिम लीगचे. त्यातही संविधान सभेतले चार सदस्य अनेक बाबतीत पुढाकार घेत होते, असे ऑस्टिन नोंदवतात. पं. नेहरु, सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद आणि मौलाना आझाद हे ते चार सदस्य. शिबानी किंकर चौबे यांनी ऑस्टिन यांच्या मांडणीमध्ये थोडा बदल करत संविधान सभेतील नेतृत्वाला तीन गटांमध्ये विभागले आहेः

१. काँग्रेस पक्षांतर्गत नेतृत्वः नेहरु, पटेल, प्रसाद आणि आझाद यांच्यानंतर के. एम. मुन्शी, जे. बी. कृपलानी आणि सी राजगोपालचारी अशी दुसरी नेतृत्वाची फळी होती.

२. काँग्रेसबाहेरचे नेतृत्वः अल्लादी कृष्णास्वामी अय्यर, एन गोपालस्वामी अय्यंगार आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व संविधान सभेत महत्वपूर्ण होते.

३. 'मध्यममार्गी' नेतृत्वः या गटात के. संथानम, टी. टी कृष्णामचारी यांसारख्या सदस्यांचा समावेश होतो. त्यांच्या कायद्याच्या अभ्यासामुळे संविधान सभेत त्यांचे म्हणणे गंभीरपणे ऐकले गेले.

यापैकी बहुतांश सदस्य वकील होते. त्यामुळे संविधानाची भाषा काहीशी क्लिष्ट आणि पारिभाषिक झाली आहे, असा टीकेचा सूरही लावला जातो. संविधान सभेतले बहुसंख्य सदस्य हे उच्चवर्णीय, उच्चशिक्षित, शहरी भागातील होते, हे देखील सत्य आहे. तसेच ९० टक्क्यांहून अधिक सदस्य हिंदू होते. केवळ १५ स्त्रिया संविधान सभेच्या सदस्य होत्या.

"मी आज इथे उभी आहे आणि मी स्वप्नात हरवले आहे. मला आठवतं, विद्यार्थी असताना मी वाचलं होतं. अमेरिकेच्या संविधान निर्मितीमध्ये हॅमिल्टन, जेफरसन यांनी निर्णायक भूमिका बजावली. मी विचार करायचे की अमेरिकेप्रमाणे गुलामीची अवस्था जाऊन भारताचे स्वतंत्र संविधान लिहिण्याची वेळ केव्हा येईल? मला वाटायचं संविधान निर्मिती करण्याइतपत आपण सक्षम आहोत का? आत्मस्तुती वाटू शकते ही अध्यक्ष महोदय, मात्र मी संविधान निर्मितीत भूमिका बजावू शकले, याचा मला सार्थ अभिमान वाटतो." दुर्गाबाई देशमुख यांचे १ फेब्रुवारी १९५० चे संसदेच्या पहिल्या अधिवेशनातील हे भाषण. संविधान सभेतल्या आपल्या भूमिकेला ऐतिहासिक महत्व आहे याचे दुर्गाबाईंसारख्या महिला सदस्यांना भान होते. त्यांच्यासह १५ महिलांनी संविधान सभेच्या निर्णय प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावली.

आंध्रच्या दुर्गाबाई देशमुख, बडोद्याच्या हंसा मेहता, केरळच्या पालघाट जिल्ह्यातील अम्मू स्वामीनाथन, कोचिनच्या दाक्षायनी वेलायुधन, पंजाबच्या मलेरकोटला येथील बेगम ऐजाज रसूल, लखनौच्या कमला चौधरी आणि राजकुमारी अमृत कौर, आसाममधील गोलपाडाच्या लीला रॉय, पूर्व बंगालातील म्हणजे (आजच्या बांग्लादेशातील) मालती चौधरी, अलाहाबादच्या पूर्णिमा बॅनर्जी आणि विजयालक्ष्मी पंडित, पश्चिम बंगालच्या मालद्यामधील रेणुका रे, हैदराबादच्या सरोजिनी नायडू, हरयाणाच्या अंबाला येथील सुचेता कृपलानी, केरळच्या तिरुवअनंतपुरम येथील ॲनी मस्कारेन अशा या पंधरा महिला सदस्य. पितृसत्ताक असलेल्या समाजात आणि संविधानसभेत आपली भूमिका ठामपणे मांडणे सोपे नव्हते. मात्र या महिलांनी आपली जबाबदारी चोख पार पाडली.

या सर्व महिलांचे प्रतिनिधीत्व केवळ नाममात्र नव्हते तर त्यांनी मौलिक सूचना करत भरीव काम केले. उदाहरणार्थ, रेणुका रे यांनी संपत्तीच्या हक्कांविषयी आक्षेप नोंदवला तेव्हा संविधान सभेतल्या पुरुषांनी त्यांची कुचेष्टा करण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनी ठामपणे मुद्दे मांडले. अगदी दाक्षायनी वेलायुधन यांनी जसा दलित असून दलितांकरता स्वतंत्र मतदारसंघांना विरोध केला त्याच प्रमाणे संविधान सभेतील बेगम ऐजाज रसूल यांनीही मुस्लीम लीगच्या प्रतिनिधी असूनही मुस्लिमांकरता स्वतंत्र मतदारसंघ असू नयेत, अशी भूमिका मांडली.

अम्मू स्वामीनाथन यांनी स्वातंत्र्य आंदोलनात आणि संविधान सभेतही भरीव योगदान दिले. पुढे त्यांचा गौरव १९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला वर्षात 'मदर ऑफ द इयर' या किताबाने झाला. राजकुमारी अमृत कौर यांनी मतदानाचा हक्क सर्वांना असायला हवा, अशी आग्रही मागणी केली, भाषा-शिक्षण या मुद्द्यावर त्यांनी सूचना केल्या तर पुढे आरोग्याच्या क्षेत्रात पायाभूत बदलही त्यांनी केले. देशाच्या पहिल्या आरोग्यमंत्री म्हणून त्यांनी काम केले. 'भारताची नाइटिंगेल' असे ज्यांना संबोधले गेले त्या सरोजिनी नायडू यांनी स्त्रीवादी जाणीव विकसित व्हावी म्हणून प्रयत्न केले.

हंसा मेहता यांच्यासारख्या संविधान सभेतल्या सदस्य तर पुढे संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांच्या परिषदेसाठी भारताच्या प्रतिनिधी म्हणून गेल्या. संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यातील पहिले कलम होते, 'ऑल मेन आर बॉर्न फ्री ॲण्ड इक्वल'. हंसा मेहता यांच्यामुळे 'मेन' शब्दाऐवजी 'ह्युमन बिइंग' असे शब्द वापरले गेले. सर्वांना सामावून घेणा-या या दुरुस्तीचे श्रेय हंसा मेहता यांचे आहे. जगभरातल्या अनेक देशांमध्ये महिलांना मतदानाचा

हक्कही नव्हता त्या काळात भारतातील महिला आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधीत्व करत होत्या. त्यामागे पंडित नेहरुंची आधुनिक दृष्टी होती. 'फाउंडिंग मदर्स ऑफ द इंडियन रिपब्लिक' (२०२३) या अच्युत चेतन यांच्या पुस्तकात महिला सदस्यांनी संविधान सभेत बजावलेल्या भूमिकेचे विश्लेषण आहे. महिला सदस्यांच्या संविधान निर्मितीतील कार्याची यथोचित नोंद जरुरीची आहे कारण या स्त्रिया भारतीय गणराज्याच्या निर्मात्या आहेत.

संविधान सभेतले प्रतिनिधी प्रत्येक समाज घटकातील नव्हते मात्र सर्व समाज घटकांना न्याय देईल असे होते. सर्व शोषितांचे मुद्दे, आस्था, प्रश्न उपस्थित करणारे होते. केवळ नाममात्र प्रतिनिधीत्वापेक्षा मौलिक मुद्दे उपस्थित करणारे नेतृत्वमहत्वाचे असते. तसेच संविधान सभेतल्या नेत्यांच्या मनात व्यापक आस्था होती.

१.२.६ संविधानसभेचे वैचारिक रिंगण

भारताच्या संविधान सभेत काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते, हा आणखी एक टीकेचा मुद्दा. संविधान सभा स्थापन झाली तोवर काँग्रेस पक्षाने ६१ वर्षे पूर्ण केली होती. काँग्रेस हा स्वातंत्र्य आंदोलनात सर्वात आघाडीवर असलेला राजकीय पक्ष होता. जनसामान्यांमध्ये विलक्षण लोकप्रिय असा हा पक्ष होता. तसेच १९४६ च्या प्रांतिक निवडणुकांमध्ये मोठे यश या पक्षाला मिळाले होते. त्यामुळे संविधान सभेमध्ये या पक्षाचे प्राबल्य असणे स्वाभाविकच होते; मात्र काँग्रेसहा एक पक्ष असण्याऐवजी रजनी कोठारी नोंदवतात त्याप्रमाणे 'काँग्रेसव्यवस्था' होती. त्यामुळे या पक्षाच्या अंतर्गतच वेगवेगळ्या विचारप्रवाहांचे प्रतिनिधीत्व करणारे लोक होते. त्याचप्रमाणे संविधान सभेतही वेगवेगळ्या विचारधारांवर निष्ठा असणारे लोक होते.

संविधान सभेतले सोमनाथ लाहिरी हे कम्युनिस्ट विचारांनी प्रभावित झालेले तर पं.नेहरु लोकशाही समाजवादाचा विचार मांडणारे. श्यामाप्रसाद मुखर्जी हिंदू महासभेचे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातीअंत करत समताधिष्ठित समाजाचे स्वप्न पाहणारे. राजेंद्र प्रसादांसारखे कर्मठ हिंदू एका बाजूला तर मौलाना आझादांसारखे परिवर्तनवादी मुस्लिम दुस-या बाजूला. या प्रकारे विविध वैचारिक पार्श्वभूमीतील सदस्य संविधान सभेत होते.

राज्यशास्त्रज्ञ राजीव भार्गव यांच्या मते, संविधान सभेमध्ये गांधींची बिगर-आधुनिक, सामूहिकतेला प्राधान्य देणारी दृष्टी, नेहरुंचा लोकशाही समाजवादाचा विचार, बाबासाहेब आंबेडकर यांचा उदार लोकशाहीचा विचार, के. टी. शाह यांची मूलगामी समतावादी दृष्टी आणि हिंदुत्वाची विचारधारा अशा पाच प्रमुख विचारप्रवाहांमध्ये संघर्ष होता. कायदेतज्ज्ञ प्रा. जी. मोहन गोपाल यांनी म्हटले आहे की, संविधान सभेतला संघर्ष तीन विचारधारांमधला होता.

१. संरजामी धर्मसत्ताक राज्याची दृष्टी (फ्यूडल थिओक्रसी) २. आधुनिकता ३. स्वराज.

संस्थानांमधून आलेले राजे, जमीनदार आणि धर्म हेच प्रमुख अधिष्ठान मानणारे सरंजामदार यांच्यासाठी पूर्वीची व्यवस्था लाभदायक होती. त्यामुळे आपले विशेष लाभ नाकारुन समतेचे संविधान स्वीकारणे त्यांच्यासाठी कठीण होते. ब्रिटिश आणि एकूणात पाश्चात्यप्रणीत आधुनिकतेची एक विशिष्ट दृष्टीही संविधानसभेत मांडली जात होती तर त्याच वेळी स्वयंपूर्ण खेडे केंद्रीभूत मानणारे, भारतीय परंपरेशी नाळ सांगणारे गांधीप्रणीत स्वराजही आग्रहाने मांडले जात होते.

संविधान सभेतल्या या वैचारिक रिंगणामुळे भारताच्या भविष्याच्या दिशेविषयी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून चर्चा झाली. एकाच पद्धतीने विचार करण्यातून साचलेपण येते. डबक्यातील साचलेपणापेक्षा विविध प्रवाह सम्मिलीत होऊन वाहणा-या नदीप्रमाणे विचारांचा प्रवाह असणे हे कोणत्याही लोकशाहीसाठी आवश्यक असते. संविधान सभेने भारताच्या जनमानसातल्या पूर्वग्रहांना प्रश्न विचारले आणि भविष्याचे चित्र रंगवत उत्तर दिले.

थोडक्यात, वेगवेगळ्या विचारांचे लोक संविधान सभेत एकत्र आले होते ते नव्या देशाच्या निर्मितीसाठी. त्यांच्यात वाद होते, मतभेद होते, नव्या देशासाठीची दृष्टी वेगवेगळी होती; मात्र वेगळी विचारधारा असणा-या माणसाला शत्रू मानले जात नव्हते, असा तो काळ होता. त्यामुळेच वाद-प्रतिवाद-संवाद हे लोकशाहीतील महत्वाचं

तत्त्व संविधान सभेने आपल्या सामूहिक वर्तनातून सिद्ध केलं. लोकशाही म्हणजे अर्थपूर्ण वाद, असहमती नम्रपणे नोंदवत आदरयुक्त प्रतिवाद आणि सर्जक मंथन असलेला संवाद ! संस्कृतमध्ये म्हटलेच आहे 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' संवादातून सत्यापर्यंत, तत्त्वापर्यंत पोहोचण्याचा रस्ता संविधानसभेने निवडला होता.

१.२.७ संविधानसभेचे कामकाज

संविधानसभेमध्ये सदस्यांची निवड कशी झाली, हे आपण पाहिले. तसेच हे सदस्य विविध विचारधारेचे होते आणि वेगवेगळ्या सामाजिक राजकीय पार्श्वभूमीतून आले होते; मात्र संविधानाच्या कामकाजासाठी एक निश्चित अशी रचना करणे भाग होते. त्यासाठीच विविध समित्या आणि उपसमित्या गठित करण्यात आल्या. एकूण २२ समित्या असल्या तरी प्रामुख्याने पाच समित्या अतिशय महत्वाची भूमिका बजावत होत्या.

पहिली समिती होती सुकाणू समिती. या समितीचे अध्यक्ष होते राजेंद्र प्रसाद. सर्व समित्यांचे काम सुरळीतपणे पार पाडणे, त्यामध्ये सूत्रबद्धता आणणे हे या समितीचे काम होते. सुकाणू समितीहूनही महत्वाची समिती होती मसुदा समिती. या मसुदा समितीचे अध्यक्ष होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर. सर्व समित्यांकडून आलेल्या सूचना, शिफारसी यांचा विचार करुन संविधानाचा मसुदा तयार करण्याचे सर्वांत महत्वाचे काम या समितीकडे होते. एम. गोपालस्वामी अय्यंगार, के.एम. मुन्शी, सईद मोहम्मद सादुल्ला, एन. माधव राव व टी. टी. कृष्णम्माचारी असे सदस्य होते. सुरुवातीला सदस्य असलेल्या बी. एल. मित्तर यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या जागी एन. माधव राव यांची निवड झाली तर डी. पी. खेतान यांच्या मृत्यूनंतर टी. टी. कृष्णम्माचारी यांची सदस्यपदी निवड करण्यात आली होती. या सात सदस्यांवर अंतिम मसुदा तयार करण्याचे काम सोपवले होते. त्या आधीच संविधान सभेचे सल्लागार बी. एन. राव यांनी संविधानाचा एक खर्डा सुपूर्द केला होता. मसुदा समितीने सहमतीने आणि सर्वांच्या सूचनांचा योग्य विचार करुन अंतिम मसुदा तयार केला. या प्रक्रियेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अध्यक्ष या नात्याने मौलिक योगदान होते. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'संविधानाचे शिल्पकार' असे संबोधले जाते.

केंद्र आणि प्रांत यांच्या संघटनाबाबत आणि त्यांच्या अधिकारांच्या अनुषंगाने दोन समित्या गठित केलेल्या होत्या. या दोन्हीही समित्यांचे अध्यक्ष होते पं. जवाहरलाल नेहरु. भारतीय संघराज्य आकाराला आणण्यामध्ये आणि विविध संस्थानांचे विलिनीकरण करण्याबाबत या समित्यांनी भरीव काम केले.

शेवटची महत्त्वाची समिती होती मूलभूत हक्क, अल्पसंख्यांक आणि आदिवासी यांच्यासाठीची. या समितीचे अध्यक्ष होते सरदार वल्लभभाई पटेल. संविधानातील तिसरा भाग हा मूलभूत हक्कांविषयीचा आहे. हा संविधानाचा गाभाभूत भाग आहे. संविधानाने व्यक्तीला काही मूलभूत हक्क आहेत, हे मान्य केले आहे. त्या हक्कांचे उल्लंघन झाले तर व्यक्ती न्यायालयाचा दरवाजा ठोठावू शकते. त्यामुळे व्यक्तीसाठी हे अविभाज्य हक्क आहेत. हे मूलभूत हक्क ठरवण्याच्या अनुषंगाने मोठे वादविवाद झाले. बरेच मंथन झाले आणि अखेरीस तिसरा भाग निश्चित करण्यात आला.

भारताच्या संविधान सभेतल्या इतर समित्यांचे कामही निर्णायक होते; पण त्या सर्व समित्यांपैकी वर उल्लेखलेल्या पाच समित्यांचे काम अधिक मौलिक होते. त्यांनी लोकशाही तत्त्वास अनुसरुन सर्वांचा विचार ऐकून घेत मसुदा निश्चित केला.

१.२.८ संविधान निर्मितीच्या अवस्था

संविधान निर्मितीसाठी संविधानसभेची एकूण अकरा सत्रे पार पडली. या सत्रांमध्ये तीन टप्पे पार पडलेः १. मसुदा निर्मिती २. चर्चा व विमर्श ३. स्वीकृती. डिसेंबर १९४६ मध्येच संविधान सभेत उद्दिष्टांचा ठराव मांडला गेला. त्यानंतर संविधानाचा आराखडा काय असेल, याविषयी चर्चा झाली. संविधान सभेचे सल्लागार बी.एन.राव यांनी एक

मसुदा तयार केला. त्यानंतर मसुदा समितीने त्यावर काम केले. साधारण फेब्रुवारी १९४८ पर्यंत संविधानाचा सुधारित मसुदा तयार झाला.

हा मसुदा अध्यक्ष या नात्याने राजेंद्र प्रसादांना पाठवला गेला. त्यासोबतच संविधानसभेने प्रांतिक विधिमंडळे, वकिलांच्या संघटना आणि अगदी सर्वसामान्य नागरिक या सर्वांनी प्रश्न, दुरुस्त्या, नव्या कल्पना सुचवाव्यात यासाठी आवाहन केले. वर्तमानपत्रे, आकाशवाणी यांसारख्या प्रसारमाध्यमातून त्यांच्यापर्यंत पोहोचवले. या आवाहनाला प्रतिसाद देत वेगवेगळ्या भागातून, समूहांमधून अनेक सूचना आल्या. यातल्या प्रत्येक पत्राची पोच संविधानसभेने दिली आहे. जास्तीत जास्त २ महिन्यात यातील प्रत्येक व्यक्तीला / संघटनेला संविधानसभेने प्रतिसाद दिला. त्या सगळ्याचा दस्तावेज संविधानसभेच्या वादांच्या खंडांमध्ये वाचायला मिळतो. तंत्रज्ञान विशेष प्रगत नसताना संविधान निर्मितीच्या प्रक्रियेत लोकांना सहभागी करुन घेण्याचा संविधानसभेचा प्रयत्न केवळ अभूतपूर्व होता ! त्यातून संविधानसभेचा प्रामाणिक लोकशाहीवादी हेतू दिसतो.

अखेरच्या टप्प्यात संविधानसभेने काही सूचना आणि दुरुस्त्या यांचा विचार करुन त्याचा स्वीकार केला. संविधानसभेने नोव्हेंबर १९४९ च्या अखेरच्या सत्रात अंतिम मसुद्यावर चर्चा केली आणि २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानाचा स्वीकार केला. त्यानंतर दोनच महिन्यांनी २६ जानेवारी १९५० रोजी संविधान लागू झाले आणि देश प्रजासत्ताक झाला.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. भारताच्या संविधानसभेतील केंद्रासाठीच्या व प्रांतांसाठीच्या दोन्ही समित्यांचे अध्यक्ष कोण होते ?
२. कोणत्या योजनेनुसार संविधानसभेची स्थापना करण्यात आली ?
३. भारतीय राष्ट्रीय काँ ग्रेस्ची स्थापना केव्हा झाली ?
४. भारतीय संविधान केव्हा स्वीकारले गेले ?

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **वसाहतवाद :** आर्थिक दृष्ट्या संपन्न व लष्करी दृष्ट्या समर्थ देशाने आपल्या सामर्थ्याच्या बळावर एखादा भूप्रदेश काबीज करुन त्या ठिकाणी वसाहत स्थापून त्या देशावर राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या व त्याचे आर्थिक शोषण करण्याच्या प्रक्रियेस वसाहतवाद म्हणतात. वसाहतवाद हे साम्राज्यवादाचेच एक विशेष रुप आहे.
- **संविधानसभा :** देशाचे संविधान निर्माण करण्याची विशेष जबाबदारी असलेली संस्थात्मक रचना.
- **भांडवलवाद :** भांडवलशाहीच्या आर्थिक व्यवस्थेत मालकीच्या वस्तू खाजगी व्यक्ती/ कंपन्या यांच्याकडे असतात. मागणी व पुरवठा या आधारे आर्थिक व्यवस्था सुरु असते तसेच या व्यवस्थेत नफा केंद्रस्थानी असतो. प्रत्येक व्यक्तीला आपले हित समजले आपली हित साध्य करून घेण्याला अनुकूल अशी स्वातंत्र्याची परिस्थिती निर्माण करणे ही शासनाची जबाबदारी आहे. याशिवाय शासनाने कुठलाही हस्तक्षेप अर्थकारणामध्ये करू नये असंही भांडवशाही तत्त्वज्ञान मानते.

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) पं. नेहरु

२) कॅबिनेट मिशन योजना

३) २८ डिसेंबर १८८५

४) २६ नोव्हेंबर १९४९

१.५ सारांश

भारताच्या संविधान निर्मितीचा इतिहास रोचक आहे. खंडप्राय असलेल्या या देशात लोकशाही रुजवण्यासाठी सशक्त संविधानाची आवश्यकता होती. त्यासाठीच संविधानसभेची स्थापना करण्यात आली आणि या सभेने ऐतिहासिक कार्य केले. एक चौकट आखून वसाहत असलेल्या भारताला लोकशाही देश म्हणून उभे करण्यात भारतीय संविधानसभेचे पायाभूत योगदान आहे. भारतीय भूप्रदेश वसाहत राहिला नाही. तो एक सार्वभौम, लोकशाही, समाजवादी प्रजासत्ताक देश झाला. या नव्या देशात प्रजा नव्हती तर संविधानाने हक्क प्रदान केलेले नागरिक जन्माला आले होते. एका नव्या देशासाठीचे, परिवर्तनासाठीचे वाहन म्हणून संविधान सोबतीला होते. संविधानकर्त्यांनी उद्देशिकेच्या मार्फत सर्व भारतीयांच्या वतीने एक शपथपत्र घेतले. हे शपथपत्र सर्वांनी लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे कारण संविधानाच्या निर्मितीमागचे अतोनात कष्ट त्यामागे आहेत. तसेच देशाच्या भविष्याचे संकल्पपत्रच संविधानाच्या माध्यमातून मांडलेले आहे.

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१. कोणत्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर भारतीय संविधान लिहिले गेले?

२. भारताच्या संविधान सभेची निर्मिती कशाप्रकारे झाली?

३. संविधान सभेमध्ये कोणकोणत्या वैचारिक पार्श्वभूमीतून आलेले लोक होते? भारतीय संविधान सभेचे वैचारिक रिंगण कसे होते?

१.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके

१. शानी, ऑर्निट. (२३ जानेवारी २०१८). *हाऊ इंडिया बिकेम डेमोक्रॅटिकः सिटीझंशिप ऍंड मेकिंग ऑफ द युनिवर्सल फ्रांचाइज.* पेंग्विन व्हायकिंग.

२. डे, रोहित (२०१८), अ पीपल्स कॉन्स्टीट्यूशन, प्रिन्सटन युनिव्हर्सिटी प्रेस.

घटक २ : भारतीय संविधानाचे स्त्रोत

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय-विवेचन

२.२.१ भारतीय संविधानावरील प्रभाव

२.२.२ भारतीय संविधानाचे स्त्रोत

२.३ भारतीय संविधानावरील टीका

२.४ सरावासाठी स्वाध्याय

२.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

२.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- भारतीय संविधान कर्त्यांनी संविधान निर्मितीत स्त्रोतांबाबत केलेला विचार समजून येईल.
- भारतीय संविधानाचे विविध स्त्रोत समजतील.

२.१ प्रास्ताविक

"भारतीय संस्कृती हे इतिहास, आध्यात्मिकता आणि विविधता यांच्या धाग्यांनी विणलेले मोठे कापड आहे. भारताचे हे अंतर्बाह्य सौंदर्य जगातील सर्वांना खुणावते आणि अनुभवावे, असे वाटते."

रवींद्रनाथ टागोर

टागोरांनी भारतीय संस्कृतीचे किती नेमके वर्णन केले आहे ! विविधतेने नटलेली संस्कृती असलेल्या अशा देशासाठी संविधानाची निर्मिती करण्याचे काम सोपे नव्हते कारण विविधतेने देश समृद्ध होतो त्याचप्रमाणे काही वेळा विविधतेचा अडथळाही होऊ शकतो. सर्वांना सामावून घेईल आणि सर्वांचा विचार केलेला असेल, असे संविधान निर्माण करणे म्हणूनच आव्हानात्मक होते. त्यामुळेच संविधानकर्त्यांनी सुमारे साठहून अधिक संविधानांचा अभ्यास केला. भारतीय परंपरेचा विचार केला. भारतीय संस्कृतीचा अभ्यास केला. ब्रिटिशांनी केलेल्या कायद्यांचे अवलोकन केले. या सर्व अभ्यासातून भारतातील वास्तवास सुसंगत असलेल्या बाबींचा विचार केला आणि त्यातील काही बाबींचा स्वीकार केला.

२.२ विषय-विवेचन

भारतीय संविधानाचे अनेक स्त्रोत आहेत. काही स्त्रोतांचा थेट प्रभाव आहे तर काही घटकांचा अप्रत्यक्षपणे भारतीय संविधानावर प्रभाव पडला आहे. भारतीय संस्कृती, भारताचे स्वातंत्र्य आंदोलन, सामाजिक समतेचे आंदोलन यांच्या प्रभावातून आणि ब्रिटिशांनी केलेले कायदे आणि जगभरातील विविध देशांचे कायद्याचे दस्तावेज या स्त्रोतांमधून संविधान जन्माला आले.

२.२.१ भारतीय संविधानावरील प्रभाव

१. भारतीय संस्कृती

भारत देश म्हणून अस्तित्वात आला वासाहतिक काळात; मात्र या भूभागात एक वैशिष्ट्यपूर्ण अशी संस्कृती निर्माण झालेली होती. ही संस्कृती बहुपेडी, बहुपदरी आहे. त्यातील अनेक मूल्ये भारतीय जनमानसात रुजली. उपनिषदांमध्ये 'वसुधैव कुटुंबकम' असे म्हटले गेले. याचा अर्थ संपूर्ण विश्व हेच कुटुंब आहे. वारकरी परंपरेतल्या संत ज्ञानेश्वरांनी 'हे विश्वचि माझे घर' असे म्हटले होते तर सुफी परंपरेतले ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती यांनी सांगितले होते की खुदाच्या दोस्ताने पृथ्वीसारखं उदार असलं पाहिजे आणि सर्वांना एक आहे, असं मानलं पाहिजे. 'सर्वे भवन्तु सुखिनः' हे देखील भारतीय परंपरेतील एक सुप्रसिद्ध वचन आहे. याचा अर्थ सर्व प्राणिमात्रांचे हित व्हावे. समतेचा, एकतेचा आणि एकात्मतेचा संदेश देणारे असे अनेक संदर्भ भारतीय सांस्कृतिक परंपरेत आढळतात.

गौतम बुद्धांनी समतेचा विचार आग्रहाने मांडला. त्यांनी स्थापन केलेले भिक्खू महासंघ लोकशाही तत्त्वांनुसार आचरण करत होते. 'मेत्ता' हा शब्द गौतम बुद्धांनी वापरला. त्याचा अर्थ मैत्र. त्याचाच संदर्भ देत बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही त्रिसूत्री आपण फ्रेंच राज्यक्रांतीकडून उसनवारीने घेतली नसून ती बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून घेतली आहे.

बुद्धाप्रमाणेच वर्धमान महावीर यांनीही अहिंसेचा संदेश दिला. चार्वाकाने 'प्रत्यक्ष हेच प्रमाण' मानले पाहिजे, असे सांगत वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आग्रह धरला. वैदिक संहितांमध्ये समतेचे मूल्य नसले तरी 'सभा', 'समिती' यासारख्या लोकशाहीस पूरक अशा संस्थात्मक रचना अस्तित्वात होत्या. बाराव्या शतकात संत बसवेश्वरांनी 'अनुभवमंटप' नावाची एक कल्पना मांडली. सर्वांनी एकत्र चर्चा करुन, विमर्श करुन मार्ग काढण्यासाठीची ही जागा होती. आजच्या संसदीय लोकशाहीचे अगदी प्राथमिक रुप असे तिला म्हणता येईल. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' असे सांगणारे संत तुकाराम समतेच्या हक्काचा मुद्दाच त्यांच्या अभंगांमधून सांगत होते.

थोडक्यात, महानुभाव, वारकरी, भक्ती आणि सुफी अशा अनेक परंपरांमध्ये संविधानातील मूल्यांचा विचार नेमकेपणाने मांडलेला दिसून येतो.

संविधानाचे हस्तलिखित तयार झाले तेव्हा त्यातील बावीस भागांच्या सुरुवातीला चित्रे आहेत. यात भारतीय परंपरा दिसून येते. सिंधू संस्कृतीचे प्रतीक असलेला बैलाचा शिक्का अगदी पहिल्या भागात आहे. लंकेच्या युद्धानंतर प्रभू राम, सीता, लक्ष्मण परतत असतानाचे चित्र संविधानाच्या तिस-या भागाच्या सुरुवातीला आहे तर चौथ्या भागाची सुरुवात होते कृष्णासोबत चर्चा करणा-या अर्जुनाच्या चित्राने. पाचव्या भागाच्या सुरुवातीला आहेत पशुपक्ष्यांसोबत रमलेले गौतम बुद्ध आणि सहाव्या भागाच्या सुरुवातीला आहेत वर्धमान महावीर. महाबलीपुरममधील शिल्पांच्या चित्राने तेरावा भाग सुरु होतो. धर्म आणि संस्कृतीविषयक वैविध्य असलेली अशी अनेक चित्रं दिसतात. ब्रिटिश सत्तेच्या विरोधात ज्यांनी प्राणपणाने लढा दिला अशा टिपू सुलतान यांचेही चित्र संविधानाच्या पानावरती आहे.

या सर्व परंपरेचा प्रभाव संविधानकर्त्यांवर होता. स्वाभाविकच संविधानातील मूलभूत हक्क, राज्यासाठीची मार्गदर्शक तत्वे अशा अनेक भागांमधील तरतुदी या मूल्यांमधून आकाराला आल्या आहेत.

२. सामाजिक समतेचे आंदोलन

युरोपातील दोन घटकांमुळे सार्वजनिक चर्चाविश्व ढवळून निघाले. पहिला घटक होता पुनर्जागरण (रेनेसांस) आणि दुसरा होता प्रबोधन (एनलायटनमेंट). पुनर्जागरण हे 'रेनेसांस' या शब्दाचे मराठी भाषांतर आहे. हा मूळ फ्रेंच शब्द आहे. त्याचा अर्थ होतो पुनर्जन्म. पुनर्जन्म याचा येथे शब्दार्थ घेणे योग्य नाही. पुनर्जन्माचा अर्थ पुनर्जागरण, नवी जाणीव निर्माण होणे. पाश्चात्य जगतात धर्मातील कर्मठ धारणा आणि आधुनिक मूल्ये यांच्यातला संघर्ष सुरु झाला. ईश्वर हा जगाचा केंद्रबिंदू नसून माणूस हा जगाचा केंद्रबिंदू आहे अशी मांडणी केली जाऊ लागली. धर्मातील अनेक चुकीच्या धारणांना विरोध केला गेला. कला, विज्ञान, तत्त्वज्ञान क्षेत्रात मोठी स्थित्यंतरे झाली. साधारण चौदाव्या ते सोळाव्या शतकाच्या दरम्यान ही चळवळ युरोपामध्ये सुरु होती. कोपर्निकस, सिसेरो, मोझार्ट अशा अनेक व्यक्तींनी पुनर्जागरणाच्या चळवळीमध्ये मोलाचे योगदान दिले.

यानंतरची दुसरी चळवळ घडली ती प्रबोधनाची (एनलायटनमेंट). औद्योगिक क्रांतीच्या बदलानंतर प्रबोधनाच्या चळवळीने जोर धरला. तर्क, विवेक यावर आधारित जीवन असले पाहिजे. त्यानुसार शिक्षण असले पाहिजे, हे सांगितले गेले. वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्व अधोरेखित केले जाऊ लागले. प्रयोग करा, तर्काचा वापर करा आणि आंधळेपणाने कोणत्याही बाबींवर विश्वास ठेवू नका, असे आग्रहाने सांगितले जाऊ लागले. त्यामुळेच या प्रबोधन युगाला 'विवेकाचे युग' असेही म्हटले गेले आहे. साधारण सतराव्या आणि अठराव्या शतकातल्या या प्रबोधन चळवळीने युरोपीय जनमानस ढवळून निघाले. दे कार्त, व्हॉल्टेअर, डेविड ह्यूम, जॉन लॉक, रुसो अशा तत्वज्ञांच्या मांडणीने प्रबोधन चळवळीस मदत झाली. या दोन चळवळींमुळे समतेचे विचारविश्व पुढे गेले.

या दोन्ही चळवळींचा भारतावर परिणाम व्हायला सुरुवात झाली एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीला. भारतामध्ये लॉर्ड मेकॉलेने पाश्चात्य शिक्षणास सुरुवात केल्यानंतर अनेक भारतीयांना युरोपातल्या संस्कृतीचा परिचय होऊ लागला. पाश्चात्य विचारवंतांनी धर्माच्या वर्चस्वाला कशा प्रकारे विरोध केला आहे, हे त्यांच्या ध्यानात आले. त्यातूनच सती प्रथेला विरोध केला गेला. बालविवाहाच्या प्रथेवर बंदी आणून विवाहाच्या संमतीचे वय ठरवण्याचे प्रयत्न केले गेले. एकोणीसाव्या शतकात राजा राममोहन रॉय, जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ हरी देशमुख, ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी दयानंद सरस्वती, पंडिता रमाबाई, सय्यद अहमद खान, महादेव गोविंद रानडे अशा अनेक समाजसुधारकांनी समतेचा आग्रह धरला. त्यानंतरच्या काळातही गोपाळ गणेश आगरकर, राजर्षि शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, बाबासाहेब आंबेडकर, पेरियार रामास्वामी अशा अनेकांनी जात आणि धर्म या दोन्हींमधून निर्माण झालेल्या विषमतेवर कडाडून प्रहार केला. २५ डिसेंबर १९२७ रोजी बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले. हिंदू धर्मातील महत्वाच्या मानल्या जाणा-या या ग्रंथात 'न स्त्री स्वातंत्र्यः अर्हति' अर्थात स्त्रियांना स्वातंत्र्य देताच कामा नये, असे म्हटले होते. विषमतेची शिकवण देणा—या या ग्रंथाचे दहन करुन समतेच्या दिशेने जाण्याची वाट बाबासाहेब आंबेडकरांमुळे अधिक प्रशस्त झाली.

या सर्व चळवळीने तीन बाबी अधोरेखित केल्या.

१) सर्व मानव समान आहेत.

२) त्यामुळेच त्यांना समान प्रतिष्ठा असली पाहिजे.

३) वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात दर्जाची व संधीची समानता असली पाहिजे.

हे तीनही मुद्दे संविधानाच्या निर्मितीमध्ये निर्णायक ठरले. त्यातून समतेचे अधिकार आणि समाजवादी सार्वजनिक धोरणे आखण्यास मदत झाली.

३. भारतीय स्वातंत्र्य आंदोलन

संविधानावर सर्वाधिक प्रभाव पडला तो भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा. एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सामाजिक समतेचे आंदोलन सुरु झाले तर उत्तरार्धात राजकीय स्वातंत्र्याचे आंदोलन तीव्र झाले. १८५७ च्या लढ्याने राजकीय स्थित्यंतरास वेग आला. अनेक राजकीय संघटना आपापल्या परीने ब्रिटिशांच्या साम्राज्यवादाला विरोध करु लागल्या. त्या सर्व संघटना विखुरलेल्या होत्या. काँग्रेसची (राष्ट्रीय सभेची) १८८५ साली स्थापना झाली आणि विरोधाला संघटित रुप आले.

काँग्रेसच्या स्थापनेपासून ते स्वातंत्र्यापर्यंतच्या कालखंडाचे तीन टप्प्यांमध्ये विभाजन केले जाते. सुरुवातीच्या १८८५ ते १९०५ या काळात अर्ज विनंत्या, मागण्या यांच्याद्वारे ब्रिटिशांकडे न्याय मागितला गेला. ब्रिटिश सरकार ब्रिटनमध्ये ब्रिटिश नागरिकांना ज्या पद्धतीचे अधिकार बहाल करते तशा पद्धतीचे अधिकार भारतात भारतीयांना मिळावेत असेही या अर्ज विनंती स्वरूप होते. गोपाळकृष्ण गोखलेंसारखे नेमस्त नेते या काळात नेतृत्व करत होते. त्यापुढील १९०५ ते १९२० या काळात बाळ गंगाधर टिळक यांनी काँग्रेसच्या लढ्याला काहीसे जहाल रुप दिले. टिळकांच्या मृत्यूनंतर १९४७ पर्यंत मोहनदास करमचंद गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने लढा दिला. जवाहरलाल नेहरु, मौलाना आझाद, सरदार पटेल अशा नेत्यांचे स्वातंत्र्यलढ्यात मोठे योगदान आहे.

स्वातंत्र्य आंदोलनाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर ब्रिटिश साम्राज्याच्या अंतर्गत स्वराज्य (डॉमिनियन स्टेटस) मिळावा, अशी मागणी केली जात होती. नेहरु अहवालामध्येही (१९२८) हीच मागणी होती. राष्ट्रीय चळवळीतल्या लोकांनी सायमन आयोगावर बहिष्कार टाकला आणि त्यांनी नवीन संविधान निर्मिती करण्याचे आव्हान स्वीकारले. यात सर्वांच्या सहमतीचे आव्हान लक्षात घेऊन ऑल इंडिया लिबरल फेडरेशन, ऑल इंडिया मुस्लिम लीग, शीख सेंट्रल लीग आणि इतर संघटनांसोबत १९ मे १९२८ रोजी संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी समिती गठित करण्यात आली. या समितीमध्ये मोतीलाल नेहरु, सर अली इमाम, तेज बहाद्दूर सप्रू आणि सुभाषचंद्र बोस यांसारखे सदस्य होते. पुढे ऍनी बेझंट आणि एम. आर. जयकर समितीमध्ये सामील झाले. पं. जवाहरलाल नेहरु या समितीचे सचिव होते. जवळपास २२ प्रकरणांमध्ये विभागलेल्या या अहवालामध्ये ८७ कलमं होती. नागरिकत्व, मूलभूत हक्क ते मार्गदर्शक तत्त्वे या सा-या बाबींचा समावेश या अहवालात होता. मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याऐवजी ज्या मतदारसंघात मुस्लिम अल्पसंख्य आहेत तिथे त्यांना आरक्षण देण्यात आले. संसदीय लोकशाहीचे प्रारूप या अहवालातून स्वीकारले गेले. तसेच सर्वांना मतदानाचा हक्क असेल, अशी तरतूदही केली गेली.

यापुढील लाहोरच्या अधिवेशनाने स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा मिळाली. या अधिवेशनात १९ डिसेंबर १९२९ रोजी जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली पूर्ण स्वराज्याचा ठराव मांडला गेला. हा ठराव राजकीय जाहीरनाम्याच्या परिभाषेत होता. आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या ब्रिटिशांनी भारतीयांचे अतोनात शोषण केले आहे. आता ब्रिटिशांना सहकार्य करत राहणे म्हणजे मानवतेविरुद्धचा गुन्हा आहे. त्यामुळे इथून पुढे आपण ब्रिटिशांना स्वेच्छेने सहकार्य करणार नाही. हे सारे युक्तिवाद करुन अखेरीस या अहवालात म्हटले होतेः आम्हाला पूर्ण स्वराज्य हवे आहे मात्र ते अहिंसेच्या मार्गाने. स्वातंत्र्य प्राप्त करण्याचा सर्वांत प्रभावी मार्ग म्हणजे अहिंसा होय. भारताचा स्वातंत्र्यलढा प्रामुख्याने अहिंसक पद्धतीने झाला, यातूनही देशाचे मूल्यात्मक अधिष्ठान बळकट झाले.

नेहरु अहवालाप्रमाणेच कराचीचा ठरावही महत्वाचा ठरला. कायद्याच्या परिभाषेत लिहिलेल्या या ठरावात चार भाग होतेः १. मूलभूत हक्क आणि तत्त्वे २. श्रम ३. कर आणि खर्च ४. आर्थिक आणि सामाजिक कार्यक्रम. संविधानातील तरतुदी ठरवत असताना कराची ठरावाचाही उपयोग झाला. त्यानंतर १९३५ च्या भारत सरकार कायद्याने संविधानातील संघराज्यवादाचा आराखडाही निश्चित झाला. (त्याबाबतची चर्चा पुढील भागात आहे.)

थोडक्यात, स्वातंत्र्य आंदोलनाने काही महत्वाच्या बाबी अधोरेखित केल्या.

१. ब्रिटिशांना भारतीय लोकांवर राज्य करण्याचा कोणताही अधिकार नाही. भारतीय लोकांपेक्षा श्रेष्ठ असल्याच्या ब्रिटिशांच्या धारणेला कोणताही आधार नाही.

२. भारतीय लोक स्वतःचे शासन स्वतः करु शकतात. त्यासाठी सर्वसहमतीने संविधान तयार करु शकतात.

३. सर्व व्यक्तींना अभिव्यक्तीचे आणि जगण्याचे मूलभूत स्वातंत्र्य आहे.

या तीनही बाबी संविधानाच्या निर्मितीच्या वेळी निर्णायक ठरल्या.

२.२.२ भारतीय संविधानाचे स्त्रोत

भारताच्या संविधानाची निर्मिती केली जात असताना विविध स्त्रोतांचा विचार केला गेला. दुस–या महायुद्धानंतर अनेक देशांना स्वातंत्र्य मिळाले होते. त्यामुळे स्वाभाविकच नव्या देशाची बांधणी करण्यासाठी संविधानविषयक विचार विमर्श उदयाला आलेला होता. भारताच्या संविधानासाठी पहिला महत्वाचा स्त्रोत होता १९३५ चा भारत सरकार कायदा.

क) भारत सरकार कायदा, १९३५

साधारण १९३०च्या दशकात संवैधानिक सुधारणा व्हाव्यात म्हणून काँग्रेसने जोरकसपणे मागण्या करायला सुरुवात केली. ब्रिटिशांना या मागण्यांकडे दुर्लक्ष करणे कठीण झाले. कराची ठरावानंतर आणखी एक गोलमेज परिषद पार पडली. या परिषदेतही भारतीयांच्या हक्कांच्या अनुषंगाने बरेच मंथन झाले. अखेरीस लॉर्ड लिनलिथगो यांच्या नेतृत्वातील संयुक्त निवड समितीने १९३५ चा भारत सरकार कायदा तयार केला. ब्रिटिश संसदेने तो संमत केला. ब्रिटिशांच्या प्रशासकीय इतिहासातला हा कायदा सर्वांत मोठा लिखित दस्तावेज आहे. या कायद्यामध्ये ३२१ अनुच्छेद आहेत. हा कायदा ११ भागात आणि १० परिशिष्टांमध्ये विभागलेला आहे. त्यात पुन्हा स्वतंत्र प्रकरणं आहेत. सुमारे दोन हजारहून अधिक संसदीय भाषणांच्या आधारे या कायद्याचा मसुदातयार झाला.

या कायद्यातील काही लक्षवेधी वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणेः

१. **संघराज्यवादाची चौकट** : या कायद्याने भारतीय संघराज्यवादाची चौकट निर्धारित केली. संपूर्ण देश पातळीवर संघराज्यवादाचा एक आराखडा या कायद्याद्वारे आखण्यात आला. संस्थाने आणि विविध प्रांत यांचा घटकराज्य म्हणून विचार केला गेला.

२. **विषयसूची** : या कायद्याने प्रथमच केंद्र आणि राज्य यांच्यातील सत्तेची विभागणी करण्यासाठी तीन प्रकारच्या विषयसूची तयार केल्या गेल्या अ) केंद्र सूची ब) प्रांतांसाठीची सूची क) समवर्ती सूची. केंद्र सूचीमधील विषयांवर निर्णय घेण्याचा अधिकार केंद्राचा, प्रांतांसाठीच्या सूचीमधील विषयांवर निर्णय घेण्याचा अधिकार प्रांतांना मात्र समवर्ती सूचीमधील विषयांवर निर्णय घेण्याचा अधिकार दोन्हींना असेल. इतर अधिकार गव्हर्नरकडे असतील. अशा प्रकारची आखणी या कायद्याद्वारे निश्चित झाली मात्र संघराज्याची रचना अस्तित्वात आली नाही कारण संस्थानांनी संघराज्यात सामील होण्यास नकार दिला. नंतर भारतीय संविधानातही याच धर्तीवर सत्ता विभागणी ठरवली गेली.

३. **प्रांतिक स्वायत्तता** : या कायद्याद्वारे ब्रिटिश भारतातील प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली. स्वतंत्रपणे प्रशासन करण्यास मुभा देण्यात आली. प्रांतांमध्ये उत्तरदायी शासन निर्माण करण्याची तरतूदही झाली. त्यानुसार प्रांतांमधील मंत्र्यांच्या सल्ल्यानुसार गव्हर्नरने काम करावे, असेही या कायद्यात म्हटले होते. या कायद्यानुसार प्रांतिक विधिमंडळे १९३७ च्या निवडणुकीनंतर अस्तित्वात आली मात्र १९३९ ला बरखास्त करण्यात आली.

४. **केंद्र पातळीवरील व्यवस्था** : केंद्र पातळीवर द्विदल राज्यव्यवस्था स्थापन करुन केंद्राकडील विषयांमध्येही विभागणी करण्यात आली. राखीव विषय (रिझर्वड सब्जेक्टस) आणि हस्तांतरित विषय (ट्रान्सफर्ड सब्जेक्ट्स) असे दोन प्रकार केले गेले. ही तरतूद प्रत्यक्षात राबवली गेली नाही.

५. **दोन सभागृहांची रचना** : या कायद्यान्वये, तत्कालीन ब्रिटिश भारतातील ११ प्रांतांपैकी ६ प्रांतांमध्ये दोन सभागृहांची रचना अस्तित्वात आली. बंगाल, बॉम्बे, मद्रास, बिहार, आसाम आणि संयुक्त प्रांत या ६ प्रांतांमध्ये विधानसभा आणि विधान परिषद अशी दोन सभागृहांची रचना उदयास आली.

६. **जमातवादी प्रतिनिधित्व** : ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या नीतीनुसार १९०९ च्या मोर्ले मिंटो कायद्यापासूनच जमातवादी प्रतिनिधित्वाची तरतूद केलेली होती. टप्प्याटप्प्याने हे प्रतिनिधित्व वाढवत नेले. या कायद्यान्वये असे प्रतिनिधित्व शोषित समूह (तत्कालीन डिप्रेस्ड क्लास नंतरचा अनुसूचित जमातींचा वर्ग), स्त्रिया आणि मजूरांसाठीही असेल, हे या कायद्याने निर्धारित झाले.

७. **रिझर्व बॅन्क ऑफ इंडिया** : स्वतंत्र भारताच्या आर्थिक वाटचालीमध्ये या बॅन्केने मोलाची भूमिका बजावली. अशा प्रकारची बॅन्क असली पाहिजे, हे १९२६ साली रॉयल कमिशनने सुचवले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'प्रॉब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथात अशा मध्यवर्ती बॅन्केची आवश्यकता प्रतिपादित केलेली होती. अखेरीस या बॅन्केची स्थापना १९३५ च्या कायद्यान्वये झाली.

८. **लोक सेवा आयोग** : या कायद्यान्वये केंद्रीय पातळीवर आणि प्रांतिक पातळीवर लोक सेवा आयोगाची स्थापना करण्यात आली. याशिवाय संयुक्त लोक सेवा आयोगासाठीची तरतूदही या कायद्यानुसार करण्यात आली.

९. **मताधिकार** : प्रत्यक्ष निवडणुकांसाठीची तरतूद करतानाच तत्कालीन भारताच्या लोकसंख्येच्या सुमारे १० टक्के लोकांना मतदान करता येईल, अशी व्यवस्था या कायद्यानुसार करण्यात आली.

१०. **प्रांतांची पुनर्रचना** : बॉम्बे प्रांतामधून सिंध वेगळा करण्यात आला. बिहार आणि उडीसा स्वतंत्र प्रांत म्हणून उदयास आले. एकूणात ब्रिटिश भारताची वेगळी रचना करण्याचा प्रयत्न या कायद्याने केला.

११. **केंद्रीय पातळीवरील न्यायालय** : केंद्र आणि राज्य यांच्यातील सत्ताविभागणी सोबतच केंद्र पातळीवर न्यायालय (फेडरल कोर्ट) असावे, असेही या कायद्याने सुचवले. त्यानुसार १९३७ साली असे न्यायालय स्थापन झाले. संविधानातील सर्वोच्च न्यायालयाची कल्पना ही याच न्यायालयाच्या धर्तीवर निर्माण झालेली आहे.

एकूणात १९३५ च्या भारत सरकार कायद्यानुसार भारतीय संविधानातील केंद्र राज्य संबंध आणि एकूणात संघराज्यवादाची चौकट साकारली गेली. भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी हा कायदा एक महत्वाचा आधारभूत दस्तावेज राहिला.

ख) ब्रिटिश राजकीय परंपरा

ब्रिटिशांचे साम्राज्य सुमारे तीन शतके असल्याने स्वाभाविकच ब्रिटिश राजकीय परंपरेतील काही बाबींचा स्वीकार भारतीय संविधानामध्ये केला गेला आहे. ब्रिटिश संविधान लिखित स्वरूपात उपलब्ध नाही; मात्र त्यातील अनेक बाबी या राजकीय प्रथेतून आणि परंपरेतून आल्या आहेत. ब्रिटिशांनी भारतावर राज्य करतानाही काही नियम, अटी आणि कायदे यांचा वापर केला. भारतीय संविधानाचा हा एक महत्वाचा स्त्रोत राहिला आहे. ब्रिटिश राजकीय परंपरेतून स्वीकारलले घटक पुढीलप्रमाणेः

१. **कायद्याचे राज्य** : ब्रिटिशांमुळे 'कायद्याचे राज्य' ही संकल्पना भारतामध्ये रुजली. राज्यसंस्था निरंकुश स्वरूपाची असणार नाही तर राज्यसंस्थेतील कारभार कायद्यानुसार होईल, हे कायद्याच्या राज्याचे तत्त्व आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद १४ नुसार, राज्य कोणत्याही व्यक्तीस कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण हे तत्त्व नाकारणार नाही. येथे कायद्याच्या राज्याचे महत्व अधोरेखित होते.

२. **संसदीय लोकशाही** : स्वतंत्र भारतामध्ये कोणत्या प्रकारची लोकशाही असेल, हे ठरवणे सोपे नव्हते. संविधानसभेने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. संसदीय लोकशाहीमध्ये पंतप्रधान पदावरील व्यक्ती कार्यकारी मंडळाची प्रमुख असते. पंतप्रधानांची निवड कायदेमंडळातून होते. कायदेमंडळातील व्यक्ती लोकनिर्वाचित असतात. संसदीय लोकशाहीमध्ये विरोधी पक्षांनाही अस्तित्व असते. मुख्य म्हणजे, संसदीय लोकशाही सामूहिक नेतृत्वावर आधारित असते. चर्चा, वाद विवाद, विमर्श यास मोठा अवकाश संसदीय लोकशाहीमध्ये असतो. ब्रिटनमध्ये अशा प्रकारच्या लोकशाहीची मोठी परंपरा आहे. भारताच्या संविधानातील पाचव्या भागात केंद्र पातळीवरील तर सहाव्या भागात राज्यांमधील संसदीय कार्यपद्धतीच्या अनुषंगाने तरतुदी केलेल्या आहेत.

३. **एकेरी नागरिकत्व** : संपूर्ण भारतीय राज्यक्षेत्रात प्रत्येक व्यक्ती भारतीय नागरिक आहे. तिला घटकराज्यांचे वेगळे नागरिकत्व नाही. तसेच एकाच वेळी भारताचे आणि दुसऱ्या कोणत्याही देशाचे नागरिकत्व घेता येत नाही. भारतीय व्यक्ती ही एका वेळी फक्त भारतीय नागरिकच असू शकते. ही एकेरी नागरिकत्वाची कल्पनादेखील ब्रिटिश संविधानाच्या प्रेरणेतून आली आहे. भारतीय संविधानाच्या दुसऱ्या भागात या एकेरी नागरिकत्वाविषयी तरतुदी आहेत.

४. **प्राधिलेख (रिट)** : भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२ अतिशय महत्वाचा आहे. मूलभूत हक्कांचा संरक्षक म्हणून हा अनुच्छेद ओळखला जातो. मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास या अनुच्छेदाचा आधार घेऊन व्यक्ती सर्वोच्च न्यायालयात दाद मागू शकते. व्यक्तीच्या मूलभूत हक्कांची अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्वोच्च न्यायालय वेगवेगळे प्राधिलेख काढू शकते. देहोपस्थिती (हेबियस कॉर्पस), महादेश (मॅन्डॅमस) प्रतिबंध (प्रोहिबिशन), क्वाधिकार (को वारंटो) व प्राकर्षण (सर्शिओराराय) असे प्राधिलेख काढण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहेत. अशा प्रकारचे प्राधिलेख काढण्याची परंपरा ब्रिटनमध्ये आहे. त्याच धर्तीवर भारतीय संविधानात हे स्वीकारले गेले. अनुच्छेद ३२ प्रमाणेच अनुच्छेद २२६ नुसार उच्च न्यायालयासही असे अधिकार आहेत.

ग) अमेरिकन संविधान

४ जुलै १७७६ रोजी अमेरिकेला स्वातंत्र्य मिळाले आणि त्यानंतरच्या दशकात अमेरिकेचे संविधान लिहिले गेले. थॉमस जेफरसनने मानवी हक्कांचा जाहीरनामा मांडला. हा जाहीरनामा इतर अनेक देशांसाठी प्रेरणादायी ठरला. नंतरही अमेरिकन संविधानात बरेच बदल केले गेले. त्यातील काही बदलांचा विचार इतर देशांनी केलेला दिसतो.

१. **मूलभूत हक्क** : भारतीय संविधानातील तिसरा भाग आहे मूलभूत हक्कांचा. साधारण सहा प्रकारचे हक्क या विभागात आहेतः समतेचे हक्क, स्वातंत्र्याचे हक्क, शोषणाच्या विरुद्धचे हक्क, धर्मविषयक स्वातंत्र्याचे हक्क, सांस्कृतिक व भाषिक हक्क आणि मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास दाद मागण्याचे हक्क. या मूलभूत हक्कांची मांडणी करताना अमेरिकन संविधानातील हक्कांची सनद (बिल ऑफ राइट्स) विचारात घेतली गेली आहे. संविधान सभेत मूलभूत हक्कांविषयी चर्चा सुरु असताना संयुक्त राष्ट्रांच्या सभेतही मानवी हक्कांविषयी मंथन सुरु होते. संयुक्त राष्ट्र संघटनेने १० डिसेंबर १९४८ साली मानवी हक्कांचा जाहीरनामा मांडला. ही चर्चाही मूलभूत हक्क ठरवताना उपयोगी ठरली.

२. **न्यायिक पुनर्विलोकन :** कायदेमंडळाने एखादे विधेयक पारित केले की त्याचे रूपांतर कायद्यात होते. तो कायदा संविधानाच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत असल्यास न्यायिक पुनर्विलोकन उपयुक्त ठरते. अमेरिकेमध्ये न्यायालयास एखादा कायदा संवैधानिक आहे अथवा नाही, हे ठरवण्याचा अधिकार दिलेला आहे. भारतानेही हा अधिकार न्यायालयास दिलेला आहे. त्यामुळे एखादा कायदा असंवैधानिक आहे, असे निकालपत्र न्यायालय देऊ शकते. उदाहरणार्थ, २०१८ साली निवडणूक रोखे (इलेक्टोरल बॉन्ड) योजना वित्तीय कायद्यांमध्ये दुरुस्ती करुन राबवण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने २०२४ साली सदर कायद्यातील दुरुस्ती अवैध ठरवली. यास न्यायिक पुनर्विलोकन असे म्हटले जाते.

३. **राष्ट्रपती आणि न्यायाधीशांचा महाभियोग :** भारतीय संविधानातील ६१ व्या अनुच्छेदामध्ये संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या माध्यमातून राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांना पदावरुन हटवण्यासाठीची कार्यपध्दती सांगितलेली आहे. या पद्धतीस महाभियोग असे म्हटले जाते. तसेच संविधानातील १२४ (४) अनुच्छेद आणि न्यायाधीश चौकशी कायदा, १९६८ नुसार न्यायाधीशांना पदावरुन हटवण्याच्या प्रक्रियेबाबतच्या तरतुदी केलेल्या आहेत. या दोन्ही तरतुदींवर अमेरिकन संवैधानिक प्रक्रियेचा प्रभाव आहे.

घ) आयरिश संविधान

१. **मार्गदर्शक तत्त्वे :** आयर्लंडला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९३७ साली त्यांनी संविधानाचा स्वीकार केला. राज्यसंस्थेसाठीची मार्गदर्शक तत्त्वे या संविधानात सांगितलेली होती. आयर्लंडमधील कामगार आणि शेतकरी वर्गाला डोळ्यासमोर ठेवून या मार्गदर्शक तत्त्वांची मांडणी केलेली होती. भारतीय संविधानातील चौथ्या भागातील (अनुच्छेद ३६ ते ५१) तरतुदी आखताना आयर्लंडच्या संविधानातील या तत्त्वांचा विचार केलेला आहे.

२. **राज्यसभा सदस्यांचे नामनिर्देशन आणि राष्ट्रपतींची निवड :** भारताच्या संसदेत लोकसभा आणि राज्यसभा ही दोन सभागृहे आहेत. राज्यसभेवर काही सदस्यांना नामनिर्देशित (नॉमिनेट) केले जाते. तसेच राष्ट्रपतींच्या निवड प्रक्रियेत ही दोन्ही सभागृहे आणि राज्यांची विधिमंडळे सहभाग घेतात. या दोन्ही बाबी ठरवताना आयर्लंडच्या संविधानाचा विचार केला गेला आहे.

ङ) कॅनडाचे संविधान

भारतीय संघराज्यवादाची चौकट १९३५ च्या भारत सरकार कायद्यातून आकाराला आलेली असली तरी कॅनडाच्या संघराज्याच्या प्रारूपाचा (मॉडेल) भारतीय संघराज्यावर प्रभाव आहे. भारतीय संघराज्यवादाच्या रचनेत केंद्राचे वर्चस्व आहे. त्यामुळेच हे 'अर्ध संघराज्यवादी' (क्वासी फेडरल) प्रारूप आहे, असेही म्हटले जाते. प्रबळ केंद्र असलेले संघराज्य, केंद्राकडे विशेष अधिकार असणे, राज्यपालांची नेमणूक केंद्रामार्फत केली जाणे अशा काही बाबी ठरवताना कॅनडाच्या संविधानाचा विचार केला आहे.

च) रशियाचे संविधान

भारतीय संविधानातील अनुच्छेद ५१ (क) मध्ये नागरिकांसाठीची कर्तव्ये आहेत. तसेच भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत न्यायाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय आयामांविषयीचा उल्लेख केलेला आहे. या दोन्ही बाबी ठरवताना रशियाचे संविधान विचारात घेतले आहे.

छ) ऑस्ट्रेलियन संविधान

समवर्ती सूची, व्यापारविषयक स्वातंत्र्य आणि वाणिज्यविषयक तरतुदी ठरवताना ऑस्ट्रेलियन संविधानाचा प्रभाव भारतीय संविधानावर पडलेला आहे. तसेच संसदेतील दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीची कल्पनाही ऑस्ट्रेलियन संविधानातून घेतलेली आहे.

ज) फ्रेंच संविधान

फ्रेंच राज्यक्रांती ही जगाच्या इतिहासातील एक महत्वपूर्ण घटना आहे. 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' ही घोषणा या राज्यक्रांतीमुळेच जगप्रसिद्ध झाली. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेतला हा शब्दप्रयोग फ्रेंच संविधानाच्या प्रेरणेतून केला आहे, असे सांगितले जाते. या आधीही उल्लेख केल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा शब्दप्रयोग भारतीय परंपरेच्या प्रेरणेतून केला असल्याचे म्हटले आहे. तसेच 'गणराज्य' असा उल्लेख करतानाही फ्रेंच संविधानाचा विचार झालेला आहे.

झ) दक्षिण आफ्रिकेचे संविधान

भारतीय संविधानात काही बाबी कायमस्वरूपी आहेत तर काही बाबतीत सुधारणा करता येतात. या सुधारणा करण्यासाठीची पद्धत अनुच्छेद ३६८ मध्ये सांगितलेली आहे. तसेच भारतीय संविधानात राज्यसभेतील सदस्यांच्या निवडीची प्रक्रिया तपशीलवार मांडलेली आहे. या दोन्ही बाबी निर्धारित करताना दक्षिण आफ्रिकेच्या संविधानाचा विचार केलेला आहे.

) जपानचे संविधान

भारतीय संविधानात 'विहित प्रक्रिया' (ड्यू प्रोसेस) शब्दप्रयोग करावा की 'कायद्याद्वारे प्रस्थापित कार्यपद्धती' (प्रोसिजर इस्टॅब्लिशड बाय लॉ) असा शब्दप्रयोग करावा हा प्रश्न होता. 'विहित प्रक्रिया' म्हटले की न्यायसंस्थेस अधिक महत्व प्राप्त होते तर 'कायद्याद्वारे प्रस्थापित कार्यपद्धती' असे म्हटल्यावर कायदेमंडळास पर्यायाने संसदेच्या सार्वभौमत्वास अधिक प्राधान्य दिले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्टेटस ऍन्ड मायनॉरीटीज' मध्ये 'विहित प्रक्रिया' असा शब्दप्रयोग केलेला होता. के.एम. मुन्शी यांनीही हाच शब्दप्रयोग करण्याविषयी सविस्तर नोंद लिहिली होती. बी.एन.राव यांनी मात्र 'कायद्याद्वारे प्रस्थापित कार्यपद्धती' शब्दप्रयोग करण्याविषयी आग्रह धरला. अमेरिकेतही या शब्दप्रयोगावरुन वाद झालेला होता. बी.एन.राव यांची अमेरिकन न्यायमूर्ती फ्रॅन्कफर्टर यांच्यासोबत भेट झाल्यावर त्यांनी कायद्याने प्रस्थापित झालेल्या कार्यपद्धतीचा उल्लेख करण्याचे महत्व विशद केले. तसेच जपानच्या संविधानातही असाच शब्दप्रयोग केलेला होता. अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांनीही मूठभर न्यायाधीशांच्या विवेकावर अवलंबून राहण्याऐवजी लोकनिवार्चित सदस्यांच्या संसदेस अधिक प्राधान्य देणे योग्य राहील, असे मत संविधानसभेत मांडले. अखेरीस संविधानाच्या अंतिम मसुद्यात 'कायद्याद्वारे प्रस्थापित कार्यपद्धती' असा शब्दप्रयोग केला गेला.

ट) जर्मनीचे संविधान

देशावर जेव्हा संकटाची परिस्थिती निर्माण होते तेव्हा आणीबाणी लागू करण्याची वेळ येते. अशा वेळी मूलभूत हक्क निलंबित करण्याची तरतूद जर्मनीच्या संविधानात होती. भारतीय संविधानातही अशा प्रकारे मूलभूत हक्क निलंबित करण्यासाठीच्या तरतुदी केल्या गेल्या.

संविधानावरील टीका:

भारतीय संविधानामध्ये इतर अनेक स्त्रोतांचा वापर केला आहे, याबाबत तीन प्रकारची टीका होते:

१. **भारत सरकार कायदा १९३५ ची नक्कल :** भारतीय संविधान हे १९३५ च्या कायद्याची विस्तारित आवृत्ती आहे. त्यामध्ये केवळ सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा मुद्दा जोडलेला आहे, अशा आशयाची टीका पंजाबराव देशमुखांनी केली होती. ब्रिटिश अभ्यासक सर आयव्हर जेनिंग यांनी देखील भारतीय संविधान १९३५ च्या कायद्याची शब्दशः नक्कल आहे, असे म्हटले होते. यावर मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उत्तर दिले की, अनेक बाबी १९३५ च्या भारत सरकार कायद्यातून स्वीकारलेल्या असल्या तरीही त्या प्रामुख्याने प्रशासकीय रचनेशी संबंधित आहेत आणि संविधानाच्या मूलभूत विचारांवर कोणाचाही स्वामित्वहक्क असू शकत नाही.

२. **इतर संविधानांचे अंधानुकरण :** भारतीय संविधान वेगवेगळ्या देशांकडून उसनवारीने घेतलेले असून त्यामध्ये कोणतीही अस्सलता नाही. संविधानामध्ये कोणतीही नवी गोष्ट नाही, अशी टीका केली जाते. अशा प्रकारच्या टीकेत फारसे तथ्य नाही कारण प्रत्येक बाबीचा स्वीकार करताना त्यामध्ये भारतीय समाज वास्तव लक्षात घेऊन आवश्यक ते बदल संविधानसभेने केले होते.

या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विधान महत्वाचे आहे. डॉ. आंबेडकर म्हणाले की, जगातील बहुसंख्य देश या घडीला स्वतंत्र झाले आहेत. पहिले लिखित संविधान अस्तित्वात येऊनही आता शंभराहून जास्त वर्षे झाली आहेत. अशा वेळी संविधानात नवे काय असणार? जगभरातील संविधाने प्रमुख तरतुदींबाबत एकसारखीच दिसतील. त्यातील त्रुटी दूर करणे हेच संविधानातीलनावीन्य असू शकते.

३. **संविधान 'भारतीय' वळणाचे नाही :** संविधानसभेतील सदस्य लोकनाथ मिश्रा यांनी भारतीय संविधान पाश्चात्य वळणाचे झाले आहे, अशी टीका केली होती. तसेच यामध्ये 'भारतीय' म्हणावे असे काहीच नाही, असेही संविधानाबाबत म्हटले गेले आहे. प्रत्यक्षात विविध भारतीय परंपरा आणि स्वातंत्र्य, समतेसाठीची आंदोलने यांचा विचार कसा केला गेला आहे, याबाबतची मांडणी या घटकाच्या सुरुवातीलाच केलेली आहे. भारतीय परंपरेसोबत संविधानाची नाळ आहे, असे अनेक तरतुदींमधून आणि अगदी संविधानाच्या मूळ प्रतीतील चित्रांमधूनही दिसते. भारतीय परंपरांचा जर चिकित्सक अभ्यास आपण केला तर इथे काही परंपरा विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या दिसतात तर काही परंपरा समतेचा पुकारा करणाऱ्या दिसतात भारतीय संविधानाने समतेचा पुकारा करणाऱ्या परंपरा बरोबर आपली नाळ जोडलेली आहे असेही म्हणता येते.

स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. भारतीय संविधानातील न्यायिक पुनर्विलोकनाचे तत्त्व कोणत्या देशाच्या संविधानापासून प्रेरित आहे ?

२. भारतातील संघराज्यवादाची रचना कोणत्या कायद्याच्या धर्तीवर ठरवण्यात आली आहे ?

३. गौतम बुद्धांनी वापरलेल्या 'मेत्ता' या शब्दाचा अर्थ काय ?

४. भारतीय संविधानाने संसदीय लोकशाहीची रचना कोणत्या राजकीय परंपरेतून स्वीकारली आहे ?

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **न्यायिक पुनर्विलोकन :** संसदेने केलेला कायदा संविधानाशी सुसंगत आहे अथवा नाही याची पडताळणी करुन कायदा वैध आहे की अवैध, हे ठरवण्याचा अधिकार न्यायालयाला असतो. त्यास न्यायिक पुनर्विलोकन असे म्हटले जाते.
- **संघराज्यवाद :** सत्तेची उभी विभागणी. केंद्र व राज्य सरकारे यांच्यातील अधिकारांचे वाटप.
- **प्राधिलेख :** मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि सार्वजनिक अधिकाऱ्यांकडून कायदेशीर कारवाई सुनिश्चित करण्यासाठी जारी करतात असा एक लिखित आदेश. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांना अशा प्रकारचे आदेश देण्याचा अधिकार असतो.

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) अमेरिकन संविधान

२) भारत सरकार कायदा, १९३५

३) मैत्री.

४) ब्रिटिश राजकीय परंपरा

२.५ सारांश

भारतीय संविधानात सारे काही उसनवारीने घेतले आहे, अशी टीका केली जाते. यामध्ये काहीही 'भारतीय' आशय नाही, असा आरोपही केला जातो. संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सर्व टीकेला उत्तर दिले आहे. आंबेडकरांनी म्हटले आहे की, मसुदा समितीने सर्व बाजूंनी विचार केला आणि उपलब्ध असणाऱ्या सर्व संविधानांचा धांडोळा घेतला. मसुदा समितीने आणि संविधानसभेने इतर कोणत्याही संविधानांचे अंधानुकरण केलेले नाही, हे आंबेडकरांनी स्पष्ट केले.

संस्कृतमध्ये एक प्रसिद्ध वचन आहेः 'आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः' याचा अर्थ चांगले विचार सर्व बाजूंनी आपल्यापर्यंत पोहोचोत. संविधानसभेनेही सर्व बाजूंनी आलेल्या विचारांचा स्वीकार केला. त्या बाबी पटलावर ठेवल्या. त्याबाबत मंथन केले. त्याची चिकित्सा केली. त्यातील निवडक बाबींचा स्वीकार केला. भारतीय वास्तवास अनुकूल अशा गोष्टींमध्ये बदल केले. भारतीय विचारांची परंपरा, सामाजिक समतेचे आंदोलन, स्वातंत्र्य आंदोलन आणि विविध देशांच्या संविधानाच्या आवृत्त्या यांचे सूक्ष्म अवलोकन करुन संविधानसभेने भारतीय संविधानाची निर्मिती केली, हे लक्षात घेतले पाहिजे.

२.६ सरावासाठीचे स्वाध्याय

१) भारतीय संस्कृतीचा भारतीय संविधानावर कशाप्रकारे प्रभाव पडला आहे, हे स्पष्ट करा.

२) 'भारत सरकार कायदा, १९३५, हा भारतीय संविधानाचा एक स्त्रोत' यावर टीप लिहा.

३) भारतीय संविधान हे इतर देशांच्या संविधानांचे अंधानुकरण आहे काय? सविस्तर स्पष्ट करा.

२.७ अधिक वाचनासाठीचे संदर्भ

१) ऑस्टिन, ग्रॅनव्हिल (१९७२). *द इंडियन कॉन्स्टिट्यूशनः कॉर्नरस्टोन ऑफ अ नेशन.* ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस.

२) खोसला, माधव. (२०१२). *द इंडियन कॉन्स्टिट्यूशन.* ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस.

३) बसू, डी. डी. (२०१५). *इंट्रोडक्शन टु द कॉन्स्टिट्युशन ऑफ इंडिया.* लेक्सिस नेक्सिस.

घटक ३ : भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान (उद्देशपत्रिका)

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय-विवेचन

- ३.२.१ आम्ही भारताचे लोक
- ३.२.२ स्वातंत्र्य
- ३.२.३ समता
- ३.२.४ बंधुता
- ३.२.५ न्याय
- ३.२.६ लोकशाही
- ३.२.७ धर्मनिरपेक्षता
- ३.२.८ समाजवाद

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला -

- भारतीय संविधानाची उद्देशिका समजेल.
- भारतीय संविधानाच्या तत्त्वज्ञानाचे आकलन होईल.

३.१ प्रास्ताविक

संविधानाची उद्देशिका हे संविधानाचे ओळखपत्र आहे.

– नानी पालखीवाला

प्रख्यात कायदेतज्ज्ञ नानी पालखीवाला यांनी संविधानाच्या उद्देशिकेबाबत केलेले हे सुप्रसिद्ध विधान. संविधानाची उद्देशिकेचे बारकाईने वाचन केल्यास हे एकच दीर्घ वाक्य आहे हे लक्षात येईल. या उद्देशिकेत प्रामुख्याने चार बाबी आहेतः

१. संविधानाच्या अधिमान्यतेचा स्रोत 'आम्ही भारताचे लोक' आहोत.
२. भारतीय संघराज्याचं स्वरूप कसं असेल हे यात स्पष्ट केलेलं आहे - लोकशाही, प्रजासत्ताक, सार्वभौम, धर्मनिरपेक्ष आदी
३. भारतीय संविधानाचं ध्येय काय असेल, याविषयी उद्देशिकेमध्ये स्पष्ट उल्लेख आहेः स्वातंत्र्य, समानता, बंधुता तसंच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय यांना वर्धिष्णू करणारी समाजव्यवस्था निर्माण करणं हे तिचं ध्येय आहे
४. आपण संविधान २६ नोव्हेंबर १९४९ ला स्वतःप्रत अर्पित केलं हा महत्त्वाचा तपशीलही यात आहे.

संविधानाच्या उद्देशिकेने तीन महत्वाच्या बाबी अधोरेखित केल्या आहेत. पहिली बाब म्हणजे भारतीय संविधानाचे तत्वज्ञान काय आहे, हे सारांशरूपात सांगितले आहे. भारतीय संविधानाच्या तत्वज्ञानाचे गोळीबंद वाक्य म्हणजे संविधानाची उद्देशिका आहे.

दुसरी महत्वाची बाब आहे ती वर उल्लेखल्याप्रमाणे भारतीय नागरिकांची ओळख उद्देशिकेने सांगितली आहे. 'आम्ही भारताचे लोक' ही ती ओळख असून कोणती मूल्ये आपण मानतो, यावर आधारित ती ओळख आहे. ती ओळख जात, धर्म, प्रांत, लिंग यांवर आधारित नाही.

तिसरी महत्वाची बाब आहे ती भारतीयांच्या सामूहिक संकल्पाची. सार्वभौम, लोकशाही, धर्मनिरपेक्ष गणराज्य घडवण्याचा संकल्पही संविधानाच्या उद्देशिकेत सांगितला आहे. हा सर्वांचा सामूहिक संकल्प आहे. एखाद्या प्रतिज्ञे सारखी उद्देशिकेची शैली आहे. त्यामुळे एक प्रकारे देशाची भविष्यातील वाटचाल कोणत्या दिशेने असेल,याचा आराखडा उद्देशिकेमध्ये आखलेला आहे.

संविधान सभेचे सदस्य पं. ठाकूरदास भार्गव म्हणाले होते, "उद्देशिका हा संविधानाचा सर्वांत मौल्यवान भाग आहे. तो संविधानाचा आत्मा आहे. उद्देशिका संविधानाच्या केंद्रभागी आहे आणि ती संविधानाचा अलंकार आहे." संविधानाच्या उद्देशिकेचे हे अगदीच यथार्थ वर्णन आहे.

३.२ विषय-विवेचन

संविधानसभेची स्थापना झाली डिसेंबर १९४६ मध्ये. पं.जवाहरलाल नेहरुंनी १३ डिसेंबर १९४६ रोजी 'उद्दिष्टांचा ठराव' (ऑब्जेक्टिवज रिझोल्यूशन) मांडला. संविधानसभेने कोणत्या दिशेने काम करायचे आहे आणि एकूणात देशासमोरचे उद्दिष्ट सांगणारा हा ठराव होता. त्यावर बरीच चर्चा झाली आणि अखेरीस त्यामध्ये काही बदल करुन हा ठराव संमत झाला. उद्दिष्टांच्या ठरावावर आधारित बंधुतेसारख्या मूल्यांची भर घातलेल्या उद्दिशिकेचा (त्रिअँबल) प्रस्ताव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यामनी संविधान सभेत अखेरच्या टप्प्यात मांडला. याबाबतच्या सुचवलेल्या दुरुस्त्या नाकारुन तो१७ ऑक्टोबर १९४९ रोजी मंजूर करण्यात आला.

संविधानाच्या उद्देशिकेतील एकेक शब्द काळजीपूर्वक वापरलेला आहे. त्यातून संविधानाचे तात्विक अधिष्ठान स्पष्ट होते. उद्देशिकेत काही महत्वाची मूल्ये सांगितली आहेत, ती पुढीलप्रमाणेः आम्ही भारताचे लोक, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद.

३.२.१ आम्ही भारताचे लोक / सार्वभौमत्व

संविधानाच्या उद्देशिकेची सुरुवातच 'आम्ही भारताचे लोक' या शब्दप्रयोगाने होते. यातून भारतीय संविधानाच्या अधिमान्यतेचा अंतिम स्त्रोत भारतीय लोक आहेत, हे स्पष्ट होते. संविधानाचे सर्व अधिकार हे संसद, पंतप्रधान, सर्वोच्च न्यायालय यांच्याकडे नाहीत तर अंतिमतः ते सर्वसामान्य भारतीय लोकांकडेच आहेत. अशा प्रकारे हे संविधान 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांनी सुरु होऊन स्वतःप्रत अर्पण केले जावे का, याविषयी संविधानसभेत वाद सुरु झाला.

संविधान सभेचे सदस्य एच. व्ही. कामथ यांनी अशी सूचना केली की संविधानाच्या उद्देशिकेत 'वुई द पिपल ऑफ इंडिया' पूर्वी 'इन द नेम ऑफ गॉड' असे शब्द असावे. अर्थात देवाला अर्पण करणारी अशी उद्देशिका हवी. ही दुरुस्ती सुचवताच पूर्णिमाबॅनर्जी म्हणाल्या, " देवाचा विषय काढून पुन्हा अल्पसंख्य आणि बहुसंख्यांमध्ये वाद नको. मी तुम्हाला विनंती करते की हा विषय संविधानात नको आणि देवावरुन मतदान नको." बॅनर्जी यांचे बोलणे ऐकूनही कामथ त्यांच्या मुद्द्यावर ठाम होते. त्यावर रोहिणी कुमार चौधरी म्हणाले, " मला वाटते, उद्देशिका देवालाच नाही तर देवीलाही अर्पण करावी." यावर संविधान सभेत हशा पिकला. शिब्बनलाल सक्सेना यांनी संविधान गांधींना अर्पण करावे, असेही सुचवले. बराच खल झाल्यानंतर अखेरीस कामथांनी उद्देशिका देवाला अर्पण करण्याविषयीचा प्रस्ताव पटलावर ठेवला. संविधानसभेतील ६८ जणांनी या विरोधात मतदान केले तर ४१ जणांनी प्रस्तावाच्या बाजूने. अखेरीस संविधानसभेने देवदेवतांना नकार दिला आणि उद्देशिकेचा प्रारंभ मूळचाच राहिला : आम्ही भारताचे लोक ! आम्ही भारताचे लोक हे संविधा स्वतः प्रत अर्पण करत आहोत या शब्दरचनेचा एक अर्थ असाही होतो की संविधानामध्ये भारतीय नागरिकांना जे अधिकार नोंदवलेले आहेत हे अधिकार कुणा ईश्वराने दयाळूपणे बहाल केलेले नाहीत किंवा एखाद्या राजाने ते उदारपणे दिलेले नाहीत तर आम्ही भारतीयांनी एकमेकाच्या माणूसपणाला दिलेली ती मान्यता आहे.

या शब्दप्रयोगातून भारतीय लोक सार्वभौम आहेत, ही जाणीवही निर्माण होते. तसेच सार्वभौम गणराज्य बनवण्याचा निर्धारही यातून व्यक्त होतो. सार्वभौम म्हणजे स्वतःबाबतचा निर्णय स्वतः घेऊ शकणे. लॉर्ड माउंटबॅटन मोहनदास गांधींना म्हणाले होते की, आम्ही भारतातून निघून गेल्यावर येथे अराजक निर्माण होईल. त्यावर गांधी म्हणाले होते, "ते अराजक आमचे असेल." याचा अर्थच मुळी भारतीय लोकच आता भारताविषयीचे निर्णय घेतील आणि परिणामांसाठीही जबाबदार राहतील. ब्रिटिश साम्राज्यवादी घटकांनी भारताच्या निर्णय प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही. 'आम्ही भारताचे लोक' असा शब्दप्रयोग करताना तीन गोष्टी संविधानकर्त्यांना अधोरेखित करायच्या होत्याः

१. भारतीय लोकांनी संविधानाची आणि स्वशासनाची जबाबदारी घेतली आहे. भारतीय लोक हे शासन करण्यास सक्षम आहेत.
२. ब्रिटनने वा इतर कोणत्याही राष्ट्राने भारताच्या अंतर्गत निर्णयांमध्ये हस्तक्षेप करता कामा नये.
३. 'भारताचे लोक' असे म्हणताना त्यामध्ये सर्व लोकांचा समावेश आहे. जात, धर्म, प्रांत, लिंग या सर्वांना ओलांडून वैचारिक ओळखीवर असलेला हा व्यापक समुदाय आहे, असे संविधानकर्त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे.

३.२.२ स्वातंत्र्य

ब्रिटिशांच्या साम्राज्यवादापासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठीच तर भारताचा लढा सुरु होता; मात्र ब्रिटिशांचा अभाव म्हणजे भारतीय स्वातंत्र्य, इतकी संकुचित कल्पना भारतीय लोकांची नव्हती. भारतीय राजकीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये 'स्वराज्य' या संकल्पनेचा स्वातंत्र्याच्या संदर्भात वापर केला गेला. 'स्वराज्य' या शब्दाचा अर्थ स्वतःचं स्वतःवर राज्य. 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' हे बाळ गंगाधर

टिळकांचं सुपरिचित विधान आहे. मोहनदास गांधींनी 'हिंद स्वराज' या आपल्या पुस्तकात म्हटले आहे की आपण स्वतः स्वतःवर राज्य करायला शिकू तेव्हा खरे स्वराज्य मिळेल. त्यासाठी खरा 'स्व' शोधावा लागेल आणि आपले, समूहाचे आणि समाजाचे नाते शोधावे लागेल. पर्यायाने व्यक्ती आणि समाज दोहोंच्या स्वातंत्र्यासाठी एकत्र लढावं लागेल.

स्वातंत्र्य शब्द उच्चारल्यावर 'आपल्याला हवी ती कृती करता येणे' हा अर्थ समजतो. तसेच ही कृती करताना कोणतेही अडथळे असता कामा नयेत. परिणामस्वरूपी स्वातंत्र्याचा अवलंब करण्यासाठीची पोषक परिस्थिती असणे आवश्यक आहे. थोडक्यात, स्वातंत्र्याच्या संकल्पनेत तीन बाबींचा समावेश करता येतोः

१. बंधनांचा अभाव
२. निवड करण्याचा हक्क
३. स्वातंत्र्याचा अवलंब करण्यासाठीची पोषक परिस्थिती.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ ते २२ मध्ये स्वातंत्र्याच्या हक्काबाबत मांडणी केलेली आहे. त्यामध्ये वर उल्लेखलेल्या तीनही घटकांचा विचार आहे. अनुच्छेद १९ अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्काविषयी आहे. व्यक्तीला असलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि राज्यसंस्थेची बंधने यामध्ये एक धूसर सीमारेषा असते. त्यामुळेच जॉन स्टुअर्ट मिल यांनी स्वातंत्र्यविषयक केलेले विवेचन येथे महत्वाचे ठरते. 'ऑन लिबर्टी' या ग्रंथामध्ये त्यांनी 'हानीचे तत्त्व' (हार्म प्रिन्सीपल) मांडले. यासाठी त्यांनी मानवी कृतींचे दोन भागात वर्गीकरण केलेः

१. स्व–संबंधी कृतीः ज्या कृती केवळ स्वतःपुरत्या मर्यादित आहेत. ज्याचा इतरांवर परिणाम होणार नाही, अशा कृतींचा यामध्ये समावेश होतो.
२. इतरांशी / समाजाशी संबंधित कृतीः ज्या कृतींमुळे इतर लोकांवरही परिणाम होऊ शकतो, अशा कृतींचा समावेश यामध्ये होतो.

मिलच्या मते, जोपर्यंत व्यक्तीच्या वर्तनाने दुस-या व्यक्तीस प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या हानी पोहोचत नाही तोवर त्या व्यक्तीस पूर्ण स्वातंत्र्य असावे. त्यामुळे इतरांना हानी पोहोचू नये, यादृष्टीने राज्यसंस्थेने निर्बंध लावावेत, असा विचार मिल मांडतात. याच मांडणीस 'हानी तत्त्व' असे म्हटले आहे.

त्याचप्रमाणे भारताच्या संविधानातही स्वातंत्र्य अमर्याद स्वरूपाचे नाही. त्यावर वाजवी बंधने आहेत. अनुच्छेद १९ नुसार अभिव्यक्ती स्वातंत्र्य असले तरीही कायदा आणि सुव्यवस्थेस बाधा पोचवणार नाही आणि इतरांच्या मूलभूत अधिकाऱ्यांना बाधा पोहोचणार नाही येथपर्यंतच त्या स्वातंत्र्याची कार्यकक्षा आहे.

रवींद्रनाथ टागोरांनी कवितेच्या ओळींमध्ये स्वातंत्र्याचे महत्व सांगितले होतेः
"चित्त जिथे भीतीशून्य, उंच जिथे माथा
ज्ञान जिथे मुक्त, तिथे जागृत करी नाथा"

मानवी मन जिथे भीतीशून्य असेल तिथेच स्वातंत्र्य असू शकते. त्या स्वातंत्र्याची अवधारणा निर्माण करण्याचा प्रयत्न भारतीय संविधानकर्त्यांनी केला. मानवी मन भीतीशून्य तेव्हाच असू शकते जेव्हा जनप्रवाहाच्या विरोधातले मतही ऐकून घेतले जाईल. त्यामुळेच भारतीय संविधानामध्ये असहमती व्यक्त करण्याचे स्वातंत्र्यही आहे.

या अनुषंगाने राजद्रोहाचा मुद्दा लक्षात घ्यायला हवा. संविधानाचा १९४८ चा मसुदा सादर झाला तेव्हा त्यातील स्वातंत्र्याबाबतच्या अनुच्छेदामध्ये 'राजद्रोह' (सेडिशन) असा शब्द वापरलेला होता. के. एम. मुन्शी यांनी हा शब्द काढून टाकावा, अशी दुरुस्ती सुचवली. ब्रिटिशांनी राजद्रोहाबाबतच्या तरतुदींचा अनेकदा गैरवापर केला होता. सेठ गोविंद दास यांनीही मुन्शींना पाठिंबा दिला. बाबासाहेब आंबेडकरांनीही सहमती दर्शवली आणि आपल्याच नागरिकांवर राजद्रोहाचा वापर होऊ नये, यावर सहमती झाली आणि संविधानाच्या अंतिम मसुद्यातून 'राजद्रोह' हा

शब्द वगळण्यात आला. (दुर्दैवाने भारतीय दंड संहितेच्या तरतुदींमध्ये नंतर तो वापरला गेला आणि त्याचा चुकीचा वापरही झाला.) रोहन जे. अल्वा यांच्या 'अ कॉन्स्टीट्यूशन टू कीप सेडिशन ॲन्ड फ्री स्पीच इन मॉडर्न इंडिया' (२०२३) पुस्तकात राजद्रोहाच्या संदर्भातील तरतुदींबाबतची गुंतागुंत मांडली आहे. संविधान सभेतील चर्चा, विविध खटल्यांमध्ये न्यायालयाने घेतलेल्या भूमिका आणि त्याचे अन्वयार्थ या सगळ्यातून तयार झालेला अंतर्विरोध त्यांनी स्पष्ट केला आहे.

थोडक्यात, विचाराचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य भारतीय संविधानाने मान्य केले आहे. त्यासोबतच प्रत्येक व्यक्तीच्या वैयक्तिक श्रद्धा असू शकतात आणि त्यानुसार व्यक्ती आचरण करु शकते. तिला उपासनेचेही स्वातंत्र्य आहे. त्याच वेळी तिने इतरांच्या श्रद्धांचाही आदर करणे अभिप्रेत आहे. एकूणात, स्वातंत्र्यविषयक भारतीय संविधानकर्त्यांची भूमिका उदार होती. कोणकोणत्या गोष्टी करण्याचे स्वातंत्र्य आणि कोणकोणत्या बंधनांचा अभाव याविषयी संविधानात स्पष्टपणे भाष्य केलेले आहे.

संविधानातील अनुच्छेद २१ नुसार प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा अधिकार आहे. जगणे म्हणजे केवळ जिवंत राहणे नव्हे तर सन्मानाने आणि गुणवत्तापूर्ण जगण्याचा अधिकार असा अर्थ अभिप्रेत आहे. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद २१ चा अन्वयार्थ लावताना दिलेल्या अनेक निकालपत्रांनी संविधानातील स्वातंत्र्याची कार्यकक्षा अधिक रुंदावली आहे.

३.२.३ समता

तीन उदाहरणे पाहूया,

१. 'सर्वायवल ऑफ द रिचेस्ट' या शीर्षकाचा ऑक्सफॅमचा अहवाल २०२३ मध्ये प्रकाशित झाला. या अहवालानुसार भारतातील १ टक्के श्रीमंत वर्गाकडे देशातील एकूण संपत्तीच्या ४० टक्क्यांहून अधिक संपत्ती आहे तर तळातील ५० टक्के लोकांकडे देशाच्या एकूण संपत्तीच्या केवळ ३ टक्के संपत्ती आहे.
२. राष्ट्रीय गुन्हे अहवालाच्या (नॅशनल क्राइम ब्युरो) आकडेवारीनुसार, २०२२ या वर्षी अनुसूचित जातींच्या विरोधातील गुन्ह्यांची संख्या ६७ हजारांहून अधिक होती.
३. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विकास कार्यक्रमाच्या अहवालानुसार, २०२२ मध्ये भारतातील ७६ % पुरुषांना श्रमाची नोकरी मिळाली तर स्त्रियांसाठी हेच प्रमाण अवघे ३५ % इतके अल्प होते.

थोडक्यात, भारतीय समाजात अनेक पातळ्यांवर विषमता रुजलेली आहे. जात, धर्म, वर्ग, वंश, लिंग यांवर आधारित विषमतेचे विदारक चित्र आहे. हे चित्र बदलण्यासाठी समतेचे तत्त्वज्ञान संविधानात मांडले आहे. त्यामुळेच संविधानाच्या उद्देशिकेत 'दर्जाची व संधीची समानता' असे म्हटले आहे. त्या अनुषंगाने संविधानातील अनुच्छेद १४ ते १८ मध्ये समतेच्या हक्कांच्या अनुषंगाने तरतुदी केलेल्या आहेत.

दर्जाची समानता: दर्जाची समानता प्राप्त करुन देण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला केवळ समान राजकीय हक्क देऊन प्रश्न सुटणार नाही. व्यक्तीला समान दर्जाची प्रतिष्ठा दिली गेली पाहिजे. त्यामुळेच २५ नोव्हेंबर १९४९ च्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते:

"...उद्यापासून आपण एका अंतर्विरोधाच्या जगात प्रवेश करणार आहोत जिथे राजकीय लोकशाही असेल पण सामाजिक आणि आर्थिक लोकशाही नसेल. राजकारणात 'एक व्यक्ती एक मत' आणि 'एक मत समान पत' हे धोरण आपण स्वीकारलं आहे; पण आर्थिक आणि सामाजिक विषमतेमुळे समतेचे मूल्य नाकारले जाऊ शकते." त्यामुळेच अनुच्छेद १४ नुसार, 'कायद्यासमोर समानता' हे तत्त्व आपण स्वीकारले. तसेच अनुच्छेद १७ नुसार अस्पृश्यतेचे पालन करण्यावर बंदी आणली तसेच अनुच्छेद १८ नुसार मानाचे किताब, वतनदारीतून आलेले किताब रद्द केले जेणेकरुन प्रत्येक व्यक्तीच्या अस्तित्वाचे मोल समान राहील.

संधीची समानता : जन्मजात ओळखीमुळे कोणालाही संधी नाकारली जाता कामा नये. सर्वांना समान संधी मिळेल, अशी भूमी तयार करण्याचा संविधानाचा निर्धार आहे. ही समान संधीची भूमी तयार करताना राज्यसंस्थेला विशेष योजना राबवत पावलं टाकावी लागतात. वंचित, पीडित आणि विकासाच्या प्रवाहात मागे राहिलेल्या समूहांसाठी सक्रियरित्या काम करावे लागते. त्यासाठी 'सकारात्मक भेदभाव' करावा लागतो. तांत्रिकदृष्ट्या तो भेदभाव वाटू शकतो कारण विशिष्ट वर्गासाठी अधिक सवलती, संधी निर्माण केल्या जातात; पण मुळात हे लक्षात घेतले पाहिजे की, समानता हे मूल्य निव्वळ संख्यात्मक नाही, तर गुणात्मक आहे.

हे समजून घेण्यासाठी एक उदाहरण लक्षात घेऊया. एका अशा पळण्याच्या शर्यतीची कल्पना करूया जी सुरू होण्याआधी सारे स्पर्धक वेगवेगळ्या ठिकाणी उभे आहेत. काही जण आरंभरेषेच्या खूप मागे आहेत, काही आरंभरेषेजवळ आहेत, तर काही आरंभरेषेच्या खूप पुढे- अगदी अंतिम रेषेजवळ आहेत. जर याच स्थितीत स्पर्धा सुरू केली आणि सगळ्या स्पर्धकांना अंतिम रेषेपर्यंत पोचायला समान वेळ दिला तर ते न्याय्य ठरेल का? अर्थातच जे अंतिम रेषेच्या जवळ आहेत, ते स्पर्धा जिंकतील आणि जे आरंभरेषेपासूनही दूर आहेत त्यांना शर्यत पूर्ण करायला खूप वेळ लागेल. शर्यत सुरू होताना सर्व स्पर्धक आरंभरेषेवर असतील, तरच ती शर्यत न्याय्य म्हणता येईल. अशा न्याय्य शर्यतीसाठी सुरूवातीला पुढे गेलेल्या स्पर्धकांना मागे आणावे लागेल आणि मागे राहिलेल्यांना पुढे आणावे लागेल. थोडक्यात सगळ्या स्पर्धकांना एका रेषेवर आणावे लागेल. सकारात्मक भेदभाव म्हणजे थोडक्यात सांगायचे तर मागे राहिलेल्यांना, पुढे- आरंभरेषेपर्यंत आणण्याचा प्रयत्न. जेव्हा सामाजिक परिस्थितीमध्ये टोकाची विषमता असते तेव्हा समान नियम हा अन्याय ठरतो तर सकारात्मक भेदभाव हा न्याय ठरतो. त्यामुळेच संविधानामध्ये काही अपवाद करत स्त्रिया, बालके, अनुसूचित जाती, जमाती यांकरता विशेष योजनांची तरतूद केलेली आहे. संविधानातील अनुच्छेद १५ आणि १६ मध्ये सर्वांना समान संधी मिळावी आणि तो प्रत्येकाचा हक्क असल्याचे नोंदवले आहे तर राज्यसंस्थेसाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्येही या घटकांचा विचार करुन निर्णय घेण्याची आवश्यकता प्रतिपादित केलेली आहे.

३.२.४ बंधुता

स्वातंत्र्य समता आणि बंधुता ही मूल्यत्रयी फ्रेंच राज्यक्रांतीची घोषणा होती. प्रत्यक्षात स्वातंत्र्याचा उद्घोष केला तरी समतेच्या मूल्याचा फ्रेंच राज्यक्रांतीने बळी दिला. रशियन राज्यक्रांतीने समतेच्या मूल्यावर अधिक भर दिला; मात्र स्वातंत्र्याच्या मूल्याला तिलांजली दिली. स्वातंत्र्य आणि समतेचे सहअस्तित्व असले पाहिजे आणि ते बंधुतेच्या मूल्यापासून वेगळे करता येणार नाही, याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. त्यामुळेच ही मूल्यत्रयी लोकशाहीचे अधिष्ठान आहे, याबाबत त्यांनी आग्रही मांडणी केली. तसेच या तिन्ही मूल्यांचा एकत्रित मार्ग गौतम बुद्धाने सांगितला आहे, असेही त्यांचे प्रतिपादन होते.

गौतम बुद्धाने 'मेत्ता' असा शब्द वापरलेला होता. मेत्ताचा अर्थ होतो मैत्री. सर्व मनुष्यमात्रांमध्ये मैत्री असेल तरच स्वातंत्र्य आणि समतेच्या मूल्यास अर्थ प्राप्त होऊ शकतो. 'द ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' (१९३६) या पुस्तकात डॉ. आंबेडकरांनी म्हटले होतेः बंधुता हे लोकशाहीचे पर्यायी नाव आहे. लोकशाही म्हणजे केवळ शासन रचना नव्हे. लोकशाही मूलतः सामूहिक सहजीवनाचा संवादी प्रयत्न असतो. परस्परांविषयीचा आदर आणि सहभाव हाच या संकल्पनेचा गाभा आहे.

या विधानातून बाबासाहेबांचा दृष्टिकोन सहज समजतो. संविधानाच्या उद्देशिकेमध्ये बंधुता या शब्दाचा उल्लेख वैशिष्ट्यपूर्ण रीतीने आलेला आहे व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता हा उद्देशिकेतील उल्लेख खूप काही सांगून जाणारा आहे. स्त्रीवाद्यांनी 'बंधुता' या शब्दावर आक्षेप घेतला. बंधुंपुरती मर्यादित असलेला हा शब्द पितृसत्ताक आहे, अशी त्यांनी टीका केली आणि 'बंधुभगिनीभाव' अशा शब्द

वापरला. नवीन लिंगभावांच्या जाणिवांचा विचार करुन बंधुतेऐवजी 'सहभाव' असा शब्दप्रयोग 'आपलं आयकार्ड' या पुस्तकात वापरला आहे.

सहभावाच्या या संकल्पनेमध्ये तीन महत्वाच्या घटकांचा समावेश आहे.

१. सर्व व्यक्तींविषयी प्रतिष्ठा आणि आदर

२. विविधता जतन आणि त्याबाबत सकारात्मक भूमिका

३. समानुभूती

समाजामध्ये प्रेम आणि मैत्रभाव निर्माण होण्यासाठी सर्व व्यक्तींना समान प्रतिष्ठा आहे, हे मूल्य रुजण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी तुच्छताभाव टाळून प्रत्येक व्यक्तीविषयी आदरभाव बाळगला पाहिजे.

अशा प्रकारचा आदरभाव निर्माण होण्यासाठी विविधतेविषयी आणि बहुलतेविषयी सकारात्मक भाव असला पाहिजे. भारतीय समाजामध्ये प्रचंड प्रमाणात विविधता आहे. जेवढी विविधता युरोपीय महासंघात आहे, त्याहूनही अधिक विविधता भारतात आहे. त्यामुळेच वेगवेगळ्या सामाजिक पार्श्वभूमीतून येणा–या व्यक्तींकडे सकारात्मक दृष्टिकोन असणे जरुरीचे आहे. अनेकदा 'आपण' आणि 'ते' अशी विभागणी केली जाते आणि जात धर्माच्या आधारे समाजामध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न होतो. त्यामुळे विविधता हा अडथळा वाटू शकतो; मात्र विविधता हा विकासामधील अडथळा नसून विविधता हे आपले सबळस्थान आहे, ही दृष्टी विकसित व्हायला हवी.

अशा प्रकारची दृष्टी निर्माण होण्यासाठी इतरांविषयी केवळ सहानुभूती (सिम्पथी) असून उपयोगाचे नाही तर परस्परांविषयी समानुभूती (एम्पथी) आवश्यक आहे. अशा प्रकारची समानुभूती निर्माण होण्यासाठी इतरांच्या जागी स्वतःची कल्पना करुन उदारपणे विचार केला पाहिजे. अशी व्यापक दृष्टी विकसित झाल्यावर इतरांचे प्रश्नही नेमकेपणाने समजतात आणि सहभावाची भावना वाढीस लागते.

भारतीय संविधानकर्ते हे तत्त्वज्ञान रुजावे यासाठी आग्रही होते. बंधुता हा शब्द जोडण्याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फेब्रुवारी १९४८ मध्ये भाषण केले. त्या आधी काही दिवसांपूर्वी गांधींची हत्या झालेली होती. गांधी हत्येच्या पार्श्वभूमीवर 'बंधुता' हा शब्द उद्देशिकेत जोडला गेला, हे नोंदवणे महत्वाचे.

संविधानाच्या चौथ्या भागातील मार्गदर्शक तत्त्वांच्या मुळाशी बंधुतेचाच विचार आहे. समाजामध्ये सौहार्द निर्माण व्हावे, यासाठी अनेक तरतुदी केल्या गेल्या आहेत. अनुच्छेद ५१ (क) मध्ये आपल्या संमिश्र संस्कृतीचे जतन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे म्हटले आहे. तसेच जातीय, धार्मिक भेदभावांच्या पलीकडे जाऊन चुकीच्या प्रथांचा त्याग करणे हे देखील कर्तव्य असल्याचा उल्लेख संविधानात आहे. समाजामधील एकतेची वीण अधिक घट्ट व्हावी, यासाठीच या तरतुदी केल्या गेल्या आहेत. भारतातील 'गंगा जमनी तहजीब' आणि इंद्रधनुषी विविधता टिकावी, हा विचार संविधानकर्त्यांनी केलेला होता, हे लक्षात येते.

३.२.५ न्याय

स्वातंत्र्य आणि समता या दोन मूल्यांचा समन्वय करणारे मूल्य म्हणून न्यायाकडे पाहिले जाते. न्यायाची वेगवेगळ्या प्रकारे व्याख्या केलेली आहे. सर्व व्यक्तींना समान प्रतिष्ठा असणे आणि संसाधनांमध्ये समान वाटा असणे न्याय्य समाजासाठी आवश्यक असते.

जॉन रॉल्स नावाच्या विचारवंताने न्यायी समाजासाठी एक सूत्र दिलं आहे. समाजात सगळ्या संसाधनांचं वाटप कसं करावं यासाठीचं हे सूत्र आहे. समाजातल्या प्रत्येकाला समान संधी आणि स्वातंत्र्याचा अवकाश असला पाहिजे हा त्या सूत्राचा पहिला भाग. सूत्राच्या दुसऱ्या भागात रॉल्स विषम समाजासाठी न्यायासाठीचं धोरण सांगतात. त्यांच्या मते, सगळ्या सामाजिक आणि आर्थिक विषमतांची अशी नवी पुनर्रचना करावी जेणेकरून समाजातल्या सर्वात मागास घटकाला सर्वाधिक फायदा मिळेल. प्रत्येक विषमतेमुळे विविध सामाजिक आर्थिक बाबतीत वंचित असलेल्या

समूहाला सर्वाधिक सुविधा आणि संधी उपलब्ध करून द्याव्यात. अशा समाजात प्रत्येकाला स्वतःचं व्यक्तिमत्व घडवण्याची, त्याच्या विकासाची संधी मिळेल. रॉल्सची मांडणी मानवाच्या नैसर्गिक अशा विकासाच्या उर्मीलाही अशा तऱ्हेने विचारात घेते.

रॉल्सच्या सूत्रातल्या दुसऱ्या भागाला समांतर असंच काहीसं आवाहन आपल्याकडे गांधींनी स्वतंत्र भारताच्या शासनकर्त्यांना केलेलं आहे. गांधी म्हणतात की जेव्हा तुम्ही संभ्रमात असाल आणि कोणता निर्णय घ्यावा, हे तुम्हाला कळत नसेल, अशा वेळी तुम्ही तुमच्या आयुष्यात पाहिलेल्या सर्वांत गरीब, अशक्त, कमकुवत माणसाला आठवा आणि जे पाऊल तुम्ही उचलत आहात ते त्याच्यासाठी फायदेशीर आहे का, याचा विचार करुन निर्णय घ्या. गांधींच्या याच विचाराला 'अंत्योदय' असेही संबोधले गेले आहे. समाजातील सर्वांत शेवटच्या व्यक्तीपर्यंत न्याय पोहोचला पाहिजे, यासाठीचे हे तत्त्व आहे.

संविधानाच्या उद्देशिकेत न्यायाच्या तीन आयामांविषयी भाष्य केलेले आहेः सामाजिक, आर्थिक आणि राजकीय. भारतात जात, धर्म, वर्ग, लिंग, वंश या आधारावर मोठ्या प्रमाणात सामाजिक विषमता आहे. मूलभूत हक्कांच्या भागात अनुच्छेद १५ आणि १६ नुसार, जन्माधारित ओळखीच्या आधारे भेदभाव करण्यास मज्जाव केलेला आहे. या अनुच्छेदांनुसार 'सकारात्मक भेदभावा'चे तत्त्व अवलंबले आहे. तसेच मार्गदर्शक तत्त्वांमध्येही सामाजिक न्यायाशी अनुकूल असे सार्वजनिक धोरण आखण्याबाबत तरतुदी आहेत.

सामाजिक विषमतेप्रमाणेच आर्थिक विषमताही मोठ्या प्रमाणावर आहे. त्यासाठी संविधानात आर्थिक न्यायाचे तत्त्व मांडलेले आहे. मार्गदर्शक तत्त्वांमधल्या ३९व्या अनुच्छेदामध्ये आर्थिक न्यायाच्या दिशेने जाणाऱ्या धोरणांचा मार्ग दिला आहे. उपजीविकेची पुरेशी साधनं मिळवण्याचा सर्वांना समान हक्क मिळावा, सामूहिक हिताच्या दृष्टीने भौतिक साधनसंपत्ती आणि आर्थिक यंत्रणा कोणा एका ठिकाणी केंद्रित राहू नये, तिचं समाजामध्ये वितरण व्हावं हे त्यामध्ये सुचवण्यात आलं तर ४३व्या अनुच्छेदामध्ये सगळ्या कामगारांना उदरनिर्वाहासाठीचं योग्य वेतन आणि चांगल्या पद्धतीचं जीवनमान मिळावं असं सुचवलं आहे.

राजकीय न्यायाच्या अनुषंगाने 'एक व्यक्ती एक मत' आणि 'एक मत एक मूल्य' हे तत्त्व भारतीय संविधानाने मान्य केले. त्या माध्यमातून सार्वत्रिक प्रौढ मताधिकारास मान्यता देण्यात आली मात्र नागरिकांचा सहभाग केवळ प्रतिनिधी निवडून देण्यापुरताच असावा, असे संविधानकर्त्यांना अपेक्षित नव्हतं. सशक्त केंद्राच्या बरोबरीने सत्तेचे शक्य तितके विकेंद्रीकरण व्हावे आणि राजकीय प्रक्रियांमध्ये लोकांना अधिकाधिक सहभाग घेता यावा असा त्यांचा दृष्टिकोन होता. मार्गदर्शक तत्त्वांपैकी ४० व्या अनुच्छेदानुसार, गावांमध्ये ग्रामपंचायतींचं संघटन करण्यात यावे असे सुचवले गेले. तसेच ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीच्या माध्यमातून राजकीय विकेंद्रीकरण केले गेले. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून लोकशाही राजकीय प्रक्रिया प्रत्येक गावात आणि शहरात पोचली.

या स्थानिक स्वराज्याच्या केंद्रांमध्ये त्या ठिकाणच्या पारंपरिक सत्ताधारी गटांच्या हातातच सत्ता राहण्याचा धोका होता. विशेषतः दलित, आदिवासी समूहांना आणि स्त्रियांना शेकडो वर्षांच्या वंचनेच्या तुलनेत नुकतीच राजकीय प्रक्रियेत लोकप्रतिनिधी म्हणून सहभागी होण्याची संधी मिळाली होती. राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी होताना त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे या व्यवस्थेमध्ये दलित, आदिवासी आणि स्त्रियांचे प्रमाण अगदी नगण्य होते. ही राजकीय स्वराज्याची कल्पना न्याय्य व्हावी म्हणून ग्रामपंचायती आणि नगरपालिकांमध्ये स्त्रियांसाठी एक तृतीयांश आणि दलित आणि आदिवासींसाठी त्यांच्या त्या भागातील लोकसंख्येतल्या प्रमाणानुसार जागा राखीव ठेवण्यात आल्या. शिवाय दलित आणि आदीवासींसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागांपैकी एक तृतियांश जागा त्या समूहातील स्त्रियांसाठी राखीव ठेवल्या गेल्या. नारी शक्ति वंदन अधिनियम(२०२३) नुसार आता विधानसभा आणि लोकसभा या दोन्ही सभागृहातील एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. २०२६ सालात प्रस्तावित असलेल्या जनगणनेनंतर हे महिला आरक्षण लागू होईल अशी अपेक्षा आहे.

थोडक्यात, आरक्षणाच्या माध्यमातून सामाजिक न्याय, कल्याणकारी, लोकाभिमुख योजनांच्या मार्फत आर्थिक न्याय आणि यथायोग्य प्रतिनिधित्वाच्या माध्यमातून राजकीय न्याय अशी भारतीय संविधानातील तात्त्विक मांडणी दिसून येते.

३.२.६ लोकशाही

अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची केलेली सोपी व्याख्या अनेकदा सांगितली जातेः लोकांनी, लोकांची आणि लोकांसाठी तयार केलेली शासनव्यवस्था म्हणजे लोकशाही व्यवस्था होय. लोकांनी एकत्रितपणे निर्णय घ्यायचा असेल तर त्यासाठीची सामूहिक निर्णय घेण्यासाठीची व्यवस्था स्थापन करणे अनिवार्य आहे. अगदी घरामध्येही एखादा निर्णय घ्यायचा असेल तरी सर्वांचे एकमत होत नाही आणि त्यावरुन भांडणे होतात. त्यामुळे भारतासारख्या प्रचंड मोठ्या लोकसंख्येच्या देशात सर्वांना निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होणे शक्य नाही. त्यामुळेच आपण प्रातिनिधिक आणि अप्रत्यक्ष लोकशाहीचे प्रारूप स्वीकारले. त्यामुळे लोकशाहीतील पहिला भाग आहे तो सामूहिक निर्णयप्रक्रियेचा.

आपल्या वतीने आपले प्रतिनिधी निर्णय घेतात. आपण निवडणुकीच्या माध्यमातून आपले प्रतिनिधी निवडतो. त्यासाठीच मुक्त आणि खुल्या वातावरणात निवडणुका होतील, असा अवकाश निर्माण करण्याची तरतूद संविधानामध्ये करण्यात आली. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२६ नुसार व्यक्तीला मतदान करण्याचे स्वातंत्र्य मान्य करण्यात आले. त्यामुळे लोकशाहीचा दुसरा भाग आहे तो स्वातंत्र्याचा.

या स्वातंत्र्याचा अवकाश प्रत्येकासाठी असला पाहिजे. एखाद्याचे मत दुस—याच्या मतापेक्षा वेगळे आहे, यामुळे त्याचे मत डावलता कामा नये. व्हॉल्टेअर यांच्या चरित्रकार इवलीन बेत्रीस हॉल म्हणाल्या होत्या की, मी तुझ्या मताशी पूर्णपणे असहमत असले तरीसुद्धा तुला तुझे मत मांडण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळावे, यासाठी मी आमरण लढेन. याचाच अर्थ लोकशाहीमध्ये असहमतीचा अवकाश असला पाहिजे. सर्वांच्या मताचा समान आदर अर्थात समतेचे तत्त्व हा लोकशाहीचा तिसरा गाभाभूत भाग आहे.

अशा प्रकारे इतरांच्या मतांकडे उदारपणे पाहता येण्यासाठीची दृष्टी निर्माण होण्यासाठी सहिष्णुता निर्माण व्हायला हवी. सहिष्णुता ही एकमेकांप्रती प्रेम, आदर, जिव्हाळा असल्याशिवाय निर्माण होऊ शकत नाही. त्यासाठी बंधुभाव गरजेचा आहे. वरती उल्लेख केल्याप्रमाणे बंधुतेऐवजी 'सहभाव' हा शब्द अधिक योग्य. त्यामुळे सहभाव हा लोकशाहीचा चौथा भाग.

लोकशाहीच्या अनेक व्याख्या केल्या गेल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५२ साली 'कंडिशन्स प्रिसिडंट फॉर द सक्सेसफुल वर्किंग ऑफ डेमॉक्रसी' या शीर्षकाखाली लिहिलेल्या निबंधात लोकशाहीची एक नवी व्याख्या दिलीः लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात कोणत्याही रक्तपाताशिवाय क्रांतिकारी बदल घडवून आणण्यासाठीची शासन व्यवस्था आणि तिचे रूप म्हणजे लोकशाही होय ! या व्याख्येमध्ये दोन बाबी आहेत. एक म्हणजे लोकशाही व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता आहे. दुसरे म्हणजे रक्ताचा एकही थेंब न सांडता असे बाबासाहेब म्हणतात तेव्हा ते अहिंसेकडे निर्देश करतात. मोहनदास करमचंद गांधी यांनीही अहिंसेच्या मूल्यावर भर दिलेला होता. त्यामुळे एकूणात लोकशाहीच्या तत्त्वज्ञानामध्ये अहिंसात्मक पद्धतीने वादविवाद, चर्चा विमर्श होणे अपेक्षित आहे.

थोडक्यात, लोकशाही ही सामूहिक निर्णय प्रक्रियेची व्यवस्था आहे. त्यासाठी प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य असले पाहिजे. सर्वांच्याच स्वातंत्र्याला समान आदर आणि प्रतिष्ठा मिळाली पाहिजे जेणेकरुन प्रत्येकाच्या मताचे मोल समान राहील. 'एक व्यक्ती एक मत आणि एक मत– समान पत' हे राजकीय लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे. त्यामुळे समता या तत्त्वाचे मूल्य अधोरेखित होते. यासाठी समाजामध्ये अहिंसा आणि सहभावाची आवश्यकता आहे.

भारताच्या संविधानामध्ये यासाठी स्वायत्त निवडणूक आयोगाची तरतूद केलेली आहे. व्यक्तीला स्वातंत्र्य आणि समता विषयक मूलभूत हक्क आहेत, हे मान्य केले आहे. सहभाव जोपासला जाईल यासाठीची सार्वजनिक धोरणे आखणे आवश्यक आहे आणि नागरिकांनी सौहार्द जपण्यासाठी प्रयत्न करणे हे कर्तव्य असल्याचेही म्हटले आहे.

३.२.७ धर्मनिरपेक्षता

'धर्मनिरपेक्ष' हा शब्द संविधानाच्या उद्देशिकेत ४२ व्या घटनादुरुस्तीने जोडला गेला; मात्र भारतीय संविधानाच्या तत्त्वज्ञानात धर्मनिरपेक्ष शिकवणुकीचा समावेश पहिल्यापासून होता. उद्देशिकेत धर्मनिरपेक्ष आणि समाजवाद हे दोन शब्द जोडण्याच्या घटनादुरुस्तीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले होते २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मी संधीग्ध निवाड्यानुसार भारतीय संविधानाचे स्वरुप धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी असल्यामुळे हे दोन शब्द उद्देशिकेत जोडण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालया द्वारा उचित ठरवण्यात आला आहे. धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेबाबत बराच संभ्रम झालेला असल्यामुळे भारतीय चौकटीत धर्मनिरपेक्षतेचे प्रारूप समजावून घेण्याची आवश्यकता आहे.

धर्माच्या अनुषंगाने विचार केल्यास तीन प्रकारच्या राज्यसंस्था दिसतात.

१. दैवी राज्यसंस्था (थिओक्रॅटिक)
२. धर्मनिरपेक्ष राज्यसंस्था (सेक्युलर)
३. नास्तिक राज्यसंस्था (ॲथिएस्ट).

दैवी राज्यसंस्था धर्माचा आधार घेत कायदेकानून तयार करते. असे राज्य धर्मग्रंथांवर आधारलेले असते. उदाहरणार्थ, इराणमध्ये दैवी राज्यसंस्था आहे कारण धर्म हा तेथील राज्यसंस्थेचा पाया आहे. नास्तिक राज्यसंस्थेमध्ये धर्माला पूर्णपणे नाकारले जाते. उदाहरणार्थ, चीनमध्ये राज्यसंस्था धर्माला नाकारते. धर्मनिरपेक्ष राज्यसंस्थेमध्ये राज्याच्या आणि धर्माच्या कक्षेचे अलगीकरण केले जाते. उदाहरणार्थ फ्रान्स या देशात धर्माचे क्षेत्र वेगळे आणि राज्यसंस्थेचे वेगळे, अशी रचना केलेली आहे.

संविधानाच्या उद्देशिकेत भारतीय गणराज्य धर्मनिरपेक्ष आहे, असे म्हटले आहे. याचा अर्थ आपली राज्यसंस्था फ्रान्सप्रमाणे धर्मनिरपेक्ष आहे काय ? याचे उत्तर 'नाही' असे आहे. आपण धर्मनिरपेक्ष आहोत काय ? याचे उत्तर 'होय, आपण धर्मनिरपेक्ष आहोत' असेच आहे. असा अंतर्विरोध कसा काय ?

त्याचे स्पष्टीकरण सोपे आहे. बहुतेक पाश्चात्त्य राष्ट्रांमध्ये एकच धर्म आहे ख्रिश्चन. त्यांच्याकडे पोपचे (ख्रिश्चन धर्मगुरु) कार्यक्षेत्र वेगळे आणि राजाचे/ राज्यसंस्थेचे कार्यक्षेत्र वेगळे. सोपा अर्थ असा की राज्यसंस्था धर्माच्या क्षेत्रामध्ये ढवळाढवळ करणार नाही आणि धर्म राज्यसंस्थेच्या क्षेत्रात हस्तक्षेप करणार नाही. थोडक्यात, धर्म आणि राज्यसंस्थेमध्ये एक मोठी भिंत आहे. पाश्चात्त्य धर्मनिरपेक्षतेचे हे प्रारूप आहे.

भारतात मात्र परिस्थिती वेगळी आहे. आपल्याकडे अनेक धर्म आहेत. त्यामुळे राज्यसंस्थेने धर्मासोबत कसे संबंध प्रस्थापित करायचे, त्याचे नियमन कसे करायचे, असा प्रश्न उभा राहतो. त्याचे उत्तर भारतीय संविधानाने दिले आहे. ते थोडे गुंतागुंतीचे आहे. भारतीय धर्मनिरपेक्षतेचे उत्तर आहेः

१. राज्यसंस्था कोणताही धर्म अधिकृतरित्या स्वीकारणार नाही.
२. राज्यसंस्था कुठल्याही एका धर्माबाबत आस्था बाळगणार नाही किंवा कुठल्याही एका धर्माबाबत अनादर बाळगणार नाही.
३. कोणता धर्म स्वीकारावा किंवा कोणताच धर्म स्वीकारू नये हे ठरवण्याचा अधिकार व्यक्तीला असेल.
४. राज्यसंस्था धर्माच्या क्षेत्रापासून वेगळी असेल मात्र आवश्यकता भासेल तेव्हा ती धर्माच्या क्षेत्रात हस्तक्षेप करेल. आधुनिक राज्यव्यवस्था अस्तित्वात येण्याच्या पूर्वीच्या काळात धर्मसत्ता अध्यात्मिक मार्गदर्शनासोबतच काही सार्वजनिक जीवनाचे नियमनाची ही जबाबदारी पार पाडत होती जे मुद्दे आर्थिक

आहेत व्यापार विषयक आहेत किंबहुना धर्मनिरपेक्ष आहेत अशा मुद्दयांच्या बाबतीत आधुनिक राज्यव्यवस्था अस्तित्वात येण्यापूर्वीच्या काळात धर्म सत्तेचे काही एक म्हणणे असले तरी आता त्या मुद्दयांच्या बाबतीत कायदे करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने राज्यव्यवस्थेला दिला आहे.

संविधानातील अनुच्छेद २५ ते २८ धर्मविषयक स्वातंत्र्याचे आहेत. अनुच्छेद २५ नुसार प्रत्येक व्यक्तीला सद्सद्विवेकाचे स्वातंत्र्य (फ्रीडम ऑफ कॉन्शन्स) आहे. सद्सद्विवेकाचा अर्थ असा की, चांगले–वाईट, चूक–बरोबर हे ठरवण्याची क्षमता. सर्वांनी एकच धर्म स्वीकारला पाहिजे किंवा राज्यसंस्थेने कोणता तरी एक विशिष्ट धर्म स्वीकारला पाहिजे, असे चित्र भारतात नाही. व्यक्ती तिच्या श्रद्धेनुसार, विवेकानुसार आचरण करु शकते. ती कोणताही धर्म स्वीकारु शकते किंवा सर्व धर्म नाकारुन नास्तिकही राहू शकते. भारतीय धर्मनिरपेक्षतेचे हे तत्त्वज्ञान लोकशाहीस पूरक आहे.

भारतीय धर्मनिरपेक्षतेचे वेगळेपण खालील प्रकारे सांगता येईलः भारतीय राज्यसंस्था कुठलाही धर्म स्वीकारत नाही. कुठल्या एका धर्माचे वर्चस्व मान्य करत नाही. भारतीय धर्मनिरपेक्षता धर्मांतर्गत वर्चस्व आणि आंतरधर्मीय वर्चस्वाला समान विरोध करते. राज्यसंस्था धर्माच्या अधिकारक्षेत्रात सकारात्मक हस्तक्षेप करते. हा हस्तक्षेप तात्विक स्वरुपाचा असून सामाजिक सुधारणेस प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जातो. इतर पाश्चात्य राष्ट्रांमधील राज्यसंस्था याबाबत उदासीन असतात. भारतीय राज्यसंस्था त्याविषयी सक्रिय भूमिका घेते.

भारतीय धर्मनिरपेक्षता अल्पसंख्यांकाना विशेष अधिकार देते. हे अधिकार समूहाच्या चालीरितींवर आधारित असून बहुसंख्यांकवादाचे वर्चस्व निर्माण होऊ नये व अल्पसंख्यांकाना आपली भाषा लिपी आणि संस्कृतीचे जतन करता यावे, या हेतूने दिले आहेत. बहुसंख्यांकवादाचे वर्चस्व म्हणजे भारतात हिंदू बहुसंख्य आहेत, मग हिंदू लोक म्हणतील तेच अंतिम, प्राधान्याचे, असं होण्याची शक्यता असते. त्यामुळे ही विशेष योजना केली आहे. यातून धर्मनिरपेक्षता अधिक गुणवत्तापूर्ण होते, असे दिसते.

३.२.८ समाजवाद

धर्मनिरपेक्षतेप्रमाणेच 'समाजवाद' हा शब्दही संविधानाच्या उद्देशिकेत ४२ व्या घटनादुरुस्तीने १९७६ साली जोडण्यात आला. घटनादुरुस्तीने हा शब्द नंतर जोडलेला असला तरी समाजवादाची तत्त्वे सुरुवातीपासून भारतीय संविधानामध्ये होती. मुळात समाजवादाचे तत्त्व काय आहे, ते समजावून घेतले पाहिजे. कोणत्याही समाजाला तीन प्रश्नांची उत्तरं द्यावी लागतातः

१. देशामध्ये कोणत्या वस्तू आणि सेवा यांचं उत्पादन प्राधान्याने केलं जावं ?

२. या वस्तू आणि सेवा यांचे उत्पादन कशा प्रकारे व्हावे ? यामध्ये मानवी श्रमाचा अधिक वापर केला जावा की हे उत्पादन अधिकाधिक यंत्रांच्या मार्फत व्हावे ?

३. या वस्तू आणि सेवांचे वितरण कशा प्रकारे व्हावे ?

या प्रश्नांची उत्तरे आपण कशी देतो, यावरुन आपल्या आर्थिक व्यवस्थेचे स्वरुप ठरते. भांडवलशाही समाजात आणि समाजवादी समाजात या प्रश्नांची वेगळी उत्तरे आहेत.

भांडवलशाही समाजात मागणी आणि पुरवठा या तत्त्वानुसार या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. पहिल्या प्रश्नाचं उत्तर भांडवलशाही समाजात ज्या वस्तूंना अधिक मागणी आहे, त्यांचे अधिक उत्पादन केले जावे, असे आहे. देशातील किंवा परदेशातील बाजारात ज्या वस्तूंच्या विक्रीतून अधिक फायदा होईल अशा वस्तूंचं उत्पादन केले जावे. पर्यायाने अधिकाधिक नफा ज्यातून प्राप्त होईल, अशा वस्तूंचे उत्पादन केले जावे. म्हणजे समजा कोल्ड्रींकला अधिक मागणी असेल तर त्यांचे उत्पादन केले जाईल, औषधांना कमी मागणी असेल तर त्यांचे कमी उत्पादन केले जाईल. जर यंत्रांपेक्षा मानवी श्रम अधिक स्वत असेल तर या उत्पादनासाठी अधिकाधिक मानवी श्रम वापरले जातील. याच्याउलट, मानवी श्रमांहून यंत्रांच्या आधारे उत्पादन स्वस्तात होत असेल तर अधिकाधिक उत्पादन यंत्रांच्या आधारे

व्हावे, असे दुस-या प्रश्नाचे उत्तर आहे. आता तिसरा प्रश्न आहे तो या वस्तू आणि सेवा यांचे वितरण कसे करावे ? भांडवलशाहीच्या तर्कानुसार, लोकांच्या गरजांनुसार नव्हे तर क्रयशक्तीनुसार वस्तूंचे वितरण करावे. क्रयशक्ती म्हणजे खर्च करण्याची क्षमता. व्यक्तीच्या खिशात किती पैसे आहेत, यानुसार त्याचे वितरण केले जाईल. थोडक्यात नफा आणि ग्राहकाची खर्च करण्याची शक्ती या दोन घटकांच्या आधारे भांडवलशाहीचे स्पष्टीकरण देता येते.

समाजवाद या तीनही प्रश्नांची उत्तरे वेगळी देतो. समाजवादी समाजात कोणत्या वस्तूंचे उत्पादन करावे, हे शासन ठरवेल. कोणत्या वस्तूंचे उत्पादन करावे, हे ठरवताना शासनाने समाजाच्या गरजा लक्षात घ्याव्यात, अशी अपेक्षा आहे. समाजाला काय आवश्यक आहे, त्यानुसार उत्पादनाबाबत निर्णय घ्यावा. या म्हणण्यामध्ये शासनाला समाजाच्या गरजा ठाऊक आहेत, समाजाचे हित माहिती आहे, असे गृहीतक आहे. लोकांना काय परवडू शकतं, याचा शासनाने विचार करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ अत्यावश्यक आरोग्य सेवा मोफत देण्याचा निर्णय समाजवादी समाजात अपेक्षित आहे. भांडवलशाही समाजाच्या तर्कानुसार हे चुकीचे आहे कारण त्यातून काहीही नफा नाही. तसेच समाजवादात वस्तू आणि सेवा यांचे वितरण कशा प्रकारे व्हावे, हेही शासनाने ठरवावे, अशी अपेक्षा आहे. यामध्ये सर्व काही शासनाच्या मालकीचे असेल आणि सर्वांपर्यंत न्याय्य पध्दतीने वस्तूंचे वितरण होईल, असा विचार केला गेला आहे. क्युबासारख्या देशामध्ये सर्व काही सरकारच्या मालकीचे आहे.

मिश्र अर्थव्यवस्थेत सरकार आणि बाजार अर्थव्यवस्था दोन्ही संस्था कशाचं उत्पादन केले जावं, कोणत्या प्रकारे केले जावे आणि कशा प्रकारे वितरित केले जावे हे ठरवतात. साधारणपणे अत्यावश्यक वस्तू, सेवा सरकार पुरवेल आणि इतर वस्तू, सेवांवर खाजगी क्षेत्राचे नियंत्रण असेल, अशी रचना असते. भारताने अधिकाधिक समाजवादी तत्त्वांचा अवलंब करत मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली.

कल्याणकारी राज्यसंस्था लोकांना केंद्रबिंदू मानते. समाजवादी राज्यसंस्था लोकांना डोळ्यासमोर ठेवून धोरणे आखते. योजना राबवते. संविधानातील चौथ्या भागाने राज्यसंस्थेसाठीची मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत. यापैकी एकोणचाळिसावा अनुच्छेद पाच प्रमुख तत्त्वे राज्यसंस्थेसाठी सांगतोः

१) उपजीविकेचे पुरेसे साधन मिळवण्याचा हक्क स्त्री व पुरुषांना सारखाच असावा. उपजीविका हा जगण्याचा मूलभूत भाग आहे. जगण्याच्या अधिकारात त्याचा समावेश होतो. तसेच अनुच्छेद १५ आणि १६ मध्ये स्त्री/पुरुष असा भेदभाव केला जाणार नाही, असे म्हटलेले आहेच. या तत्त्वांशी सुसंगत असे हे पहिले तत्त्व आहे.

२) सामूहिक हिताचा विचार करुन भौतिक साधनसंपत्तीची मालकी आणि वितरण याबाबत विभागणी केली जावी. समाजवादाचे हे मूलभूत तत्व आहे. या विभागणीच्या तत्वाचाच विस्तार म्हणून तिसरे तत्व मांडलेले आहे.

३) संपत्तीचे आणि उत्पादन साधनांचे एकत्रीकरण होऊन सामूहिक हितास बाधा येईल, अशा प्रकारे आर्थिक यंत्रणा राबवण्यात येता कामा नये. दुस-या आणि तिसऱ्या तत्वांमध्ये सामूहिक हिताचा मुद्दा मांडला आहे. सर्वांचे हित लक्षात घेणे ही राज्यसंस्थेची जबाबदारी आहे आणि कर्तव्यही. एकाच व्यक्तीच्या किंवा मूठभर उद्योगपतींच्या हाती सर्व साधने असू नयेत, असा या तत्त्वाचा अर्थ आहे. संपत्तीचे आणि उत्पादनांचे केंद्रीकरण हा सगळ्यात मोठा धोका आहे.

४) पुरुष आणि स्त्रिया यांना समान कामाबद्दल समान वेतन मिळाले पाहिजे. वाचताना साधे वाटणारे हे तत्त्व अनेकदा पायदळी तुडवले जाते. अशिक्षित किंवा कमी शिकलेल्या महिला ज्या असंघटित क्षेत्रात काम करतात अशा ठिकाणी अनेकदा पुरुषाला अधिक मोबदला दिला जातो तर स्त्रीला कमी. काम समान प्रकारचे असतानाही असा भेद सर्रास केला जातो.

५) स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य आणि बालकांचे कोवळे वय याचा दुरुपयोग करु नये. आर्थिक गरजेपोटी त्यांना न पेलणा-या व्यवसायात किंवा कामात शिरण्यास भाग पाडू नये. अनेकदा आर्थिक गरज असल्यामुळे

स्त्री/पुरुष यांना न पेलणारी किंवा धोकादायक कामे करावी लागतात. हे लक्षात घेऊन अशा तरतुदी केलेल्या आहेत.

पं. नेहरु यांना समाजवादी विचारधारेविषयी आस्था होती; मात्र त्यांना ब्रिटिश वळणाचा समाजवाद नको होता. रशियात झालेल्या साम्यवादी क्रांतीच्या (१९१७) तत्त्वज्ञानाने ते भारावून गेले होते; मात्र साम्यवादी विचारधारा त्यांना अपेक्षित नव्हती. भारतीय वातावरणाशी सुसंगत असे धोरण स्वीकारणे गरजेचे आहे, असे त्यांना वाटत होते. भुवनेश्वर काँग्रेस अधिवेशनाचे (१९६४) नेहरु अध्यक्ष होते. या अधिवेशनात जो ठराव झाला त्यातही भारतीय लोकशाही समाजवादाची मुळं दिसून येतात. एकूणात शेवटच्या माणसाला डोळ्यासमोर ठेवून भारतीय समाजवादी तत्त्वज्ञान आकाराला आले आहे.

स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न.

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. कोणत्या घटनादुरुस्तीद्वारे 'समाजवाद' आणि 'धर्मनिरपेक्ष' हे शब्द संविधानाच्या उद्देशिकेत जोडले गेले ?
२. संविधानातील अनुच्छेद ३२६ नुसार कोणता अधिकार मान्य करण्यात आला आहे ?
३. 'ऑन लिबर्टी' हा ग्रंथ कोणी लिहिला?
४. संविधानाचा चौथा भाग कशाविषयी आहे ?

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **संसदीय लोकशाही :** या व्यवस्थेत लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या सभागृहास (संसदेस) सर्व अधिकार असतात. लोकप्रतिनिधी कायद्याची निर्मिती करतात आणि त्यानुसार व्यवहार होतो.
- **धर्मनिरपेक्ष व्यवस्था :** कोणत्याही विशिष्ट धर्माला विशेष/ अधिकृत मान्यता न देता समताधिष्ठित व्यवहार होण्यासाठीची व्यवस्था.
- **समाजवाद :** संपत्तीचे, संसाधनांचे समान नियंत्रण व वितरण करणारी आर्थिक व्यवस्था म्हणजे समाजवाद होय.

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. बेचाळिसावी घटनादुरुस्ती
२. मतदानाचा अधिकार
३. जे.एस.मिल
४. राज्यसंस्थेसाठीची मार्गदर्शक तत्त्वे

३.५ सारांश

'आम्ही भारताचे लोक' असे म्हणताना स्वतःचा निर्णय स्वतः घेणे, हे सार्वभौम असण्याचे तत्व आपण अंगीकृत केले. आपल्या निर्णयाच्या प्रक्रियेत परकीय कुणी ढवळाढवळ करणार नाही, असाही अर्थ त्यात दडला

आहे. आर्यलंडच्या पावलावर पाऊल ठेवून संविधानाचा अखेरचा अनुच्छेद ठरलेल्या ३९५ व्या अनुच्छेदान्वये ब्रिटिशांचा 'भारतीय स्वातंत्र्य कायदा'देखील रद्दबातल किंवा निरस्त केला गेला. हे एक प्रकारे 'आमचे स्वातंत्र्य आता आमचेच असेल. ते कुणीही 'दिलेले' नसेल.' हे सुचवणारे पाऊल होते. आपल्या संविधानकर्त्यांची ही कृती आपल्या संविधानाचे स्वयंभू अस्तित्व अधोरेखित करणारी आहे. कुणा परक्या सत्तेने दिले म्हणून नव्हे, तर लोकांनी मिळवलेले हे स्वातंत्र्य आहे आणि ते राखणारे संविधानदेखील 'लोकांनी, लोकांना प्रदत्त केलेले' आहे, यातून संविधानाचा स्रोत 'परका' नसल्याचे स्पष्ट होते. ही निर्णय प्रक्रिया कुणा एका व्यक्तीच्या हातात असणार नाही, अशी अपेक्षा सतत व्यक्त केली गेली. आपले संविधानकर्ते कुणी एक व्यक्ती सा-या समाजाचं भलं करेल, अशा भ्रमात नव्हते. विभूतीपूजा हा आपल्या समाजाला जडलेला रोग आहे, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेच्या शेवटच्या भाषणात म्हणाले होते. ॲडॉल्फ हिटलर आणि बेनितो मुसोलिनी यांचे अनुक्रमे जर्मनी आणि इटली येथील राज्य पाहून तर हुकूमशाही देशाला खाईत लोटते, याची खात्रीच पटते. मुळात निर्णय एका व्यक्तीने घ्यावा, यामागचे गृहीतक 'एका व्यक्तीलाच सर्वांहून अधिक कळते', असे आहे. हे गृहीतकच चुकीचे आहे. म्हणून ही निर्णय प्रक्रिया अधिकाधिक सर्वसमावेशक व्हावी, या हेतूने लोकशाहीची राजकीय रचना स्वीकारली. भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या आसपास आहे. अर्थातच यातील प्रत्येक व्यक्तीचा थेट निर्णयांमध्ये सहभाग असणे निव्वळ अशक्य आहे म्हणूनच आपण प्रतिनिधी निवडण्याची एक रचना तयार केली. हे प्रतिनिधी आपल्या वतीने निर्णय घेतील मात्र हे प्रतिनिधी निवडण्याचं स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. सर्वांना समान अधिकार आहे, अशी तरतूद आपण करतो तेव्हा आपण समतेचे तत्त्व अंमलात आणतो. या दोन्ही मूल्यांच्या अंगीकारासाठी बंधुतेची/सहभावाची आवश्यकता असते, हेही आपण पाहिले. कुठल्याही प्रकारच्या विषमतेला उत्तर हे सामाजिक,आर्थिक आणि राजकीय न्यायाच्या पालनातून दिले जाऊ शकते, असे आपण मानले.यात धर्माच्या आधारे भेदभाव करता कामा नये, यासाठीही प्रयत्न केले गेले. राज्यसंस्थेने कोणताही अधिकृत धर्म स्वीकारु नये, हे धर्मनिरपेक्षतेचे तत्त्वही आपण स्वीकारले. समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा, त्यांना प्रगतीची संधी मिळावी, यासाठी राज्यसंस्थेने विशेष प्रयत्न करावे, असं सांगणारा राज्यसंस्थेसाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांचा भाग समाजवादी स्वरुपाचा आग्रह धरतो. भारतीय संविधानाच्या तत्त्वज्ञानाचा आशय गोळीबंद स्वरूपात उद्देशिकेत मांडला आहे. तांत्रिक तपशिलांच्या पलीकडे हा व्यापक आशय समजावून घेणे त्यासाठीच महत्वाचे आहे.

३.६ सरावासाठी स्वाधाय

१. संविधानाच्या प्रास्ताविकेतील 'स्वातंत्र्य' यावर टीप लिहा.
२. भारतामध्ये कोणकोणत्या प्रकारची विषमता दिसते? संविधानामध्ये समतेचे तत्व कुठे दिसून येते?
३. भारतीय धर्मनिरपेक्षता पाश्चात्य धर्मनिरपेक्षतेपेक्षा कोणत्या बाबतीत वेगळी आहे? कशाप्रकारे?

३.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके

१. श्रु. ग., राही, & आवटे, श्रीरंजन. (२०१९). *आपलं आयकार्ड.* द युनिक फाउंडेशन.
२. चंढोक, नीरा. (२०२४). *वी द पीपल नीरा ॲन्ड अवर कॉन्स्टीट्यूशन.* स्पीकिंग टायगर.
३. घोटाळे, विवेक. (२०२५). *विद्यार्थ्यांसाठी भारतीय राज्यघटना.* द युनिक फाउंडेशन.

घटक ४ : भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय-विवेचन

४.२.१ भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये

४.२.२ संविधानावरील टीका

४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर -

- भारतीय संविधानाचे वेगळेपण ध्यानात येईल.
- भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये समजतील.
- भारतीय संविधानाच्या संरचनेचे आकलन होईल.

४.१ प्रास्ताविक

या पुस्तकाच्या दुस–या घटकात भारतीय संविधानाच्या निर्मितीच्या वेळेस कोणकोणत्या स्त्रोतांचा विचार झाला, याबाबत चर्चा केलेली आहे. भारतीय संविधानामध्ये अनेक कायद्याच्या दस्तावेजांचा विचार केलेला असला तरीही भारतीय संविधानाची अनेक वैशिष्ट्ये एकमेवाद्वितीय अशी आहेत. त्यामध्ये अनेक लक्षणीय बदल केलेले आहेत. कोणत्याही बाबींचे तंतोतंत अनुकरण केलेले नाही. त्यामुळेच भारतीय संविधान हा एक विशेष लक्षवेधी कायद्याचा दस्तावेज आहे.

अमेरिकन अभ्यासक ग्रॅनवील ऑस्टीन यांनी भारतीय संविधानाला 'सामाजिक दस्तावेज' (सोशल डॉक्युमेंट) म्हटले आहे. संविधान हा कायद्याचा दस्तावेज आहेच; मात्र ऑस्टीन जेव्हा त्याला सामाजिक दस्तावेज असे म्हणतात तेव्हा संविधानाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाच्या शक्यता त्यांना सूचित करायच्या होत्या. समाजामध्ये परिवर्तन घडवून आणू शकेल, असे संविधानात नेमके काय आहे ? ते समजून घेण्यासाठी भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये समजावून घेतली पाहिजेत.

४.२ विषय-विवेचन

भारतीय संविधानाने व्यक्ती, समाज आणि राज्यसंस्था या तिन्ही घटकांमधील नातेसंबंध स्पष्ट केले आहेत. व्यक्ती आणि धर्म, व्यक्ती आणि राज्यसंस्था तसेच वेगवेगळे जात, धर्म, वर्ग समूह यांच्यातील परस्परसंबंध कसे असतील, हे निर्धारित केलेले आहे. त्यासोबतच केंद्र आणि राज्य पातळीवरील शासनव्यवस्थेचे प्रारूप मांडले आहे. केंद्र आणि राज्यांचे संबंध, प्रशासकीय व्यवस्था यांविषयी संविधानामध्ये तपशीलवार तरतुदी केलेल्या आहेत. या सर्व तरतुदींचा, अनुच्छेदांचा आणि दुरुस्त्यांचा विचार करता भारतीय संविधानाची सारांश रूपाने काही वैशिष्ट्ये सांगता येतात ती खालीलप्रमाणेः

१. जनतेचे सार्वभौमत्व

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची सुरुवातच 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांनी होते. भारतीय संविधानाच्या अधिमान्यतेचा अंतिम स्त्रोत भारतीय लोक आहेत, असे त्यातून सुस्पष्ट होते. संसद, कॅबिनेट मंत्री, पंतप्रधान, न्यायालय यांपैकी कोणाकडेही अंतिम सत्ता नाही. अंतिम सत्ता ही लोकांमधून निर्माण होईल. जनता सार्वभौम आहे. जनतेला आपले सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यासाठीची पद्धत संविधानामध्ये दिलेली आहे.

२. लिखित संविधान

संविधान हे लिखित किंवा अलिखित स्वरूपात असू शकते. अमेरिकन संविधान लिखित स्वरूपातील आहे तर ब्रिटिश संविधान अलिखित स्वरूपातील आहे. भारताचे संविधान हे जगातील सर्वांत मोठे लिखित संविधान आहे.

भारताच्या मूळ संविधानामध्ये ३९५ अनुच्छेद होते. ते २२ भागात विभागलेले होते आणि ८ परिशिष्टे (आता १२ आहेत) होती. भारताचे संविधान इतके दीर्घ आहे त्याला अनेक कारणे आहेत. भारताची लोकसंख्या प्रचंड आहे. जगातील एकूण लोकसंख्येच्या साधारण १/६ लोक भारतात राहतात. त्यामुळे एवढ्या मोठ्या जनसमुदायासाठी सर्वमान्य असा कायद्याचा दस्तावेज तयार करणे जिकिरीचे होते. सर्व समाजघटकांचा विचार करणे भाग होते. लोकसंख्येसोबतच भारतीय भूप्रदेश एखाद्या खंडासारखा आहे. त्यामुळे विशाल भूप्रदेश, प्रचंड लोकसंख्या आणि विविधता या सर्व बाबींचा विचार केल्याने भारताचे संविधान मोठे झाले आहे.

काही देशांमध्ये केंद्राकरता स्वतंत्र संविधान आणि घटकराज्यांची वेगवेगळी संविधाने अशीही व्यवस्था केलेली असते. भारतामध्ये मात्र केंद्र आणि राज्यांसाठी एकच संविधान आहे. त्यामुळे सर्व राज्यांचा विचार करुन केंद्र—राज्य संबंधांचा आराखडाही ठरवल्याने संविधानाचा आकार मोठा आहे. तसेच संविधानसभेतील अनेक सदस्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी कायद्याची होती. स्वाभाविकच कायद्याच्या दस्तावेजामध्ये नेमकेपणा असला पाहिजे, याबाबत ते दक्ष होते. त्यामुळे प्रशासकीय सोयीसाठी सर्व बाबी तपशीलवार मांडणे गरजेचे होते. त्यामुळेही भारतीय संविधान हा सर्वांत मोठा लिखित दस्तावेज झाला आहे.

भारताचे संविधान 'जगातील सर्वांत मोठे संविधान' म्हणून ओळखले जाते; मात्र हा संविधानावरील टीकेचाही मुद्दा आहे. संविधानातील काही अनावश्यक बाबींचा विनाकारण सविस्तर ऊहापोह केलेला आहे तर काही महत्त्वाच्या बाबींविषयी स्पष्टता नाही, असा आक्षेप घेतला जातो. भारताची एकूण लोकसंख्या आणि विविधता लक्षात घेत सर्व बाबींचा विचार करत ३९५ अनुच्छेदांचे आणि ८ परिशिष्टांचे संविधान फार दीर्घ नाही, असाही त्यावर युक्तिवाद केला जातो.

३. ताठरता आणि लवचिकता यांचा समन्वय

काही देशांच्या संविधानांमध्ये बदल करणे अशक्य असते इतके संविधानाचे स्वरूप ताठर असते तर काही देशांच्या संविधानांमध्ये इतका बदल केला जातो की मूळ संविधानाचा आशयच बदलून जाऊ शकतो. भारतीय संविधानाने ताठरता आणि लवचिकता यांचा समन्वय साधला आहे.

भारतीय संविधानामध्ये घटनादुरुस्ती करण्यासाठीची तरतूद ३६८ व्या अनुच्छेदामध्ये केलेली आहे. या दुरुस्त्या दोन प्रकारे केल्या जाऊ शकतातः १. संविधानातील काही सुधारणा संसदेतील उपस्थित गणसंख्येचा विचार करुन विशेष बहुमतासह (दोन तृतीयांश) केल्या जातात. प्रत्येक सभागृहाच्या एकूण संख्येच्या निम्म्याहून अधिक लोकांचे मतदान त्यासाठी आवश्यक असते. २. काही सुधारणांसाठी संसदेच्या विशेष बहुमतासह निम्म्याहून अधिक राज्यांच्या विधिमंडळाची सहमती आवश्यक असते. विशेषतः संघराज्याची चौकट बदलण्याच्या किंवा केंद्र राज्य संबंधांच्या अनुषंगाने दुरुस्ती असल्यास अशा प्रकारचे बहुमत आवश्यक असते.

थोडक्यात, संविधानामध्ये सुधारणा करण्यासाठीची एक कार्यपद्धती दिलेली आहे; मात्र याचा अर्थ संविधानातील कोणताही भाग बदलता येतो किंवा त्यामध्ये सुधारणा करता येते, असे नव्हे. 'केशवानंद भारती' खटल्यात (१९७३) सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले की, संविधानातील दुरुस्ती शक्य आहे; मात्र संविधानाच्या पायाभूत रचनेत बदल करता येणार नाही. या निकालपत्राच्या निमित्ताने 'संविधानाची पायाभूत रचना' काय असेल, हे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. या निकालपत्रानुसार, संविधानाच्या पायाभूत रचनांमध्ये खालील बाबींचा समावेश होतोः

१. संविधानाची सर्वोच्चता: संविधान अंतिम आहे, सत्तेचा मुख्य स्त्रोत संविधान असेल.
२. सार्वभौम, लोकशाही, गणराज्य असे भारताचे राजकीय प्रारूप. लोकशाही तत्त्वांनुसार गणराज्य स्थापित झालेलं आहे, हे पायाभूत रचनेतील आणखी एक तत्त्व आहे.
३. धर्मनिरपेक्ष संविधान: संविधान किंवा राज्यसंस्था धर्माधर्मामध्ये भेद करू शकत नाही.
४. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ यांच्यातील सत्तेची विभागणी: सत्तेचे संतुलन राखण्यासाठी सत्तेची ही विभागणी आवश्यक मानली गेली.
५. संघराज्य प्रारूप: सत्तेचे उभे विभाजन केंद्र, राज्य आणि स्थानिक पातळीवर असेल अशी राज्यव्यवस्थेचा रचना.
६. संवैधानिक एकता आणि एकात्मता
७. सामाजिक आणि आर्थिक न्याय देईल अशी कल्याणकारी राज्यसंस्था
८. न्यायिक पुनर्विलोकन: संसदेने पारित केलेला कायदा संविधानाच्या दृष्टीने वैध आहे की नाही हे न्यायालय ठरवू शकते.
९. व्यक्तीचा सन्मान आणि तिचे स्वातंत्र्य
१०. संसदीय व्यवस्था
११. कायद्याचे राज्य
१२. मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यांच्यातील संतुलन
१३. समतेचे तत्त्व
१४. मुक्त आणि खुल्या वातावरणातील निवडणुका
१५. न्यायालयीन स्वायत्तता

या मूलभूत मूल्यांना धक्का न लावता संविधानामध्ये दुरुस्त्या करता येऊ शकतात. या प्रकारे भारतीय संविधानाने ताठरता आणि लवचिकता यांचे संतुलन साधले आहे.

४. विविध स्त्रोतांचा विचार

या पुस्तकातील दुस–या घटकामध्ये भारतीय संविधानामध्ये विविध स्त्रोतांचा कसा विचार केला गेला, याचे सविस्तर विवेचन केलेले आहेच. भारत सरकार कायदा, १९३५ च्या माध्यमातून भारतीय संघराज्यवादाची चौकट साकारली गेली. भारतीय संविधानाचा ढोबळ आराखडा ठरला तो या कायद्याच्या आधारे. ब्रिटिशांच्या राजकीय परंपरेतून संसदीय लोकशाहीचे प्रारूप संविधानात स्वीकारले गेले. भारताच्या संविधानसभेने इतर अनेक देशांच्या संविधानांचे सूक्ष्म अवलोकन केले. अमेरिकन संविधानाच्या प्रेरणेतून मूलभूत हक्क आणि स्वतंत्र न्यायव्यवस्थेसह न्यायिक पुनर्विलोकन अशी काही वैशिष्ट्ये भारतीय संविधानात स्वीकारली गेली. आयर्लंडच्या संविधानाच्या आधारे राज्यसंस्थेसाठीची मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित झाली.

याशिवाय रशिया, फ्रान्स, कॅनडा, जपान, आयर्लंड, दक्षिण आफ्रिका या देशांकडून काही वैशिष्ट्ये भारतीय संविधानात स्वीकारण्यात आली. अनेक तांत्रिक बाबी ठरवतानाही विविध संविधानांचा विचार केला गेला. भारतीय सामाजिक व राजकीय वास्तवास काय अनुकूल ठरेल, तरतुदींचा भविष्यात काय परिणाम होईल आणि व्यवहारात त्यांची अंमलबजावणी कशी होईल, असा सर्वांगीण विचार करुन संविधानातील अनेक बाबी ठरवल्या गेल्या.

५. संसदीय लोकशाही

भारताच्या संविधानसभेने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. संसदीय लोकशाहीमध्ये कार्यकारी आणि कायदेमंडळाच्या सहकार्यावर आणि समन्वयावर भर असतो. या संसदीय व्यवस्थेला 'वेस्टमिनिस्टर' प्रारूप असेही म्हटले जाते. ब्रिटनमध्ये विकसित झालेली ही व्यवस्था आहे. तेराव्या शतकात वेस्टमिनिस्टर येथे संसद भरली होती तेव्हापासून या व्यवस्थेचे असे नामकरण झाले.

या व्यवस्थेत कार्यकारी मंडळाचे उत्तरदायित्व महत्वाचे मानले जाते. कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाचे सामूहिक उत्तरदायित्व निर्धारित केले जाते. संसदेचे सार्वभौमत्व मान्य केले जाते. राज्याचे प्रमुख आणि सरकारचे प्रमुख वेगवेगळे असतात. बहुपक्षीय व्यवस्था असते. तसेच सामूहिक नेतृत्वास प्राधान्यदिले जाते.

भारतीय संविधानामध्ये अशाच संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला गेला. अमेरिकन अध्यक्षीय लोकशाहीच्या व्यवस्थेऐवजी भारताने ब्रिटिश संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. त्यामुळेच पंतप्रधान आणि राष्ट्रपती अशा दोन पदांची निर्मिती केली गेली. त्यानुसार राष्ट्रपती हे राज्यसंस्थेचे नामधारी प्रमुख आहेत तर सरकारचे कार्यकारी प्रमुख पंतप्रधान असतात. तसेच लोकसभा आणि राज्यसभा अशी दोन्ही सभागृहांची रचना संविधानानुसार अस्तित्वात आली. अशाच प्रकारची संसदीय रचना घटकराज्यांच्या पातळीवर निर्माण केली गेली. त्यानुसार राज्यपाल आणि मुख्यमंत्री अशी दोन पदे अस्तित्वात आली. मुख्यमंत्री हे सरकारचे प्रमुख तर राज्यपाल हे राज्याचे प्रमुख. याशिवाय केंद्र स्तरावर लोकसभा हे कनिष्ठ सभागृह विसर्जित होऊ शकते. तसेच ते लोकनिर्वाचित सदस्यांचे असते. या सर्व तरतुदी संसदीय लोकशाहीशी सुसंगत आहेत. कोणत्याही देशामध्ये प्रत्यक्ष लोकशाही असू शकत नाही. प्रत्यक्ष लोकशाहीचा अर्थ थेट लोकांनीच निर्णय घेणे. त्यामुळेच प्रतिनिधी निवडावे लागतात. भारतीय संविधानाने अप्रत्यक्ष, प्रातिनिधिक संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आहे. भारतीय संविधानाचे हे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

६. स्वतंत्र व एकात्मिक न्यायव्यवस्था

कोणत्याही शासनव्यवस्थेत तीन शाखा महत्वाच्या असतातः कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ. न्यायव्यवस्था स्वतंत्र असेल तरच ती इतर दोन्ही शाखांवर नियंत्रण ठेऊ शकते. त्यामुळेच न्यायालयातील नियुक्त्यांमध्ये राजकीय हस्तक्षेप असणार नाही, अशी व्यवस्था भारतीय संविधानात केलेली

आहे. न्यायालयांनी निष्पक्षपणे निकाल देण्यासाठी हे अत्यावश्यक होते. सर्वोच्च न्यायालय हे देशातील शिखर न्यायालय आहे. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षक आहे. संविधानाची मूलभूत तत्वे टिकवण्याची मुख्य जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर आहे. त्यामुळेच तेथील न्यायाधीशांच्या नियुक्त्या, सेवा शर्ती, निवृत्तीनंतर वकिली व्यवसायात काम करण्यास निर्बंध अशा अनेक बाबी ठरवताना न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित राहील, याची संविधानकर्त्यांनी दक्षता घेतली.

त्याचप्रमाणे संविधानामध्ये एकात्मिक न्यायव्यवस्थेची रचनाही सांगितलेली आहे. सर्वांत शिखर संस्था आहे सर्वोच्च न्यायालय. त्या खालोखाल राज्य पातळीवर उच्च न्यायालयांची रचना ठरवण्यात आली. त्यानंतर जिल्हा न्यायालये आणि त्याखालील दुय्यम न्यायालये, या प्रकारची एकात्मिक व्यवस्था संविधानामध्ये निर्धारित केलेली आहे. अमेरिकेमध्ये अशा प्रकारची एकात्मिक न्यायव्यवस्था नाही. भारताने आवर्जून अशा प्रकारच्या एकात्मिक न्यायव्यवस्थेची रचना स्वीकारली.

७. संसदेचे सार्वभौमत्व आणि न्यायालयाची सर्वोच्चता

भारतीय संविधानानुसार संसद सार्वभौम आहे. हे तत्त्व ब्रिटिश राजकीय परंपरेतून स्वीकारले आहे. तसेच न्यायालयीन सर्वोच्चतेचे तत्त्व अमेरिकन संविधानापासून प्रेरित होऊन स्वीकारले आहे. या दोन्ही तत्त्वांचा समन्वय साधण्याचे कठीण काम भारताच्या संविधानाच्या रचनेत केले गेलेले आहे.

संसदेचे सार्वभौमत्व आणि न्यायालयीन सर्वोच्चता या दोन्ही शब्दप्रयोगातून संसदेच्या आणि सर्वोच्च न्यायालयाच्या कार्यकक्षेकडे निर्देश केलेला आहे. या दोन्हींच्या कार्यकक्षांची सीमारेषा धूसर आहे. त्यामुळे अनेकदा संसद बहुमताच्या जोरावर हवे ते कायदे करते आहे, म्हणून तक्रार होते तर न्यायव्यवस्था संसदेने पारित केलेल्या कायद्यांची चिकित्सा करते तेव्हा न्यायालय संसदेच्या सार्वभौमत्वावर आक्रमण करते आहे, असाही युक्तिवाद केला जातो. न्यायिक पुनर्विलोकन करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे आणि त्यामुळे संसदेने पारित केलेला कायदा असंवैधानिक असल्याचे निकालपत्र न्यायालय देऊ शकते. या दोन्ही कार्यकक्षांमधील सीमारेषा धूसर असली तरी या दोन्हींमध्ये समन्वय कसा राहील आणि त्यातून सत्ता संतुलन कसे राखले जाईल, याबाबतचा विचार संविधानामध्ये केला गेला आहे.

८. एकेरी नागरिकत्व

भारताने संघराज्यवादाचे तत्त्व स्वीकारले असले तरीही भारतीय संविधानाने एकेरी नागरिकत्वाचा पुरस्कार केलेला आहे. अमेरिकेसारख्या देशामध्ये व्यक्ती ही घटकराज्यांचीही नागरिक असते तसेच संघराज्याचीही (फेडरेशनची) नागरिक असते.

भारतामध्ये कोणत्याही राज्यात/ केंद्रशासित प्रदेशात वास्तव्य करणारी नागरिक असलेली व्यक्ती ही राज्याची नागरिक नसते तर ती देशाचीच नागरिक असते. भारताच्या एकतेला आणि एकात्मतेला धोका पोहोचू नये तसेच स्वतंत्र नागरिकत्वाच्या माध्यमातून प्रांतिक अस्मिता टोकदार होऊ नयेत, असा संविधानकर्त्यांचा विचार होता. त्यामुळे केंद्र आणि राज्य अशी अनेक बाबतीत संघराज्यीय धर्तीची सत्तेची/ अधिकारांची विभागणी आहे मात्र येथे एकेरी नागरिकत्व हे संघराज्यवादाशी विसंगत असले तरी संविधानाचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

९. मूलभूत हक्क

भारतीय संविधानातील सर्वांत महत्वाचा भाग आहे मूलभूत हक्कांचा. संविधानातील तिस—या भागात अनुच्छेद १२ ते ३५ यांमध्ये मूलभूत हक्कांचा समावेश केलेला आहे. प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे. तिला हवा तो व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. तिला मुक्तपणे बोलता आले

पाहिजे. शिक्षण घेता आलं पाहिजे आणि स्वतःचा विकास करण्यासाठीच्या पुरेशा संधी उपलब्ध असल्या पाहिजेत.

हा विचार करुन भारतीय संविधानाने सहा प्रकारचे मूलभूत हक्क मान्य केलेले आहेतः

१. समतेचे हक्कः अनुच्छेद १४ ते १८
२. स्वातंत्र्याचे हक्कः अनुच्छेद १९ ते २२
३. शोषणाच्या विरोधातील हक्कः अनुच्छेद २३ आणि २४
४. धर्मविषयक स्वातंत्र्याचे हक्कः अनुच्छेद २५ ते २८
५. शैक्षणिक आणि सांस्कृतिक हक्कः अनुच्छेद २९ आणि ३०
६. मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास दाद मागण्याचा हक्कः अनुच्छेद ३२

या मूलभूत हक्कांनुसार, राज्यसंस्थेसमोर सर्वजण समान आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारच्या जन्मजात ओळखीच्या आधारे भेदभावाची वागणूक देता येऊ शकत नाही. सर्वांना दर्जाची व संधीची समानता असली पाहिजे, यासाठीच्या तरतुदी संविधानामध्ये केलेल्या आहेत. प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य असले पाहिजे. चांगले, गुणवत्तापूर्ण जगण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, यासाठीच्या मूलभूत हक्कांचा समावेश या भागात आहे. व्यक्तीला तिच्या शोषणाच्या विरोधात दाद मागता आली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या श्रद्धांनुसार आचरण करता यायला हवे. कोणताही धर्म स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला असले पाहिजे. अल्पसंख्यांकांना सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क असले पाहिजेत. या अनुषंगाने वेगवेगळ्या अनुच्छेदांमध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. संविधानातील मूलभूत हक्कांबाबतची विशेष बाब म्हणजे कोणत्याही मूलभूत हक्काचे उल्लंघन झाले तर अनुच्छेद ३२ नुसार सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. हे सर्व हक्क अतिशय महत्वाचे आहेत आणि हे हक्क असल्यामुळेच नागरिकांचे संरक्षण होऊ शकते.

१०. मार्गदर्शक तत्त्वे

भारतीय संविधानाचा चौथा भाग आहे मार्गदर्शक तत्त्वांचा. यांना 'निदेशक तत्त्वे' (डायरेक्टिव प्रिन्सीपल्स) असेही म्हटले आहे. अनुच्छेद ३६ ते ५१ यांमध्ये या सा-या तत्त्वांचा समावेश आहे. ही तत्त्वे कोणासाठी आहेत ? राज्यसंस्थेने कसे वागावे, कायदे बनवताना कोणत्या मुद्दयांना प्राधान्य द्यावे यासाठी ही तत्त्वे मांडली आहेत. त्यातही प्रामुख्याने कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाने कसे वागावे याबाबतच्या सूचना या विभागामध्ये दिलेल्या आहेत. या आधीच्या तिस-या विभागातले मूलभूत हक्क हे मुख्यतः व्यक्तींसाठी आहेत. काही हक्क समूहांसाठी आहेत. त्याचे रक्षण करण्याची जबाबदारी राज्यसंस्थेवर आहे. मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले तर व्यक्ती न्यायालयात जाऊ शकते. झालेल्या अन्यायाबाबत दाद मागू शकते. येथे मार्गदर्शक तत्त्वांबाबत मात्र न्यायालयात जाता येत नाही. मुळात हे सारे अनुच्छेद सक्तीचे, थेट अंमलबजावणीसाठीचे (एन्फोरसीयेबल बाय कोर्ट) नाहीत. याचे मुळात स्वरूप आहे ते सल्ल्यासारखे. मार्गदर्शनवजा सूचनांसारखे. राज्याचा कारभार करताना काही तत्त्वांचे पालन करावे, यासाठी ही तत्त्वे सांगितली आहेत. ही तत्वे सक्तीची नसली तरी त्यातून एक नैतिक तत्त्वांचा आग्रह दिसून येतो. न्यायालयात जाता येत नसले तरी या तत्त्वांच्या आधारे कायदे केले जाऊ शकतात. तसेच अनेक न्यायालयीन खटल्यांमध्ये या तत्त्वांचा संदर्भ महत्वाचा मानलेला आहे.

मूलभूत हक्कांचा विभाग आहे तो मुळी राजकीय हक्कांबाबत. हे सारे हक्क राजकीय लोकशाहीची मांडणी करतात. राजकीय लोकशाहीइतकीच सामाजिक आणि आर्थिक लोकशाही महत्वाची आहे, हे भारताचे संविधानकर्ते जाणत होते. त्यामुळेच सामाजिक-आर्थिक हक्कांची मांडणी या विभागात केलेली आहे. हे सामाजिक-आर्थिक हक्क व्यक्तीला मिळावेत अशा योजना करायच्या असतील तर राज्यसंस्था कशी

असावी, हे ठरवले पाहिजे. ढोबळमानाने सांगायचे तर कल्याणकारी राज्यसंस्था आकाराला यावी, यासाठीच्या तरतुदी या विभागात केल्या आहेत.

कल्याणकारी राज्यसंस्था ही केवळ कायदा आणि सुव्यवस्था यांच्यापुरती सीमित नसते. कल्याणकारी राज्यसंस्था सार्वजनिक धोरण कसे असावे, यासाठीचा आग्रह धरते. लोकाभिमुख योजना असाव्यात याचे प्रारूप मांडते. समाजातील सर्व घटकांपर्यंत संसाधनांचे न्याय्य वाटप व्हावे, यासाठी प्रयत्न करते. जल, जंगल, जमीन ही संसाधने सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठीचा आराखडा मांडते. अन्न, वस्त्र, निवारा यासोबतच निरामय आरोग्य आणि दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी राज्यसंस्थेवर असते. ही राज्यसंस्था लोकांच्या कल्याणाच्या जबाबदारीपासून पळ काढू शकत नाही. ती लोकांना उत्तरदायी असते. अशा राज्यसंस्थेसाठीची तत्त्वे या विभागात सांगितली आहेत.

मुळात अशा प्रकारची मार्गदर्शक तत्त्वे असावीत, असा विचार पुढे आला तो आयरिश संविधानामुळे. आयर्लंडच्या १९३७ सालच्या संविधानामध्ये अशी मार्गदर्शक तत्त्वे मांडली होती. त्यापूर्वी स्पेनमध्येही अशा प्रकारच्या तत्त्वांचा समावेश केला गेला होता. बाबासाहेब आंबेडकर या विभागाला 'सूचनांचे साधन' (इन्स्ट्रूमेंट ऑफ इंस्ट्रक्शन्स) असे म्हणाले होते. १९३५ च्या भारत सरकार कायद्यातही अशा काही सूचना होत्या. या सूचना मात्र कायदेमंडळाला आणि कार्यकारी मंडळाला डोळ्यासमोर ठेवून केल्या गेल्या होत्या. या माध्यमातून एक नैतिक मापदंड निर्धारित करण्याचा प्रयत्न झाला. संविधानाचे प्रख्यात अभ्यासक ग्रॅनवील ऑस्टीन म्हणाले होते की संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा विभाग हा 'संविधानाचा विवेक' (कॉन्शन्स ऑफ कॉन्स्टीट्यूशन) आहे. विवेकाचा अर्थ योग्य/अयोग्य किंवा चांगले/ वाईट ठरवण्याची क्षमता. विवेक या शब्दामध्येच तर्क आणि नैतिकता या दोन्ही आयामांचा संदर्भ आहे. त्यामुळे संविधानाचा विवेक शाबूत रहायचा असेल तर राज्यसंस्थेचे वर्तन चौथ्या विभागातल्या तत्वांशी सुसंगत असायला हवे. हा विवेक संविधानाचे अधिष्ठान आहे. हे अधिष्ठान शाबूत असेल तरच इतर कायदे, तरतुदी यांना अर्थ आहे, हे नागरिकांनी आणि राज्यसंस्थेने लक्षात ठेवले पाहिजे.

११. मूलभूत कर्तव्ये

इंदिरा गांधी प्रधानमंत्री असताना स्वर्ण सिंह यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती (१९७६) गठित करण्यात आली. या समितीचे काम होते संविधानानुसार नागरिकांची कर्तव्ये कोणती असावीत, हे ठरवणे. भारताच्या मूळ संविधानात नागरिकांच्या कर्तव्यांचा उल्लेख नाही. जगातील अनेक प्रमुख देशांच्या संविधानामध्ये कर्तव्यांचा समावेश नव्हता. रशिया हा त्याला अपवाद होता. रशियन संविधानामध्ये नागरिकांची कर्तव्ये सांगितलेली होती. व्हिएतनाममध्येही अशी कर्तव्ये सांगितलेली होती. भारतामध्ये अशा प्रकारची नागरिकांची कर्तव्ये असली पाहिजेत, असा इंदिरा गांधींचा आग्रह होता. शिवाय आंदोलनांनी एक प्रकारचे अराजक निर्माण केले आहे, अशी त्यांची धारणा झाली होती. त्यामुळे देशातील नागरिकांनी शिस्तीत आपली कर्तव्ये पार पाडली पाहिजेत, यासाठी उपाययोजना करणे त्यांना आवश्यक वाटत होते. त्यासाठीच स्वर्ण सिंह यांच्या अध्यक्षतेखालील समितीवर इंदिरा गांधींनी जबाबदारी सोपवलेली होती. त्यांच्यासह ए. आर. अंतुले, तेव्हाचे कायदामंत्री एच. आर. गोखले असे काहीजण या समितीवर होते.

या समितीने नागरिकांसाठीची कर्तव्ये सांगितली. नागरिकांसाठीची कर्तव्ये संविधानाच्या ४ (क) भागामध्ये समाविष्ट करावीत, असे या समितीमार्फत सुचवण्यात आले. त्यानुसार ४२ व्या घटनादुरुस्तीनुसार संविधानाच्या ४ (क) भागात अनुच्छेद ५१ (क) मध्ये नागरिकांची कर्तव्ये जोडण्यात आली. देशाविषयी प्रेम, राष्ट्रीय स्वातंत्र्यविषयक चळवळीबाबत आदर, देशाच्या एकता आणि एकात्मतेसाठी प्रयत्न, संमिश्र संस्कृतीचे संवर्धन, पर्यावरण रक्षण आदी मुद्द्यांच्या अनुषंगाने १० कर्तव्ये या अनुच्छेदामध्ये सांगण्यात आली आहेतः

१. संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

२. ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करुन त्यांचे अनुसरण करणे.

३. भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे.

४. देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.

५. धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीस लावणे, स्त्रियांना उणेपणा आणणा–या प्रथांचा त्याग करणे.

६. आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.

७. वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करुन त्यात सुधारणा करणे आणि प्राणिमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगणे.

८. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

९. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

१०. राष्ट्र सातत्याने उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल, अशा प्रकारे व्यक्तिगत व सामुदायिक स्वरूपाच्या सर्व कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.

ही दहा कर्तव्ये मांडल्यानंतर ८६ व्या घटनादुरुस्तीने (२००२) वय वर्षे ६ ते १४ या वयोगटातील बालकांना शिक्षण दिले पाहिजे, असे पालकांसाठी एक कर्तव्य जोडण्यात आले. या प्रकारे एकूण ११ कर्तव्ये या अनुच्छेदामध्ये आहेत.

नागरिकांनी या कर्तव्यांचे पालन करावे, अशी अपेक्षा आहे. कर्तव्यांचे पालन न केल्यास कोणती कारवाई केली जाईल किंवा त्याबाबतची शिक्षा काय होईल, याबाबत संविधानात तरतुदी नाहीत. काही कर्तव्यांच्या अनुषंगाने स्वतंत्र कायदे केलेले आहेत; मात्र एकूणात नैतिकतेने वर्तन करत प्रत्येक नागरिकाने कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन केले पाहिजे, अशी संविधानकर्त्यांची अपेक्षा होती. संविधानात समाविष्ट केलेल्या मूलभूत कर्तव्यांची अंमलबजावणी कशी होईल याबाबत सूचना देण्यासाठी १९९८ स. केंद्र शासनाने न्यायमूर्ती वर्मा यांचे अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला होता या कर्तव्यांची अंमलबजावणी न्यायालयाकडून घेण्याची तरतूद जरी नसली तरी ती पार पाडण्याचे बंधन व्यक्ती आणि राज्यावर आहे असे मत न्यायमूर्ती वर्मा आयोगाने आणि सर्वोच्च न्यायालयाने ही वेगवेगळ्या खटल्यात नोंदविले आहे समाज जीवनात याबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा अपेक्षित आहे आणि ही कर्तव्य प्रभावीपणे कशी पार पाडली जातील याचे वेगवेगळे आयाम शोधण्याची गरज आहे.

१२. संघराज्यीय व्यवस्था

भारताने स्वतंत्र होताच संघराज्य पध्दत स्वीकारली. सत्तेचे केंद्रीकरण होऊ नये, याकरता कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ या प्रकारे सत्तेचे अलगीकरण (सेपरेशन ऑफ पॉवर) केले जाते. हे सत्तेचे आडवे वितरण (लॅ टरल) आहे. संघराज्य पद्धतीमध्ये सत्तेचे उभे विभाजन (व्हर्टिकल) अपेक्षित असते. याचा अर्थ केंद्र आणि घटक-राज्ये यांच्यामधील सत्तेचे विभाजन (डिव्हिजन ऑफ पॉवर) होय.

प्रादेशिक स्वायत्तता आणि विविधता या दोहोंचे समायोजन करता यावे, याकरता संघराज्य पद्धती महत्वाची असते. भारतातील विविधता जगातील अनेक देशांहून अधिक आहे. अगदी युरोपीय महासंघासोबत तुलना केली तरी भारतातील विविधता अधिक असल्याचे लक्षात येईल. भारतासारख्या खंडप्राय देशातले ऐक्य टिकवण्यासाठी सुयोग्य शासनपध्दती स्वीकारण्याचे आव्हान भारतासमोर होते. संघराज्यवाद, संसदीय

लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता यांनुसार शासन व्यवहार करण्याचे आपण ठरवले जेणेकरुन विविधतेचे समायोजन शक्य होईल.

या आधीच उल्लेख केल्याप्रमाणे १९३५ च्या भारत सरकार कायद्याने भारतातील संघराज्यवादाची बीजं रोवली गेली. भारताच्या स्वतंत्र संविधानातही हे तत्त्व स्वीकारले गेले. संविधानाचा पहिलाच अनुच्छेद आहे: इंडिया दॅट इज भारत शाल बी युनियन ऑफ स्टेट्स. इंडिया अर्थात भारत हा राज्यांचा संघ असेल. या पहिल्या कलमात 'फेडरेशन' ऐवजी 'युनियन' असा शब्दप्रयोग केला आहे. संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'युनियन' हा शब्द वापरण्यामागे दोन कारणं आहेत, असे सांगितले आहेः १. अमेरिकेप्रमाणे घटकराज्ये एकत्र येऊन भारतीय संघराज्य आकाराला आलेले नाही. भारतात घटकराज्यांची निर्मिती नंतर झालेली आहे. २. तसेच अमेरिकेमध्ये ज्या प्रमाणे घटकराज्याला स्वतंत्र नागरिकत्व आहे आणि 'फेडरेशन' मधून बाहेर पडण्याचा अधिकार आहे, तसा तो भारतात नाही. भारतात दुहेरी नागरिकत्वही नाही आणि घटकराज्ये संघराज्यातून बाहेर पडू शकत नाहीत.

या दोन कारणांच्या आधारे बाबासाहेब 'युनियन' हा शब्द वापरण्याचे समर्थन करतात. त्यांच्या या दोन कारणांमधून अमेरिकेहून भारतीय संघराज्यपद्धती भिन्न आहे, हे स्पष्ट होते. भारताने संघराज्यपद्धतीचा अवलंब करताना कॅनडाच्या रचनेचा विचार केला आहे. भारतातली संघराज्यपद्धती केंद्र आणि राज्य यांना काटेकोररित्या समान सत्ता देणारी नाही. कॅनडाप्रमाणेच भारतात केंद्र अधिक शक्तिशाली आहे. देशाचे विघटन होऊ नये, पुन्हा फाळणी होऊ नये याकरता केंद्राला अधिक अधिकार असणे जरुरीचे होते. मात्र असे करताना घटकराज्यांची स्वायत्तता संपुष्टात येऊ नये, याची दक्षताही घ्यायची होती. भारतीय संविधानकर्त्यांनी मोठी कसरत करत हे संतुलन साधण्याचा प्रयत्न केला.

१३. त्रिस्तरीय शासनव्यवस्था

संघराज्यीय व्यवस्थेला पूरक अशी त्रिस्तरीय शासनव्यवस्था संविधानामध्ये स्वीकारलेली आहे. सुरुवातीला सत्तेची विभागणी केंद्र आणि राज्य यांच्यापुरतीच मर्यादित होती; मात्र सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे, हा विचार आग्रहाने मांडण्यात आला. त्या अनुषंगाने अनेक अभ्यास झाले. सर्वेक्षणे झाली. वेगवेगळ्या समित्या गठित झाल्या आणि अखेरीस ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्त्यांच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना संवैधानिक दर्जा देण्यात आला. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद अशा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ७३ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. त्या अनुषंगाने अकरावी अनुसूची संविधानाला जोडण्यात आली. अगदी त्याचप्रमाणे, नगरपालिका, महानगरपालिका यांसारख्या शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ७४ वी घटनादुरुस्ती केली गेली आणि त्याबाबत बारावी अनुसूची संविधानास जोडण्यात आली.

१४. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार

भारतीय संविधानाने प्रत्येक व्यक्तीला मतदान करण्याचा अधिकार आहे, हे तत्त्व मान्य केले. त्यासाठीचा हक्क मान्य केला. प्रत्येक व्यक्तीच्या मताचे मोलही सारखे आहे. त्यामुळे 'एक व्यक्ती एक मत आणि एक मत समान पत' हे तत्त्व संविधानात स्वीकारले गेले. राजकीय लोकशाहीचे हे मूलभूत अधिष्ठान आहे.

संविधान १९५० मध्ये लागू झाले तेव्हा वय वर्षे २१ हे मतदानाचे वय होते. जात, धर्म, वर्ग, वंश, लिंग या कोणत्याही आधारे व्यक्तीच्या मतदानाच्या अधिकारास बाधा पोहोचता कामा नये, याबाबत संविधानकर्त्यांनी खबरदारी घेतली. मतदानाचे हे वय २१ वरुन १८ केले गेले १९८८ साली. त्यासाठी ६१ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. भारताच्या संविधानाने मतदार होण्यासाठी कोणतीही विशिष्ट अट घातली नाही. 'हाउ इंडिया

बिकेम डेमॉक्रॅटिक' या इस्त्रायली प्राध्यापक ऑर्नीट शानी यांच्या पुस्तकात मतदार यादी तयार होण्यापासून ते भारतामध्ये राजकीय लोकशाही स्थापित करण्यापर्यंतच्या अनेक प्रक्रियांबाबतची मांडणी आहे. त्यातून सार्वत्रिक प्रौढ मताधिकार हे लोकशाहीसाठी किती अत्यावश्यक होते, याची खात्री पटते.

१५. धर्मनिरपेक्ष राज्यसंस्था

भारतीय राज्यसंस्था 'धर्मनिरपेक्ष' असेल, हे संविधानामधील अनेक अनुच्छेदांमधील मांडणीतून दिसून येते. या आधीच्या घटकात धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व तपशीलवार स्पष्ट केलेले आहेच. संविधानातील चौदाव्या अनुच्छेदानुसार, राज्यसंस्थेसमोर आणि कायद्यासमोर सर्व समान आहेत. तसेच अनुच्छेद २५ नुसार, प्रत्येक व्यक्तीस सद्सद्विवेकाचे स्वातंत्र्य आहे. त्यानुसार धर्म स्वीकारण्याचे, नाकारण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला आहे. राज्यसंस्था कोणताही धर्म अधिकृतपणे स्वीकारणार नाही, हे तत्त्व पहिल्यापासून भारतीय संविधानात होते. केवळ 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीने जोडण्यात आला.

१६. आणीबाणीविषयक तरतुदी

काही वेळा देशात / राज्यात किंवा काही विशिष्ट भागामध्ये आपत्ती निर्माण होऊ शकते किंवा काही अपवादात्मक परिस्थिती निर्माण होऊ शकते, अशा वेळी शासन करण्याच्या अनुषंगाने काही तरतुदी संविधानकर्त्यांनी केलेल्या आहेत. अशा परिस्थितीमध्ये आणीबाणी लागू करता येते. या आणीबाणींचे तीन प्रकार आहेतः

अ) राष्ट्रीय आणीबाणी (अनुच्छेद ३५२): देशावर आक्रमण होते किंवा बाह्य धोका संभवतो, अशा वेळी राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करता येते.

ब) राष्ट्रपती राजवटः घटकराज्यांमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करता येते. अनुच्छेद ३५६ नुसार, राज्यातील संवैधानिक व्यवस्था मोडकळीस आल्यामुळे आणीबाणी लागू करता येऊ शकते तसेच केंद्राच्या आदेशांचे राज्याने पालन केले नाही तर अनुच्छेद ३६५ अन्वये, राष्ट्रपती राजवट लागू होऊ शकते.

क) आर्थिक आणीबाणी (अनुच्छेद ३६०): आर्थिक संकटांचा किंवा प्रचंड मोठ्या आर्थिक अस्थिरतेचा सामना करण्याची परिस्थिती उदभवल्यास आर्थिक आणीबाणीची घोषणा करता येते.

१७. स्वायत्त संस्था

देशाच्या संस्थात्मक रचनेमध्ये स्वायत्त संस्थांची भूमिका अतिशय महत्वाची राहिलेली आहे. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार मान्य केलेला असला तरी तो बजावता यावा, यासाठी निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त संस्थेची स्थापना करण्यात आली. देशात खुल्या आणि मुक्त वातावरणात निवडणुका पार पाडण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे. नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांसारख्या पदांच्या निर्मितीतून सरकारी खर्चाचा ताळेबंद लागेल, अशी व्यवस्था संविधानातच केली जेणेकरुन आर्थिक निर्णयांवर अंकुश राहील. तसेच संविधानामध्ये केंद्रीय लोक सेवा आयोग आणि राज्य लोक सेवा आयोग अशा स्वायत्त संस्था स्थापन करुन गुणवत्तापूर्ण, उत्तरदायी प्रशासनासाठीचे प्रयत्न केले असल्याचे लक्षात येते.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न.

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. कोणत्या अनुच्छेदानुसार राष्ट्रीय आणीबाणी घोषित केली जाऊ शकते?

२. संविधानातील ७४ व्या घटनादुरुस्तीने कोणत्या संस्थांना वैधानिक दर्जा दिला ?

३. कोणत्या अनुच्छेदाद्वारे संविधानात सुधारणा/ दुरुस्ती करता येते ?

४. स्वर्ण सिंह समितीच्या शिफारसींनुसार कोणता भाग संविधानामध्ये जोडण्यात आला ?

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **एकेरी नागरिकत्व** : व्यक्तीला केवळ एकाच देशाचे नागरिक म्हणून मान्यता मिळू शकते. घटकराज्यांचे किंवा इतर देशांचे नागरिकत्व व्यक्तीला मिळू शकत नाही.
- **मूलभूत हक्क** : भारतीय संविधानाने प्रत्येक व्यक्तीचे काही हक्क मान्य केले आहेत. हे हक्क अविभाज्य आहेत. याचा अर्थ त्यांचे उल्लंघन झाल्यास व्यक्तीला न्यायालयात दाद मागता येते.
- **मार्गदर्शक तत्त्वे** : राज्यसंस्थेने कायद्यांची निर्मिती करताना किंवा धोरण आखताना काही मुद्यांचा, तत्त्वांचा विचार केला पाहिजे, यासाठी संविधानाच्या चौथ्या भागात मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश केलेला आहे. ही तत्त्वे राज्यसंस्थेने अनुसरावी यासाठीची आहेत.

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. अनुच्छेद ३५२
२. शहरी स्थानिक स्वराज्य संस्था
३. अनुच्छेद ३६८
४. मूलभूत कर्तव्ये

४.५ सारांश

थोडक्यात, वर उल्लेखलेल्या संविधानाच्या वैशिष्ट्यांमधून भारतीय संविधानाचे स्वरूप लक्षात येते. संविधानानुसार राज्यसंस्थेचे स्वरूप धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि समाजवादी स्वरूपाचे आहे. राज्यसंस्थेने सार्वजनिक धोरण आखताना आणि कायद्यांची निर्मिती करताना कोणत्या तत्त्वांचे पालन केले पाहिजे, हे देखील संविधानात सांगितले आहे.

तसेच संविधानाने नागरिकांना काही मूलभूत हक्क प्रदान केले आहेत. या हक्कांचे रक्षण करण्यासाठीची कार्यपद्धतीही संविधानात सांगितली आहे. काही हक्क हे समूहांसाठीही आहेत. याशिवाय नागरिकांनी कोणती कर्तव्ये बजावली पाहिजेत, याचाही संविधानात उल्लेख आहे.

कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ यांच्यातील सत्तेचे अलगीकरण कसे असेल हे संविधानातून स्पष्ट होते. केंद्र राज्य संबंध आणि एकूणात संघराज्यीय शासनयंत्रणा कशी असेल, याबाबतचा आराखडाही संविधानाच्या माध्यमातून समजतो.

कोणत्याही धर्मग्रंथासारखा संविधान हा काही 'पवित्र' ग्रंथ नव्हे. त्यामध्ये बदल, सुधारणा शक्य आहेत. त्यामुळेच वेळोवेळी घटनादुरुस्त्या झाल्या आहेत. अनुच्छेद वगळले आहेत, नवे जोडले गेले आहेत. काही अनुसूच्याही नव्याने जोडल्या गेल्या आहेत. संविधान सतत विकसित होते आहे. तरीही त्याची काही पायाभूत मूल्ये आहेत आणि विशेष वैशिष्ट्ये आहेत. ही वैशिष्ट्ये समजावून घेतल्यावर संविधानाचे नेमके आकलन होणे सोपे होऊ शकते.

४.६ सरावासाठी स्वाध्याय

१. भारतीय संविधानामध्ये ताठरता आणि लवचिकता यांचा समन्वय आहे.- स्पष्ट करा.

२. भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांविषयी टीप लिहा.

३. आपली मूलभूत कर्तव्ये कोणती आहेत व ती संविधानात कशाप्रकारे सामील करण्यात आली, हे सविस्तर स्पष्ट करा.

४.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके

१. कश्यप सुभाष (२०१९), *कॉन्स्टीट्यूशन ऑफ इंडिया: अ हॅन्डबुक फॉर स्टुडन्टस*, विटास्टा पब्लिशिंग

२. भोळे, भा. ल. (१ जानेवारी २०१५). *भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण.* पिंपळापुरे बुक्स डिस्ट्रिब्युटर्स.

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

ज्ञानगंगोत्री, गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - ४२२ २२२

दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४ | २२३१७१५ | २२३०१०६ | २२३०४५९

फॅक्स : (०९१) (०२५३) २२३१७१६

http://ycmou.ac.in / http://ycmou.digitaluniversity.ac

LOCATION

Design : Kanchan Shinde | AB-25-188